# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०५/२००७.

श्री.प्रेमदास रेकाजी राठोड,
बी-८, लिबर्टी एनक्लेव्ह, जेपीनगर रोड,
मालवियानगर, खामला, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर.झेड्.सिद्दीकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी अतिरिक्त आयुक्त, (१)
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. पी.डी.उराडे,
तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री.जी.डी.जांभूळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) नागपूर शहरात रिंगरोडवरील सावरकर चौकातून सहकारनगरकडे जाणाऱ्या (वार्ड ७५) रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मंजूर केलेल्या रस्त्याच्या नकाशाची प्रत (रोड अलाईन मॅप) मला देण्यात यावी. यात रस्त्यावरील रस्तादुभाजकाची

... २

लांबी, रस्त्याची रुंदी आणि रस्तादुभाजक नसलेल्या ठिकाणांचा स्पष्ट उल्लेख असावा. २) या रस्त्यावर रस्तादुभाजक नसलेल्या ठिकाणांची एकूण संख्या किती? ही संख्या कोणत्या आधारे निश्चित करण्यात आली ? त्याची माहिती मला देण्यात यावी. रस्तादुभाजक नसलेल्या ठिकाणांची संख्या मंजूर संख्येपेक्षा जास्त असल्यास त्याला जबाबदार कोण व अशा ठिकाणी किती कालावधीत रस्तादुभाजक लावण्यात येतील याची माहिती देण्यात यावी. ३) या रस्त्यावर किती ठिकाणी रस्त्याची रुंदी २४ मीटर्सपेक्षा कमी आहे ? त्याची कारणे काय ? रुंदी कमी असलेल्या प्रत्येक ठिकाणासाठी वेगवेगळी कारणे असल्यास त्याचा तपशील देण्यात यावा. ४) रस्ता दुभाजक असलेल्या शहरातील रस्त्यांवर रस्तादुभाजक नसलेली ठिकाणे निश्चित करताना कोणते निकष लावले जातात व त्यासाठी कोणत्या नियमाचा आधार घेतला जातो. वर उल्लेख केलेल्या रस्त्यावरील रस्तादुभाजक नसलेली ठिकाणे निश्चित करताना कोणते निकष लावण्यात आले, त्याची माहिती मला देण्यात यावी. ५) वरील रस्त्याचे काम ७.१०.२००३ च्या कार्यादेशानुसार सुरु करण्यात आले. त्यावेळी हे काम पूर्ण करण्यासाठी मे.सेठी कंन्स्ट्रकशन कंपनीला किती दिवसांची मुदत देण्यात आली होती. मुदतीत काम पूर्ण झाले नसल्यास कोणकोणत्या तारखांना या कंपनीला काम पूर्ण करण्यासाठी मुदत वाढवून देण्यात आली, प्रत्येक वेळा मुदत वाढवून देण्याची कारणे काय ? मुदतीत काम पूर्ण केले नाही म्हणून या कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली ? त्याची माहिती मला देण्यात यावी. ६) वरील रस्त्याच्या रुंदीकरणातील डांबरीकरणाची गुणवत्ता नियमानुसार आहे काय ? महिन्याभरापूर्वी केलेले डांबरीकरण आता अनेक ठिकाणी उखडले आहे ? याची संबंधित अधिकाऱ्यांना माहिती आहे काय ? याबाबत कोणकोणत्या अधिकाऱ्यांने कोणकोणत्या तारखांना कामाचे निरीक्षण केले, त्याची माहिती मला देण्यात यावी. ७) या रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्तादुभाजक नसलेल्या ठिकाणां शिवाय आणखी अनेक ठिकाणी फूटपाथचे काम करण्यात आलेले नाही, त्याची कारणे काय ? हे काम केंव्हा पूर्ण केले जाणार आहे, त्याची माहिती मला देण्यात यावी. ८) या रस्त्यावर नियमापेक्षा जास्त ठिकाणी रस्तादुभाजक न ठेवण्यास, काही ठिकाणी रस्त्याची रुंदी कमी करण्यासाठी आणि काही ठिकाणी फूटपाथची काम न करण्यासाठी कंत्राटदार वा अधिकाऱ्यांवर दडपण आणले काय ? त्याबाबत कंत्राटदार कंपनीने महापालिकेकडे तक्रार केली असल्यास त्याची प्रत मला देण्यात यावी. रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु झाल्यानंतर याबाबत महापालिका बांधकाम विभाग व कंत्राटदार कंपनी वगळता अन्य व्यक्तींनी महापालिकेशी

पत्रव्यवहार केला आहे काय, केला असल्यास त्याची प्रत मला देण्यात यावी. ९) या रस्त्याच्या रुंदीकरणावर मूळ योजनेत किती खर्च मंजूर करण्यात आला ? त्यात नंतर किती वाढ करण्यात आली ? या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम नेमके केंव्हा पूर्ण होणार आहे ? याची माहिती मला देण्यात यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००६ रोजी प्रश्नोत्तराचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार असमाधानकारक, अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक ११.१०.२००६ रोजी अपीलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त निगमायुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.३.२००७ रोजी दिलेला असून अपील निकाली काढण्यात आले असे दिलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे वर नमुद केल्याप्रमाणे ९ मुद्यांमध्ये जी माहिती मागितली ती प्रश्नोत्तराचे स्वरुपात माहिती मुदतीत जरी उपलब्ध करुन दिलेली असली तरी ती असमाधानकारक, अपूर्ण व चुकीची आहे असे त्यांचे म्हणणे आहे ती कशी अपूर्ण आहे याबद्यल त्यांनी राज्य राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये रस्त्यावरील फूटपाथ व रोड क्रॉसिंगचे झालेले चुकीचे काम प्रत्यक्ष पाहणी करुन खात्री केली जाऊ शकते. दारुचे दुकान, अतिक्रमणातील वास्तु व स्थानीक पुढारी व टपऱ्यांच्या सोयीसाठी नको तेथे रोड क्रॉसिंग देण्यात आल्याने ये-जा करणाऱ्या वाहनचालकांचे झालेले अनेक अपघात मी डोळयाने पाहिले आहेत व त्यामुळेच सदरची माहिती चुकीची आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरिता उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांना नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. उत्तरवादी यांनी आयोगाचे समक्ष नकाशा हा दाखविला आहे व त्यामध्ये १० रस्ता दुभाजक कट नसलेल्या ठिकाणांची माहिती दिलेली आहे. परंतु प्रत्यक्षात रस्तादुभाजक नसलेल्या ठिकाणांची संख्या १४ रस्ता दुभाजकाची कट आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, नकाशात १० रस्तादुभाजक कटची माहिती असलीतरी प्रत्यक्षात कार्यवाही करतांना १४ रस्ता

दुभाजक कट झाले असतील हयाबद्दल त्यांनी मान्य केले आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांच्या पाहणी करण्याचे संदर्भामध्ये सक्षम अधिकाऱ्यांनी पाहणी करावी ही विनंती कायम असल्यामुळे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून सदरच्या रस्त्याची पाहणी ही उपलब्ध असलेल्या नकाशाचे आधारे तपासणी करुन अहवाल मागविणे संयुक्तिक राहील. तसे अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे आढळून आल्यास उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे व अहवालाचे आधारे स्वतंत्रपणे महानगरपालिकेतील सक्षम अधिकाऱ्यांकडे तशा प्रकारची तक्रार करणे संयुक्तिक राहील. राज्य माहिती आयोगाचे अधिकारात माहिती उपलब्ध करुन देणे ऐवढाच माहितीचा उद्येश असल्यामुळे कोणत्याही प्रकारे कारवाईच्या संदर्भामध्ये आदेश हे देता येणार नाहीत.

४. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी सदरचे प्रथम अपील हे विहित मुदती पेक्षा विलंबाने निर्णय दिलेला आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु प्रत्यक्ष अपीलाचा निर्णय तपासून पाहिले असता सदरच्या निर्णयामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता पत्र दिलेले होते. परंतु अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित झाले नाही असे त्यांनी नमुद केलेले आहे व त्याकरिता राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दिनांक १२.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांना अपील क्रमांक एम.आर.आय.-१३६-९७/२००६ मध्ये दिनांक ३०.१०.२००६ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहण्यासाठी श्री.प्रेमदास रेकाजी राठोड, बी-८, लिबर्टी एनक्लेव्ह, जे.पी.नगर रोड, मालवियानगर, खामला, नागपूर या पत्त्यावर पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.१०.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता (स्लम) तथा सहाय्यक माहिती अधिकारी यांना सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये २४ तासामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी व दिनांक ३०.१०.२००६ रोजी सकाळी ११.३० वाजता अप्पर आयुक्त तथा अपीलीय अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे सुनावणीस उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १२.२.२००७ रोजी पुन्हा कार्यकारी अभियंता (स्लम), स्लम विभाग, महानगरपालिका, नागपूर यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पत्रानुसार अभिप्राय अप्राप्त आहे असे पत्र दिलेले दिसून येते व त्यानुसार दिनांक १७.२.२००७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी अप्पर आयुक्त यांना

अभिप्राय दिलेले दिसून येते व त्यावरुन प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये दिनांक ३०.१०.२००६ नंतर सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता हे गैरहजर राहिले असे नमुद केलेले दिसून येते. तसेच नोटशिट मध्ये सुध्दा अपीलाचे सुनावणीचे संदर्भामध्ये वेळोवेळी टिपण्या केलेल्या दिसून येतात. अपीलकर्ता हे गैरहजर असले तरी सुध्दा अपीलाची सुनावणी विहित मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक असते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नोटशिटमध्ये दिलेल्या कारणांमुळे विलंब झालेला दिसून येतो. परंतु तरी सुध्दा ती विहित मुदतीत निर्णय देणे हे बंधनकारक असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्याबाबतची ताकीद देणे आवश्यक ठरते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांना असमाधानकारक, अपूर्ण व चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली असे अपील करण्याचे कारण दिलेले असल्यामुळे व प्रत्यक्ष जागेवर पाहणी करण्याची विनंती केलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती व प्रत्यक्ष जागेवरील माहिती प्रत्यक्ष पाहण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे बरोबर जनमाहिती अधिकारी यांचे उपस्थित पाहणी करुन आयोगास निर्णय सादर करणे आवश्यक राहिल.

२) जनमाहिती अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत पत्राद्वारे पाहणी करण्याकरिता तारीख व वेळ कळविण्यात यावी व तसेच अपीलकर्ता यांना सुध्दा कळविण्यात यावे.

३) शासकीय सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना राज्य माहिती आयोगाचे आदेशाप्रमाणे व अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीतील अर्जाप्रमाणे व उपलब्ध झालेल्या माहिती प्रमाणे तपासणी करुन पाहणी करण्याकरिता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिव्हील लाईन, नागपूर यांनी नियुक्ती करावी व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १३.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/ ७८-८२/१३.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०९/२००७.

श्री. हरिश चंद्रभानजी ससनकर,
महाकाली कॉलरी प्राथमिक शाळा नगरपरिषद,
महाकाली कॉलरी वार्ड क्र. ६, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम.ई.भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
प्रशासकीय भवन, दुसरा माळा,
चंद्रपूर.

श्री. एम.व्ही.बोक्कावार,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष, नगरपरिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.
मोहता बिल्डींग, स. प. कॉलेजजवळ, गंजवार्ड,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून अध्यक्ष, नगरपरिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित चंद्रपूर र.न. १०३९ यांच्याकडे १) ३१.८.२००६ च्या कार्यकारीणी समिती सभेचा संपूर्ण कार्यवाही वृत्तांत प्रतिलिपी. २) ज्या ५ शिक्षकांना सदर सभेत सभासद करण्यात आले त्यांनी त्यावेळी सादर केलेल्या कागदपत्रांची माहिती व प्रतिलिपी. ३) शिक्षण सेवकांना ज्या दिवशी सभासद बनवण्यात आले त्या सभेचा कार्यवाही वृत्तांत व प्रतिलिपी. त्यांनी त्यावेळी सादर केलेल्या कागदपत्रांच्या

... २

प्रतिलिपी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार तसेच सर्व प्रतिस येणारा खर्च देण्यास मी तयार आहे असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने पतसंस्थेचे अध्यक्ष यांनी पतसंस्थेचे सचिवांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिनांक १६.१२.२००६ रोजी दिलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक २१.१२.२००६ रोजी पतसंस्थेचे सचिव यांनी अपीलकर्ता यांना पत्रांक २१/२००६ अन्वये माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत आपला अर्ज प्राप्त झालेला असून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती एकूण ३५ प्रती आपणांस पुरविण्यांत येत आहे. त्यासाठी लागणारे माहिती शुल्क ५२/- रुपये कार्यालयाचे फंडात ७ दिवसाचे मुदतीत जमा करुन पावती दाखवून माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते व त्या संदर्भामध्ये जावक नोंदवहीचे छायांकित प्रत तसेच अंडरसर्टिफिकेट टपालाने पाठविल्याची छायांकित प्रत जोडलेली दिसून येते. परंतु अर्जदार हा माहिती घेण्यास आला नाही असे पतसंस्थेचे अध्यक्षांनी पतसंस्था सचिवांना विचारले असता त्यांनी सांगितले असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालुका चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी करिता दिनांक २९.१.२००७ रोजी पत्र दिलेले दिसून येते व सदरची सुनावणी दिनांक ३१.१.२००७ रोजी दुपारी ४.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे असे पत्र पतसंस्थेचे अध्यक्ष/सचिव/व्यवस्थापक व अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. परंतु पतसंस्थेचे अध्यक्ष, सचिव व प्रत्यक्ष अपीलकर्ता हे प्रथम अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहिले नाही असे दिसून येते असे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने पतसंस्थेचे अध्यक्ष व पतसंस्थेचे सचिव यांनी जे पत्र दिनांक २१.१२.२००६ रोजी दिलेले आहे त्यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची त्यांची तयारी होती व आजही आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांना माहितीचा खर्च म्हणून जे ५२/- रुपयाचा भरणा करण्याकरिता पत्र दिले होते. परंतु अपीलकर्ता यांनी जे ५२/- रुपये शुल्क भरलेले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असा खुलासा दाखल केलेला आहे. अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी खर्चाचे संदर्भात कोणतीही तक्रार

... ३

केलेली नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी रुपये ५२/- हा माहितीचा खर्च म्हणून भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांनी (उत्तरवादी यांनी मागितलेले) माहितीच्या छायांकित प्रती व टपाल खर्च रुपये ५२/-चा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०४/२००७.

श्री. तातोबा रतिरामजी तुमसरे,
४८, सन्मार्गनगर, हुडकेश्वर रोड,
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन),
दुग्ध व्यवसाय विकास विभाग,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफ्फार खान मार्ग,
वरळी, मुंबई - १८.

श्री. पी.एन.भागवत,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन, नागपूर- ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता आज हजर नाही. उत्तरवादी हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली आहे असे पत्र राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.४.२००८ रोजी दिलेले असल्यामुळे व सदरहू प्रकरणी माझी कोणतीही तक्रार नाही व प्रकरणे नस्तीबध्द करण्यास माझी कोणतीही हरकत नाही असे कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १३.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ८६/१३.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१०/२००७.

श्री. सुभाष नत्थुजी यमदे,
रा. अ/७, जलविहार,
रिंगरोड, नागपूर - ४४० ०१६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. टी. केंद्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री. श्यामकांत नारायण डेहणकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
(लघुसिंचन विभाग),
जिल्हा परिषद, यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००५ रोजी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून माहितीचा अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज हा विहित नमुन्यात अर्ज नसल्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २८.१२.२००५ ला परत केलेला दिसून येतो. परत दिनांक २.१.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे साधा अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१.२००६ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उपअभियंता, जिल्हा परिषद, सिंचन उपविभाग, पुसद यांनी त्यांचा दिनांक १३.१२.२००५ व

... २

दिनांक २.१.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. दिनांक १६.२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी यांनी सदर माहितीचे पुरविण्याचे संदर्भात रुपये ५१/- अतिरिक्त शुल्क भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु दिनांक १.४.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग यांना त्यांच्या दिनांक २९.३.२००६ च्या पत्राचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००५ अन्वये आपणास संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ मध्ये कन्हेरवाडी, माळवाकद, हरदडा, मालहिवरा व वसंतपूर येथील पाझ्झर तलाव दुरुस्तीवर एकूण रुपये ४,३०,०००/- खर्चांच्या देयकांच्या (हजेरीपटे व इतर बीले) झेरॉक्स प्रतींची मागणी करण्यांत आलेली होती. परंतु आपण हेतुपुरस्पर टाळाटाळ करीत आहात. आपले वरील संदर्भीय पत्रान्वये आपण वरील पाझर तलावांच्या खर्चाची देयके न पाठविता फॉर्म नं. २९ (Bill of Contingent Expenditure) गोषवाऱ्यांच्या झेरॉक्स प्रती पाठविल्या असून उगाच मला आर्थिक भुर्दंड दिलेला आहे. करिता दिनांक ५.१२.२००५ च्या मुळ अर्जानुसार माहिती विनाविलंब पाठवावी तसेच यापुढे या संदर्भात पत्र व्यवहार करणार नसून विलंबास व पुढील पेचप्रसंगास आपण व्यक्तिगतरित्या जबाबदार राहाल याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती असे कळविलेले दिसून येते व पुन्हा दिनांक १२.५.२००६ च्या अर्जाप्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ८.५.२००६ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उप अभियंता यांना त्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. दिनांक ३०.६.२००६ रोजी उप अभियंता यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १७.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे रुपये १९१/- चा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ६.७.२००६ रोजी अर्धवट माहिती उपलब्ध असल्याचे मला कळविण्यात आलेले आहे. करिता पूर्ण माहिती उपलब्ध करुनच खर्चाविषयी कळविण्यात यावे. तसेच पुर्ण माहिती उपलब्ध करुन देईपर्यंत आपणाकडे प्रलंबित असल्याचे समजण्यात येवून पुढील विलंबास आपण जबाबदार असाल याची कृपया नोंद असावी असे कळविले आहे. पुन्हा दिनांक १४.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांना कळविलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक १४.८.२००६ रोजी दिलेल्या पत्राचे नंतर राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ७.१२.२००६ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. आज अपीलकर्ता हजर नसल्यामुळे त्याबाबत संपूर्ण खुलासा हा होवू शकत नाही व प्रथम अपील हे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दाखल झाले नाही असा त्यांनी खुलाश्यात दिलेले आहे. यावरुन या संदर्भात जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, पंचायत समितीच्या माध्यमातून अपीलकर्ता यांनी मागितलेली पाझर तलावाच्या दुरुस्तीचे संबंधामध्ये काम झाले असल्यामुळे फॉर्म नं. २९ (Bill of Contingent Expenditure) हेच खर्चाची देयके आहेत व त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. मात्र पुन्हा उप अभियंता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी संपूर्ण छायांकित प्रतीची माहिती त्यांना न उपलब्ध झाल्यामुळे त्यासंदर्भात खर्चाची तपासणी करुन त्यांना १९१/- रुपये कळविण्यात आले होते. मात्र त्यावर त्यांनी आक्षेप घेतला असून संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यावर खर्च कळविण्यात यावा. त्यातही हजेरी पटाचे संदर्भांत नवीन माहिती मागितलेली दिसून येते.

४. अर्जदाराने दिनांक ५.१२.२००६ च्या अर्जामध्ये हजेरी पटाची माहिती मागितलेली नव्हती असे दिसून येते व तसे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणलेले आहे. अपीलकर्ता यांनी सुध्दा जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे पालन त्यांनी केलेले नाही. अर्ज विहित नमुन्यात न करता दिला, मुदतीत प्रथम अपील दाखल न करणे, तसेच दिलेल्या मुदतीत द्वितीय अपील न दाखल करणे व ज्या अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अन्वये कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत त्यांच्याकडे अर्ज करीत राहणे अशा प्रकारे कार्य पध्दतीचा अवलंब केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील सकृतदर्शनी निकाली काढण्यास पात्र आहे. मात्र माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश अधिनियमाचा असल्यामुळे त्यांच्या दिनांक ५.१२.२००५ च्या अर्जाप्रमाणे मागणी केल्या प्रमाणे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ मध्ये कन्हेरवाडी, माळवाकद, हरदडा, मालविहरा व वसंतपूर येथील पाझर तलावाच्या दुरुस्तीवर एकूण रुपये ४,३०,०००/- खर्च करण्यात

... ४

आले. सदर रकमेच्या देयकांच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे उप अभियंता यांच्या म्हणण्याप्रमाणे सबव्हॉउचरच्या छायांकित प्रती सुध्दा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व देयकांच्या छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.१२.२००५ च्या अर्जामध्ये केलेल्या मागणी प्रमाणे संपूर्ण खर्चाच्या देयकांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १४.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/ ८७-९०/१४.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५११/२००७ व कलम १८ अन्वये तक्रार क्रमांक १५४/२००७.

श्री. नंदलाल केशरीप्रसाद शुक्ला,
रा. ५१, विद्यानगर,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जि. भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव,
जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित,
गणेशपूर, विद्यानगर, जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००७ रोजी (प्राप्त दिनांक १७.४.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तसेच कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी व तक्रारीची सुनावणी आज दिनांक १४.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री.पी.एन.शेंडे हे हजर आहेत. संस्थेचे सचिव हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी भंडारा जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, गणेशपूर (र.नं.३०५) भंडारा संबंधित आवश्यक माहिती. माहितीचा कालावधी दिनांक १.१.१९८१ ते ३१.१२.२००६ पर्यंत मुद्येनिहाय टिपणी सोबत जोडली आहे. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असून सदरची माहिती जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांना मागितलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.२.२००७ रोजी

... २

उपनिबंधक सहकारी संस्था, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचा माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये जिल्हा उपनिबंधक यांनी अपीलकर्ता अर्जदार यांना व गैरअर्जदार अध्यक्ष, जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, गणेशपूर, विद्यानगर, जि. भंडारा. यांना अर्जदारानी मागितलेली माहिती संस्थेशी संबंधित असल्यामुळे अर्जदाराने मागितलेली १ ते ६ मुद्यांवरील माहिती संस्थेच्या सभासदांना माहिती असणे आवश्यक असल्यामुळे सदरची माहिती त्यांना देणे बंधनकारक आहे. त्यामुळे अर्जदाराचे अपील मान्य करुन अर्जदाराने मागितलेली १ ते ६ मुद्यावरील माहिती आदेश प्राप्त झाले पासून १५ दिवसांचे आंत देण्याबाबत याद्वारे निर्देश देण्यांत आले आहे. सदर्हु आदेश दिनांक १६.३.२००७ रोजी पारित केलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जिल्हा उपनिंबधक, सहकारी संस्था, भंडारा यांच्याकडे जिल्हा परिषद कर्मचारी गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादित,गणेशपूर, विद्यानगर, जि. भंडारा यांच्याकडे माहिती मागितल्यानंतर दिनांक १२.१.२००७ रोजी श्री. बी. टी. राऊत, सचिव, जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, गणेशपूर, र.नं. ३०५, विद्यानगर, जि. भंडारा. यांना पत्र देवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपील व प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येतो. त्या संदर्भात अपीलकर्ता यांनी वरील प्रकारची तक्रार क्रमांक १५४/२००७ ही सुध्दा आयोगाकडे दाखल केलेली आहे. वास्तविक प्रथम अपीलाची सुनावणीच्या वेळेस गैरअर्जदार संस्थेच्या वतीने श्री.बी.टी.राऊत, सचिव हे हजर होते. त्यावेळी संस्थेचे सचिव यांनी अर्जात मागितलेली माहिती अर्जदारास पुरविली नसल्याचे कबूल करुन सदर्हु माहिती दिनांक १२.३.२००७ नंतर देण्यांत येईल असे नमुद केलेले दिसून येते व त्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संस्थेचे सचिव हे दोषी आढळून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील व तक्रार हे दोंन्ही मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना संस्थेचे सचिव श्री.बी.टी.राऊत यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत अपीलकर्ता तक्रारदार यांनी मागितलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) संस्थेचे सचिव, श्री.बी.टी.राऊत यांनी सदरची माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन न दिल्यास त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा संस्थेचे सचिव, श्री.बी.टी.राऊत, भंडारा जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था, गणेशपूर, विद्यानगर भंडारा यांनी करावा.

३) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांनी त्यांच्या दिनांक १६.३.२००७ च्या आदेशाची संस्थेचे सचिव यांनी पालन केलेले नसल्यामुळे योग्य त्या अधिनियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव, भंडारा जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था, गणेशपूर, विद्यानगर, भंडारा यांच्याकडे तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचेकडे पोस्टाने पाठविण्यात यावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १४.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/ ९१-९३/१४.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५८/२००७.**

श्रीमती निर्मला बबनराव पोकळे,
रा. गांधीनगर, वार्ड नं. २२,
वर्धा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. ज्ञा. ना. भरगंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय,
नविन प्रशासन भवन, १ ला मजला,
मादाम कामा रोड, मुंबई - ३२.

श्री. र.गो. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रबंधक,
लोक आयुक्त कार्यालय,
नविन प्रशासन भवन, १ ला मजला,
मादाम कामा रोड, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून लोकआयुक्त कार्यालय यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) श्री.बी.एम.पोकळे, सेवानिवृत्त अवैद्यकीय पर्यवेक्षक यांच्या उपदानाची उर्वरित रक्कम देण्याबाबत केलेली कार्यवाही बद्यल माहिती. २) वरील प्रकरणावर आता पर्यंत कार्यवाही करण्यात आली की नाही व विलंबाचे कारण स्पष्ट करावे. ३) वरील बाबींबद्यल मा.लोक आयुक्त कार्यालयातील प्रकरण नं.लो.आ./कॉम/७३११, दिनांक १४.१२.१९९९ पाहावे. ४) दोषी

... २

अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली ? ५) लोकआयुक्त अधिनियमाप्रमाणे लोकआयुक्त कार्यालयाने वरील प्रकरण प्रलंबित का ठेवले व निर्णय कां घेण्यात आला नाही ? ६) वरील माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अर्जदारास पाठवावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना मुद्दे निहाय ४ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ६.२.२००७ रोजी निर्णय देण्यात आलेला असून सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असली तरी व प्रथम अपीलाचा निर्णय हा सुध्दा विहित मुदतीत दिलेला असला तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना "परिशिष्ट प्रपत्र मध्ये उपदानाची १० % रक्कम दिल्याचा कुठेही उल्लेख नाही. अपीलाची सुनावणी मुंबईस ठेवण्यात आली. ती नागपूरला ठेवण्यात आली नाही. तसे लोकआयुक्त कार्यालयाचे नागपूरकडील अपील नागपूरला असते. माझ्या सारखी वृध्द स्त्री मुंबईला जाऊ शकत नाही. शेवटी माझ्या पतीचा पैसा त्यांच्या हयातीत वरील विभागाने कां काढला नाही. सन २००० पासून वरील प्रकरणात इतका विलंब लागतो काय ? लोकआयुक्त कार्यालय प्रत्येक वर्षी मा.राज्यपाल यांच्याकडे अहवाल पाठवत असते. त्यात विलंब प्रकरणात वरील प्रकरणाचा उल्लेख आहे काय ? याबद्यल अहवाल बोलवावा म्हणजे वस्तुस्थिती प्रकट होईल. माझे पती आजारी होते. त्यांनी इतके वर्षे याबद्यल पत्रव्यवहार करुन सुध्दा शासकीय कार्यालय संबंधित नोकरीतील कार्यालय याचे पत्रावरुन असे सिध्द होते की, वरील प्रकरणातील १०% उपदान व सेवा पुस्तिकेतील त्रुटी दुरुस्त केलीच नाही. तर मग रक्कम अदा करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तरी दिलेली माहिती व अपीलीय निर्णय रद्य करुन (१) १०% उपदान केंव्हा दिले. (२) सेवा पुस्तिकेतील त्रुटी केंव्हा दुरुस्त केली याबद्यल संबंधित कार्यालयाकडून माहिती बोलावून माहिती अधिकारीकडून खुलासा करण्याचे आदेश द्यावे. (३) अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयात वरील बाबींचा कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे अपीलीय निर्णय रद्य करावा. तसेच लोकआयुक्त कार्यालयात लोकायुक्त कायदयाप्रमाणे निर्णयास इतका विलंब लागतो

तर कायदयाचा अर्थ राहील काय" ? अशी विनंती राज्य माहिती आयोगाकडे केलेली दिसून येते. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचा दिनांक १७.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी त्यांना सदरच्या प्रकरणामध्ये १०% उपदान कां मिळाले नाही किंवा त्याबद्यल कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले नाही किंवा त्याबद्यलच्या दोषी व्यक्तीवर अंतीम कारवाई केली नाही असे दिसून येते. वास्तविक त्यांच्या दिनांक १७.११.२००६ च्या अर्जामध्ये १०% उपदानाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा मुद्या नाही. मा.लोकआयुक्त यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी विचारलेली आहे व त्याप्रमाणेच उत्तर देण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा सविस्तर अशी चर्चा करण्यात आलेली आहे व माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मात्र द्वितीय अपीलात अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या संदर्भामध्ये अशी त्यांची पुन्हा पुन्हा विनंती आहे व तो नवीन मुद्या उपस्थित केलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. सदरच्या व्याख्येमध्ये माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असे असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे इत्यादीचा समावेश होतो. तसेच rlsp "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे आणि त्यात दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे त्यांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन घेणे असा हा अधिकार आहे. कोणत्या प्रकारे गुणवत्तेच्या संदर्भामध्ये निर्णय देणे हे राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षे बाहेर आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील ममोमधील मागणी ती नवीन असली तरी ती मान्य करता येण्या सारखे नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या मागणीकरिता स्वतंत्रपणे तक्रार अर्ज करुन न्याय मिळवून घेता येईल किंवा न्यायालयामध्ये जावून न्याय मागवून घेता येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विहित मुदतीत त्यांनी त्यांच्या अर्जातील मुद्याप्रमाणे असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा हा विहित मुदतीत दिलेला असून त्यामध्ये सुध्दा सविस्तर असा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांचे दिनांक १७.११.२००६ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असून प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा विहित मुदतीत दिलेला असून तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ९४-९७/१७.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६२/२००७.

श्री.बल्लभदास दिपचंदजी डांगरा (माहेश्वरी),
रा. एल.आय.जी. क्वॉर्टर नं एल ३०(५०)
"मातृकृपा" विदर्भ हाऊसिंग बोर्ड,
शांतीनगर कॉलोनी, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी.एल.कडू,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास,
स्टेशन रोड, सदर, नागपूर.

श्री. एस.पी. पासेबंद,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
(पूर्व विभाग)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. **..... उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००६ रोजी माहिती अधिकारी कार्यालय, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मी अल्प उत्पन्न गट गाळा क्रमांक एल ३० (५०), विदर्भ हाऊसिंग बोर्ड, शांतीनगर कॉलनी, शांतीनगर, नागपूरचा रहवासी असून ही शांतीनगर ले आऊट कॉलनी नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) नागपूर मंडळने सन १९६५ मध्ये मौजा-बिनाकी खसरा नंबर १४६ ते १४२ ची शांतीनगर येथे खाजगी जमीन संदादित केली या ले आऊट जमिनीवर/भूखंडावर

... २

२०० गाळे अत्यल्प उत्पन्न गट, ५० गाळे, ९६ गाळे व ४१० गाळे अल्प उत्पन्न गट व २९ गाळे व २४ दुकाने मध्यम उत्पन्न गटांतर्गत योजना वेगवेगळया वर्षामध्ये गाळे बांधून योजना राबविल्या आहेत. ही कॉलोनी (हा ले-आऊट) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) स्थानिक शाखेने राजस्व निरीक्षक मंडळ, नागपूर अधिकार अभिलेख पंजी रेकॉर्डनुसार श्री. वसंतराव अनंतराव त्रिवेदी, इतवारी, नागपूर यांच्याकडून दिनांक ३१.५.१९६५ ला खरेदी भूमिधारी विदर्भ हाऊसिंग बोर्ड, नागपूर या नावाने खाजगी संपादित केलेल्या जागेवर आहे. खाजगी संपादित केलेल्या जागेवर/भूखंडावर वेगवेगळया वर्षाच्या अंतरात गाळे बांधलेल्या (योजना राबविलेल्या) योजनांचे म्हाडा, नागपूरने ले-आऊट नकाशांच्या प्रती आपल्या कार्यालयात जेंव्हा जेंव्हा प्रस्तावित बांधकाम दर्शविणारे गाळे ले-आऊट नकाशांची स्विकृतीकरिता जमा केलेल्या नकाशांची त्यांनी सोबत दिलेल्या निवेदनांची आणि आपण जेंव्हा जेंव्हा योजना स्विकृत ले-आऊट नकाशामध्ये दर्शविलेल्या बांधकामास दिलेल्या स्विकृती योजना ले-आऊट नकाशांची व त्यासोबत म्हाडा, नागपूरला दिलेल्या पत्रांची (म्हाडा, नागपूर या शांतीनगर ले-आऊटच्या ज्या ज्या नकाशाला आपण स्विकृती दिल्या त्या नकाशांची) सर्टिफाईड कॉपीचा पत्र (नकाशे) मला शिघ्र देण्याची विनंती. सदरची माहिती पत्रोत्तर देण्यास अधिकारींना आदेश. पत्रोत्तर शिघ्र देण्याची प्रार्थना विनंती असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.३.२००६ रोजी खसरा क्रमांक १४६ ते १४९ मौजा चिखली, शांतीनगर बाबतचे कार्यक्षेत्र दिनांक २७.२.२००२ च्या शासन निर्णयानुसार नागपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यांत आलेले आहे. आपण नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आल्याचे दिसते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००६ रोजी विभागीय अपीलीय अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुनावणी झालेली दिसून येत नाही व निर्णय सुध्दा दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक २०.३.२००६ चे जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र मिळाले नाही. त्यावर सदरचे पत्र हे साध्या टपालाने पाठविले असून जावक नोंदवही मध्ये अअ/

माअ/७८६ असे आहे. त्याबाबत जावक नोंदवहीचे निरिक्षण केले असता सदरचा क्रमांक हा क्रमशः आहे व त्या क्रमांकाच्या पुढे श्री. वल्लभदास दिपचंदजी डांगरा यांचा पूर्ण पत्ता दिलेला आहे व त्यापुढे माहितीच्या अधिकारातील माहिती असा शेरा दिलेला आहे व त्यावरुन सदरचे पत्र त्यांना नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी निर्गमित केले आहे हा निष्कर्ष काढावा लागतो व विहित मुदतीत कार्यवाही केली असे दिसून येते असे असले तरी प्रथम अपीलाचे बाबत मात्र कोणत्याही प्रकारची दखल घेतली दिसून येत नाही. सुनावणी घेतली नाही त्यामुळे संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याच वेळी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिला असता तर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्याच वेळेस माहिती उपलब्ध झाली असती. परंतु प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जे जे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त झालेले आहेत ते कोणत्याही प्रकारची आपली वैधानिक जबाबदारी न्यायिकवत् पार पाडत नाहीत असे म्हणावे लागते व त्यामुळे त्या त्या प्रथम अपीलीय अधिकारी यांना सक्त ताकीद देणे सुध्दा आवश्यक आहे. राज्य माहिती आयोगाने राज्य शासनाच्या निदर्शनास ही बाब आणली आहे. राज्य शासनाने त्याबाबत आदेश सुध्दा काढले आहेत. परंतु त्याबाबत निर्णय देवून सुनावणी घेत नाही त्यामुळे सदरची ही बाब शासनाचे पुन्हा निदर्शनास आणणे जरुरीचे झालेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना ही संपूर्ण माहिती आतापर्यंत उपलब्ध होवू शकली नाही. अपीलकर्ता यांचे वतीने श्री.पवन वल्लभदास डांगरा यांनी असे सांगितले की, त्यांनी अनेक अर्ज हे नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर या सार्वजनिक प्राधिकरणाकडे दिले त्याच प्रमाणे त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडील नस्तीची पाहणी सुध्दा केलेली आहे. परंतु सदरची माहिती ही नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे नाही असे त्यांचेही निदर्शनास आलेले आहे व त्यावरुन दिनांक २०.३.२००६ रोजी जे पत्र दिलेले आहे त्या पत्रावरुन माहिती उपलब्ध नाही असा निष्कर्ष निघू शकतो व त्यामुळे विहित मुदतीत त्यांना उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. मात्र सदरचा ले-आऊट मंजूरीच्या संदर्भामध्ये नागपूर सुधार प्रन्यासचा सुध्दा संबंध असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पुन्हा नागपूर सुधार प्रन्यासचे विद्यमान माहिती अधिकारी यांनी प्रसंगी नागपूर महानगरपालिका, नागपूर किंवा म्हाडा यांच्याकडे एकत्रितपणे प्रयत्न करुन सदरची माहिती उपलब्ध

करुन देणे हे संयुक्तिक राहील. शासनाने तीन प्राधिकरणें एकाच शहरांकरिता सुरु ठेवणे व त्यांच्यात ताळमेळ नसणे हा नागरिकांचा दोष नाही व त्यामुळे तीनही प्राधिकरणांनी एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी झटकण्यांपेक्षा समन्वयाने माहिती उपलब्ध करुन देणेच संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे त्यांना विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामुळे खारीज करण्यास पात्र असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही नागपूर महानगरपालिका, म्हाडा व नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर या तिनही संस्थापैंकी एका संस्थेकडे असलीच पाहिजे एकत्रितपणे प्रयत्न करुन अपीलकर्ता यांना सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता नागपूर सुधार प्रन्यासचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्वरित कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ९८-१०१/१७.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६४/२००७.

श्री.बल्लभदास दिपचंदजी डांगरा (माहेश्वरी),
रा. एल.आय.जी. क्वॉर्टर नं एल ३०(५०)
"मातृकृपा" विदर्भ हाऊसिंग बोर्ड,
शांतीनगर कॉलोनी, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दि.मा.मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगररचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००६ रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे माहिती अधिकारी म्हणून खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. म्हाडा, नागपूरने स्वसंपादित जमिनीवर शांतीनगर ले आऊट, खसरा नं. १४६ ते १४९ ची (भूखंडावर) वसाहतमध्ये वेगवेगळया योजनांचे बांधकाम निर्माण करुन ही कॉलोनी महानगरपालिका, नागपूरला १९८५ मध्ये म्हाडा, नागपूरनी हस्तांतरीत केली तेंव्हा त्यांनी दिलेल्या पत्रांची आणि ले आऊट नकाशाची व हस्तांतरीत करतांना दिलेले भूखंड दर्शविणारे नकाशांची सर्टिफाईड कॉपी या मिळणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.३.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी खसरा क्रमांक १४६ ते १४९ मौजा बिनाकी, शांतीनगर, नागपूर येथील (म्हाडा) नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळचा ले आऊट नकाशा नागपूर महानगरपालिकेकडून मंजुर करण्यांत आला नाही. सदर ले

... २

आऊट नागपूर सुधार प्रन्यासकडून सन २००० पूर्वी मंजूर असल्यामुळे सदर नस्ती नागपूर सुधार प्रन्यासकडून मागविण्यांत आलेली आहे. तसेच आपण सादर केलेल्या अर्जामध्ये पत्रांचा क्रमांक व दिनांक नमुद केलेला नाही. सद्यास्थित ले आऊटची मुळ नस्ती नागपूर सुधार प्रन्यास कडे असून मुळ नस्ती महानगरपालिकेमध्ये प्राप्त झाल्यानंतर आपण अपेक्षिलेली माहिती आपल्याला उपलब्ध करुन देण्यांत येईल. असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००६ रोजी माहिती अधिकारी यांना पत्र लिहून सदरची माहिती ही स्थावर विभागात मिळाली अशा प्रकारची सुचना दिली होती. परंतु पुन्हा दिनांक ८.६.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी मौजा बिनाकी, खसरा क्रमांक १४६ ते १४९ या जागेवरील अभिन्यासाची मुळ नस्ती नागपूर सुधार प्रन्यासकडून प्राप्त न झाल्यामुळे मंजूर ले आऊट नकाशाची प्रमाणित प्रत आपणांस देता येणे शक्य नाही. नागपूर सुधार प्रन्यास कडून उक्त नस्ती प्राप्त होताच आपणांस नकाशाची प्रमाणित प्रत देण्यांत येईल असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००६ रोजी अपील निवेदन पुन्हा माहिती अपीलीय अधिकारी, सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. त्यासंदर्भात मात्र कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००६ च्या अर्जाप्रमाणे स्मरणपत्राचे उत्तराप्रमाणे दिनांक २७.३.२००६ रोजी ईमारत अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.३.२००६ च्या अर्जाचे संदर्भात जावक क्रमांक मनपाना/नरवि/३९३९ मधील नस्तीची या कार्यालयास आवश्यकता आहे तरी ही नस्ती त्वरित पाठविण्यांत यावी असे कळविलेले दिसते व त्यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु अंतिमतः अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध होवू शकत नाही हे सत्य तसेच राहते. नागपूर शहरामध्ये तीन प्राधिकरण असल्यामुळे व तीनही प्राधिकरणाकडून संपूर्ण गृहनिर्माणाच्या संदर्भामध्ये निर्णय घेतला गेलेला असल्यामुळे सदरच्या गृहनिर्माणाची नस्तीचे हस्तांतरण वेगवेगळया प्राधिकरणाकडे वेळोवेळी झालेले आहे व त्यामुळे अर्जदाराने अशा प्रकारे

माहिती मागितली तरी ती माहिती उपलब्ध होवू शकत नाही किंवा एका प्राधिकरणाकडून दुसऱ्या प्राधिकरणाकडे माहिती आहे अशा प्रकारे उत्तर देवून मोकळे होतात. सदरच्या प्रकरणात सुध्दा नागपूर सुधार प्रन्यास कडून माहिती मागितली, नागपूर सुधार प्रन्यासकडे जेंव्हा माहिती मागितली तेंव्हा महानगरपालिकाकडे माहिती असावी असे उत्तर दिलेले आहे व यातून अर्जदार यांना माहिती उपलब्ध होत नाही. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००६ रोजीही महानगरपालिकाकडे स्थावर विभागाकडे माहिती उपलब्ध झाली असे निदर्शनास आणले होते तरी सुध्दा सदरची माहिती स्थावर विभागाकडे आहे किंवा नाही याबाबतची तपासणी केलेली दिसून येते नाही व त्यामुळेच महानगरपालिकातील जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती स्थावर विभागाकडे तपासून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील. आज अपीलकर्ता यांचे नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे मागितलेल्या माहितीचे संदर्भात सुध्दा अपील सुनावणी आहे. योगायोगाने त्यांच्याकडे सदरची माहिती पुर्णपणे १९८५ मध्ये हस्तांतरीत केली आहे अशी माहिती उपलब्ध झालेली आहे व ही माहिती अपील क्रमांक १४६२/२००७ मध्ये निर्देश दिल्याप्रमाणे नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे नाही ती अपीलकर्ता यांनी सुध्दा तपासून पाहिले आहे. तरी ती महानगरपालिकाकडे स्थावर विभागाकडे अभिलेख असावयास पाहिजे या गृहितकावर जनमाहिती अधिकारी यांनी तपासणी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी महानगरपालिकाच्या स्थावर विभागाकडून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन घेवून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीचा शोध घेण्याकरिता अपीलकर्ता यांना तारीख व वेळ कळविण्यात यावी व त्यांच्या सोबत सदरच्या माहितीचा शोध घेवून त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) सदरच्या माहितीचा शोध घेतांना नागपूर सुधार प्रन्यासचे जनमाहिती अधिकारी यांना सुध्दा बरोबर घेवून एकत्रपणे दोनही संस्थेकडे माहितीचा शोध घेण्यात यावा व तसे जनमाहिती अधिकारी यांनी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर माहिती अधिकारी यांना निश्चित तारीख व वेळ कळविण्यात यावा व शोघ घेण्यात यावा.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १७.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१०२-१०५/१७.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४/२००८.

श्री.पांडूरंग गुलाबराव सवडदकर,
रा. सावरकरनगर, राऊत वाडी,
वार्ड क्र. २, नविन चिखली,
ता.चिखली, जि. बुलढाणा - ४४३ २०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्र. एल. डोंगरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निरिक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, मोर्शी रोड,
अमरावती - ४४४ ६०३.

श्री. एस.एस.उमाळे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
(आय.टी.आय.) बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. परंतु सदरच्या अपील प्रकरणामध्ये प्रपत्र "अ" व "ब" हे दाखल केलेले नसल्याने अपीलकर्ता यांना सदरचे अपील हे परत करण्यात आले होते व पुन्हा त्यांनी दिनांक ४.२.२००८ रोजी प्रपत्र "अ" व "ब" सोबत दाखल केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी, कार्यालय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, आय.टी.आय., बुलढाणा यांच्याकडे मा.संचालक यांचे परिपत्रक व शासन निर्णयाच्या सत्यप्रती मिळणेबाबत एकूण ६ परिपत्रके दिनांक १६.६.१९८२, दिनांक २१.७.१९८३, दिनांक

... २

२९.६.१९९४, दिनांक १८.१२.१९८५, दिनांक १०.१.१९८६ व दिनांक ३०.५.१९८५ अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे ही नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.८.२००६ रोजी मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सन १९८२ ते १९८६ (माहितीचा तपशील अ.क्र. १ ते ६) या कालावधीचे परिपत्रक व शासन निर्णयाच्या सत्यप्रती या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००६ रोजी मा.उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.९.२००६ रोजी देण्यात आलेला असून त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ व ६ (दोन मुद्यांची) माहिती उपलब्ध करुन देण्यांत येत आहे व उर्वरित मुद्या क्रमांक २ ते ५ (चार मुद्यांची) माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही. याकरिता वरिष्ठ कार्यालयात विचारणा करण्यांत आली आहे. त्यामुळे अपीलकाराचे दिनांक ८.८.२००६ रोजीचे सदरहु अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे दिनांक २४.७.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.८.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले असल्यामुळे त्यांना विचारणा केल्यावर त्यांनी असे सांगितले की त्यांचे कार्यालय हे १९८५ मध्ये सुरु झालेले असल्यामुळे त्यांच्या कार्यालयामध्ये त्या कालावधीतील परिपत्रके, शासन निर्णयाच्या प्रती उपलब्ध नसल्यामुळे तसे कळविण्यात आले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या कार्यालयामध्ये मुद्या क्रमांक १ व ६ वरील माहिती उपलब्ध आहे व इतर मुद्यांचे बद्यल माहिती नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे त्या निर्णयाच्या संदर्भामध्ये विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांचे कार्यालय अमरावती येथे नवीन सुरु झाले असल्यामुळे सदरची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसून त्यांना दिनांक २५.८.२००६ रोजी संचालक, (व्य.शि.) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१. यांच्याकडे सदरच्या परिपत्रकांच्या प्रती

व शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र दिलेले होते. तसेच दिनांक २९.८.२००६ रोजी सुध्दा श्री.व्ही.एस.बुटले, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अमरावती, श्री.के.एस.विसाळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला, श्री. आर.डी.भोयर, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ व श्री.एस.एस.उमाळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बुलढाणा यांच्याकडे व दिनांक २.९.२००६ रोजी पुन्हा मा.संचालक, (व्य.शि.) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१. यांच्याकडे पत्र पाठवून एक-एक प्रत त्वरित पाठविण्यात यावी याकरिता पत्र पाठविलेले दिसून येते व त्यानंतरच दिनांक २.९.२००६ रोजी सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीचे पत्र अपीलकर्ता व माहिती अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बुलढाणा यांना दिलेले दिसून येते व त्यानंतर सदरचा निर्णय दिलेला दिसून येतो. दिनांक १३.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध माहितीच्या संदर्भात व टपाल खर्चाचे संदर्भात २३/- रुपये शुल्क कार्यालयाकडे प्रदान करावे असे कळविलेले दिसून येते व त्याच दिवशी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन उत्तरवादी यांनी माहिती देण्याचे टाळाटाळ केलेली नसून माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता प्रामाणिक प्रयत्न केलेले दिसून येतात असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भात त्यांना ४ मुद्यांवरील परिपत्रकांचे संदर्भात आजही माहिती उपलब्ध झालेली नाही त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांना दिनांक ९.५.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांचेकडून अनुक्रमांक १ ते ५ या संचालनालयातील संबंधित कार्यासनास उपलब्ध नाही. अनुक्रमांक ६ ची प्रत उपलब्ध असून ती सोबत जोडली आहे. असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरची माहिती कार्यासनाकडे उपलब्ध नाही असे कळविले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेले परिपत्रके व शासन निर्णय हे शासनाचे धोरण असल्यामुळे ती जुनी असली तरी संचालनालयामध्ये मात्र उपलब्ध असावयास पाहिजे व त्यामुळे संबंधित कार्यासनाकडे उपलब्ध नसली तरी संचालनालयाच्या प्रशासकीय विभागाकडे ती उपलब्ध असावयास पाहिजे व त्यांचेकडून ती उपलब्ध करुन घेण्यास पुन्हा संचालनालय यास पत्र लिहून सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याचप्रमाणे दुसरे संचालनालय यांचेकडे सुध्दा विचारणा करणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.७.२००६ च्या अर्जामधील मुद्या क्रमांक २ ते ५ मध्ये मागितलेल्या परिपत्रकांच्या प्रती या व्यवसाय शिक्षण संचालनालय व व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडील प्रशासकीय विभागातील (Select file मधून) मागवून ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१०६-१०९/२०.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०२/२००७ व अपील क्रमांक १५०३/२००७.**

श्री. श्रीराम (दादा) टिचकुले,
मु.पो. केसलवाडा, ता. लाखनी,
जि. भंडारा - ४४१ ८०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दुष्यंत सिडाम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, सिताबर्डी, नागपूर.

श्री. जी.एच.हजारे,
जनमाहिती अधिकारी तथा
सरव्यवस्थापक,
दि. भंडारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि.
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त १२.३.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १५०२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या अनुषंगाने भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक ही खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्थांची संघीय संस्था (फेडरल सोसायटी) आहे ? अ) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था. ब) औद्योगिक सहकारी संस्था. क) विणकर सहकारी संस्था. ड) ग्राहक सहकारी संस्था. इ) प्रोसेसिंग सहकारी संस्था. ई) बलुतेदार सहकारी संस्था. फ) दुग्ध उत्पादक सहकारी संस्था. ग) जंगल कामगार

... २

सहकारी संस्था. घ) तालुका खरेदी विक्री सहकारी संस्था. च) मत्स्य पालन सहकारी संस्था. ज) मजुर सहकारी संस्था. छ) गृहनिर्माण सहकारी संस्था. त्र) इतर सहकारी संस्था (बकरी पालन, कुक्कुट पालन इत्यादी) यासंबंधी शासनाने/सहकार खात्याने काही आदेश जारी केलेले आहेत काय ? त्या आदेशाची सत्यप्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.६.२००६ रोजी माहिती उपलब्ध नाही म्हणून व्यवस्थापक, भंडारा जिल्हा सहकारी संस्था, भंडारा जिल्हा यांनी कळवून सदरची माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, भंडारा यांचेकडून उपलब्ध होवू शकेल असे कळविलेले दिसते. त्यामुळे दिनांक ११.७.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ६.९.२००६ रोजी प्रथम अपील सादर केलेले दिसून येते. सदरच्या दोन्ही प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २८.२.२००७ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना अपील अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक ही विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची संघीय संस्था (फेडरल सोसायटी) आहे. परंतु सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहितीच्या अर्जामध्ये ज्याप्रमाणे माहिती पाहिजे ती त्याप्रमाणे नाही. संस्थेच्या संदर्भामध्ये माहिती विचारलेली आहे त्या संस्थेच्या संदर्भामध्ये स्पष्टपणे होय किंवा नाही असे उत्तर द्यावयास पाहिजे होते. यावर उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची संघीय शाखा आहे व त्यामुळे त्याप्रमाणे आपणास कळविण्यात आलेले आहे. इतर विचारलेल्या संस्थेच्या संदर्भामध्ये त्यांच्या कार्यालयात कोणत्याही प्रकारचे नियम किंवा शासन निर्णय नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ज्याअर्थी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेंच्या निवडणूकांकरिता इतर सहकारी संस्थाकडून संचालक निवडून येतात त्याअर्थी तसे शासनाचे निर्णय असावयास पाहिजे. त्यामुळे सदरच्या त्यांच्या अपेक्षेप्रमाणे उत्तरवादी यांनी शासनाकडून तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा सुचना केल्या आहेत व त्या

प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व तसे उत्तरवादी यांनी सुध्दा मान्य केले आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १५०३/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२००६ रोजी व्यवस्थापक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा यांच्याकडे माहिती मागितली होती. तसेच दिनांक २८.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते व त्यासंदर्भात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे त्यांनी सांगितल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १५०२/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.६.२००६ चा माहितीचा अर्ज व दिनांक ६.९.२००६ चे प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भामध्ये फेडरल सोसायटीच्या सभासदत्वासाठी असलेले शासन निर्णय किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अंतर्गत असलेले संबंधित नियम हे शासनाकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १५०३/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २०.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/११०-११२/२०.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५१/२००७.**

श्री.प्रेमदास रेकाजी राठोड,
बी-८, लिबर्टी एनक्लेव्ह, जेपीनगर रोड,
मालवियानगर, खामला, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर.झेड्.सिद्दीकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी अतिरिक्त आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. प्रकाश डी.उराडे,
तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, (लोककर्म विभाग),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००६ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक १८.१०.२००६) खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मे.सेठ कन्स्ट्रकशन कंपनी सध्या करीत असलेल्या (जी कामे पूर्ण झालेली नाहीत) महापालिका लोककर्म विभागाच्या अखत्यारीतील सर्व प्रकारच्या रस्त्यांची यादी, संबंधित कामाच्या कार्यादेशाची तारीख, मंजूर रक्कम, रस्त्याची रुंदी, त्यावरील रस्तादुभाजक नसलेल्या ठिकाणांची संख्या, कार्यादेशात नमूद मुदतीत काम पूर्ण केले नसल्यास त्याची कारणे इत्यादी माहिती मला देण्यात यावी. २) नागपूर महानगरपालिका लोककर्म विभागाकडून आतापर्यंत करण्यात आलेल्या व सध्या सुरु असलेल्या

... २

सर्व प्रकारच्या रस्त्यांवरील अ) रस्तादुभाजक, ब) फूटपाथ व क) रोड क्रॉसिंग (कुठे ठेवावे व कुठे ठेवू नये) याबाबत कोणत्या निकषांचा आधार घेण्यात आला. या निकषांची यादी, हे निकष कोणत्या तारखेला, कोणी निश्चित केले व वरील अ, ब, क ही तिन्ही कामे निकषानुसारच झाली आहेत, हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे याबाबत मला माहिती देण्यात यावी. याच तीन मुद्यांसाठी सरकार, महापालिका किंवा अन्य स्वायत्त संस्थेचे काय नियम आहे, त्या नियमाचे नाव व या नियमाची पुस्तिका कुठे उपलब्ध होऊ शकते याविषयीची माहिती मला देण्यात यावी. ३) दिनांक ११ जुलै, २००६ ते ३० सप्टेंबर, २००६ या कालावधीत नागपूर महानगरपालिका लोककर्म विभागाचे प्रभारी अधीक्षक अभियंता म्हणून श्री. प्र.द.उराडे यांनी आणि कार्यकारी अभियंता (स्लम) म्हणून श्री. जांभूळकर यांनी स्वाक्षरी केलेल्या सर्व कार्यालयीन नस्तींची आणि स्वाक्षरी केलेल्या अन्य सर्व कार्यालयीन दस्तऐवजांची तारीखवार व दस्तऐवजांची विषय निहाय माहिती. त्यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख, स्वाक्षरी केलेली नस्ती व अन्य कार्यालयीन दस्तऐवजाचा विषय, संबंधित नस्ती व कार्यालयीन दस्तऐवजाचा क्रमांक इत्यादी माहिती (यादी) देण्यात यावी. ४) दिनांक ११ जुलै २००६ ते ३० सप्टेंबर २००६ या कालावधीत लोककर्म विभागाचे तत्कालीन प्रभारी अधिक्षक अभियंता, श्री.प्र.द.उराडे हे रजा, दौरा व इतर कामांमुळे ज्या दिवशी कार्यालयात गैरहजर होते त्या तारखा व कार्यालयात गैरहजर राहण्याची कारणे ही माहिती मला देण्यांत यावी. ५) दिनांक ११ जुलै २००६ ते ३० सप्टेंबर २००६ या कालावधीत कार्यकारी अभियंता, (स्लम) श्री.जांभूळकर रजा, दौरा व इतर कामांमुळे ज्या दिवशी कार्यालयात गैरहजर होते त्या तारखा व कार्यालयात गैरहजर राहण्याची कारणे ही माहिती मला देण्यात यावी. ६) श्री.प्र.द.उराडे आणि कार्यकारी अभियंता, श्री.जांभूळकर यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून आजपर्यंत कोण-कोणत्या तारखांना, कोणाच्या शिफारशींवरुन कोण-कोणत्या पदांवरुन कोण-कोणत्या पदांवर बढती देण्यात आली याची माहिती मला देण्यात यावी. ७) श्री.प्र.द.उराडे आणि कार्यकारी अभियंता, श्री.जांभूळकर यांच्याबाबत दिनांक १ जानेवारी १९९६ पासून आजपर्यंत नियमबाहय काम केल्याच्या आरोप करुन त्यांच्यावर कारवाई करण्याविषयीच्या किती तक्रारी, कोण-कोणत्या तारखांना, कोण-कोणत्या कामांबाबत, कोण-कोणत्या पदांवर असतांना महापालिकेला प्राप्त झाल्या, तक्रारकर्त्यांची नावे व या तक्रारीवर काय कारवाई करण्यात आली याची माहिती मला देण्यात यावी. ८) श्री.प्र.द.उराडे आणि कार्यकारी अभियंता, श्री.जांभूळकर यांना दिनांक १

... ३

जानेवारी १९९६ पासून आजपर्यंत कोण-कोणत्या तारखांना, कोणाच्या शिफारशींवरुन कोण-कोणत्या पदावर असताना कारणे दाखवा नोटीशी देण्यात आल्या, कोण-कोणत्या तारखांना, कोणाच्या शिफारशींवरुन कोण-कोणत्या पदावर असतांना त्यांच्यावर आर्थिक दंड (दंडाच्या रकमेसह) वा अन्य शास्तीची कारवाई करण्यात आली याची माहिती मला देण्यात यावी. ९) दिनांक ११ जुलै २००६ ते ३० सप्टेंबर २००६ या कालावधीत तत्कालीन प्रभारी अधीक्षक अभियंता श्री.प्र.द.उराडे व कार्यकारी अभियंता (स्लम) श्री.जांभूळकर ज्या दिवशी कार्यालयीन वा इतर कोणत्याही कामासाठी नागपूर महानगरपालिकेच्या हदीबाहेर (मुख्यालयाबाहेर) गेले त्या तारखा, नेमक्या कोणत्या ठिकाणी गेले ते ठिकाण, यासाठी वापरलेल्या वाहनाचा प्रकार, क्रमांक व मुख्यालयाबाहेर जाण्यासाठी त्यांनी कोणाची परवानगी घेतली याची माहिती मला देण्यात यावी. १०) श्री. प्र.द. उराडे आणि कार्यकारी अभियंता श्री.जांभूळकर यांना दिनांक १२ ऑक्टोंबर २००५ पासून आजपर्यंत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अर्जदाराला योग्य माहिती दिली नाही, चुकीची माहिती दिली म्हणून कोण-कोणत्या तारखांना, कोण-कोणत्या अधिकाऱ्यांनी लेखी समज दिली व कोण-कोणत्या अधिकाऱ्यांनी केंव्हा व किती आर्थिक दंड ठोठावला व दंडाची रक्कम त्यांनी केंव्हा जमा केली याची माहिती मला देण्यात यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.११.२००६ रोजी मुद्या क्रमांक १ संबंधित माहिती विस्तृत स्वरुपाची असल्या कारणाने संकलित करणे सुरु आहे. माहिती संबंधीतांनकडून प्राप्त होताच पुरविण्यात येईल. मुद्या क्रमांक २ मुख्य रस्त्याला येऊन मिळणाऱ्या जोड रस्त्याच्या संख्येनुसारच रस्ता दुभाजक नसलेली ठिकाणे निश्चित करण्यात येतात किंवा काही प्रसंगी वाहतुक विभाग मार्फत सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. मुद्या क्रमांक ३ ते १० याबाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अभिप्रेत नाही. पुन्हा दिनांक २३.११.२००६ रोजी प्रकल्प संचालक (स्लम) तथा माहिती अधिकारी, महानगरपालिका नागपुर यांनी दिनांक १३.१०.२००६ चा अर्ज या कार्यालयात प्राप्त दिनांक ३०.१०.२००६ तसेच कार्यालयीन पत्र दिनांक १४.११.२००६ चा संदर्भ देऊन मुद्या क्रमांक बाबत माहिती संकलित करणे सुरु आहे. संकलित झालेली माहिती पुरविण्यात येत आहे. मुद्या क्रमांक २ बाबत माहिती आपणांस देण्यात आलेली आहे. मुद्या क्रमांक ३ ते १० बाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अभिप्रेत नाही. असे आपणास या अगोदरच कळविण्यात आले आहे.

तरी सुध्दा जी माहिती उपलब्ध आहे ती आपणांस सोबत देण्यात येत आहे. सदरची माहिती दिनांक २४.११.२००६ रोजी प्राप्त असा शेरा दिसून येतो. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक २०.११.२००६ रोजी दाखल करण्यात आलेले दिसते. सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित झाले नाही. परंतु त्यांनी दिनांक ७.१२.२००६ रोजी त्यांचे स्वतःचे म्हणणे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.५.२००७ रोजी दिलेला असून सदरच्या निर्णयामध्ये मुद्या क्रमांक १ बाबत तत्कालीन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (लोककर्म) यांनी विविध झोन मधून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली आहे. ती माहिती त्यांनी तपासून व एकत्रित अभिप्राय तयार करुन देणे अभिप्रेत होते. परंतु ती जशीच्या तशी दिल्याने प्रत्येक अधिकाऱ्यांचे अभिप्राय वेगवेगळे आलेले आहेत. त्यामुळे या माहितीची शहानिशा करुन एकत्रित उत्तर अपीलार्थीस १५ दिवसांचे आंत द्यावे. तसेच शासनाचे निर्धारित केलेल्या दराप्रमाणे प्रति पृष्ठ रुपये २/- या दराने किंवा कागदपत्र उपलब्ध करुन देण्यांसाठी प्रत्यक्षात जो खर्च येईल ती रक्कम वसूल करुन मुद्या क्रमांक ३ ते १० बाबत नियमानुसार माहिती देता येते ती देण्यांत यावी. जी माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नसेल त्याप्रमाणे अपीलार्थीना कळवावे व सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाप्रमाणे दिनांक २०.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते व तत्पूर्वी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भात दिनांक २३.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अर्जाची तारीख १३.१०.२००६ (अर्ज घेण्यास जनमाहिती अधिकाऱ्यांचा नकार/विवेचन खाली दिले आहे/ प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडून दखल नाही किंवा साधी समजही नाही). टपालाने अर्ज १६.१०.२००६ (धंतोली टपाल कचेरीतून नोंदणीकृत डाकेने अर्ज पाठविला/त्यासाठी आलेल्या २५/- रुपयांच्या शुल्काची पावती द्वितीय अपीलासोबत संलग्न करण्यात आली आहे) जनमाहिती अधिकाऱ्यांचे पहिले पत्र दिनांक १४.११.२००६ (एका मुद्यांवर अभिप्राय/एका मुद्यांवर माहिती नंतर देण्याचे आश्वासन व बाकी ७ मुद्यांवरील माहिती कायद्याला अभिप्रेत नसल्याचे मत) जनमाहिती अधिकाऱ्यांचे दुसरे पत्र दिनांक २७.११.२००६ (प्रथम अपील सादर झाल्याची कुणकुण लागल्यानंतर अधिक्षक अभियंता यांना सहाय्यक

जनमाहिती अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या पत्रांच्या प्रती प्रकल्प संचालक (स्लम) यांनी पाठविल्या/प्रत्येक जनमाहिती अधिकाऱ्यांचा लगेच माहिती देण्यास नकार व काही मुद्यांवर अभिप्रायात विसंगती) जनमाहिती अधिकाऱ्यांचे तिसरे पत्र दिनांक १२.४.२००८ (या पत्रात नवी अशी काहीही माहिती नाही. पूर्वी सर्व सहा. अधिकाऱ्यांचे पत्र वेगवेगळे पाठविले होते. यावेळी ते एकत्रित करुन पाठविले एवढेच.) प्रथम अपीलाचा अर्ज दिनांक २०.११.२००६. प्रथम अपीलावरील सुनावणीचे पत्र दिनांक २७.११.२००६ (७.१२.२००६ रोजी सुनावणी होती/त्यासाठी लेखी म्हणणे घेऊन अपिलार्थी सुनावणीसाठी हजर/लेखी म्हणणे त्याच दिवशी कार्यालयात सादर केल्याची व सुनावणी पुढे ढकलल्याचे पुरावे/पण कार्यालयीन कारण सांगून सुनावणी पुढे ढकलली/तरीही अपिलार्थी एकदाही सुनावणीसाठी हजर झाला नाही असे चुकीचे मत प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने आदेशात नोंदविले आहे) प्रथम अपीलावरील आदेश पारित दिनांक ३०.५.२००७ (अपील दाखल झाल्यापासून ६ महिने व १० दिवसानंतर) प्रथम अपीलावरील निर्णय रवाना दिनांक ३०.६.२००७ (आदेश पारित केल्यापासून १ महिन्यानंतर) प्रथम अपीलावरील निर्णय प्राप्त दिनांक १८.७.२००७ (अपील दाखल झाल्यापासून ७ महिने १९ दिवसानंतर) द्वितीय अपील दाखल दिनांक १७.३.२००७. मागितलेली माहिती, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचा प्रतिसाद व त्यावर माझे म्हणणे, मला पाहिजे असलेल्या माहितीपैकी १% ही माहिती प्राप्त झालेली नाही व जी प्राप्त झाली आहे ती फक्त आणि फक्त गोंधळ, संभ्रम निर्माण करणारी व दिशाभूल करणारी आहे. जनमाहिती अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय अर्ज न घेण्याचा फतवा अतिशय आक्षेपार्ह आहे. कारण जनमाहिती अधिकारी हजर असल्याशिवाय खालचा कुणीही अधिकारी/कर्मचारी अर्ज घेत नाहीत. जनमाहिती अधिकारी हजर असलेच तर संपूर्ण अर्ज वाचून काढतात, तोपर्यंत अर्जदाराला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहावे त्याप्रमाणे ताटकळ उभे राहावे लागते व शेवटी अर्जातील १० पैकी एखादा मुद्या दुसऱ्या विभागाशी संबंधित असल्यास अर्जही स्विकारला जात नाही, असा माझा अनुभव आहे. माहिती अधिकारी कायद्याची ही अवहेलना थांबविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची व आरटीआयचे अर्ज स्विकारण्यासाठी एकच खिडकी वा सेल निर्माण करण्यास मनपाला आदेश देण्याची विनंती आहे. कार्यालयात वेगवेगळया फायलींमध्ये असलेली माहिती फक्त एकत्रित करण्यासाठी तीन-तीन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनाएवढया शुल्काची मागणी अर्जदाराला करणे हे या कायद्याचे उल्लंघन आहे.

... ६

प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यानेही प्रतिपृष्ठ २/- रुपये किंवा प्रत्यक्ष खर्च येईल एवढी रक्कम वसूल करुन माहिती देण्याचा आदेश देणे हाही बेजबाबदारपणाच आहे. प्रथम अपील प्राप्त झाल्यानंतर अवघ्या ७ दिवसांत सुनावणी आयोजित करण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे. पण सुनावणीच्या तारखेला अपीलार्थी हजर झाल्यावर सुनावणी पुढे ढकलणे व ६-७ महिन्यानंतर कधी तरी आदेश पारित करुन त्यात अपीलार्थी एकदाही उपस्थित झाला नाही असे मत नोंदविण्यामागचा प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांचा हेतु अपीलार्थीवर अन्याय करणारा आहे. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्यास व जी माहिती देता येत नाही त्याबाबत अपिलार्थीला कळविण्याचे आदेश दिले होते. पण आजपर्यंत माहितीही मिळाली नाही आणि जी माहिती देता येत नाही त्याबाबत काहीही समजले नाही. मुद्दा क्रमांक १ अद्याप माहिती अप्राप्त (३ कर्मचाऱ्यांच्या वेतना ऐवढया शुल्काची बेकायदेशीर अपेक्षा), मुद्दा क्रमांक २ माहिती अद्याप अप्राप्त (फक्त वेगवेगळे परस्पर विसंगत अभिप्राय मिळाले), मुद्दा क्रमांक ३ माहिती अद्याप अप्राप्त (३-४ महिने लागतील असे कळविण्यात आले होते), मुद्दा क्रमांक ४ माहिती अद्याप अप्राप्त, मुद्दा क्रमांक ५ फक्त किरकोळ रजेबाबतचे एक पत्र मिळाले. दौरा व गैरहजेरीची माहिती मिळाली नाही. मुद्दा क्रमांक ६ माहिती अद्याप अप्राप्त, मुद्दा क्रमांक ७ माहिती अद्याप अप्राप्त, मुद्दा क्रमांक ८ माहिती अद्याप अप्राप्त, मुद्दा क्रमांक ९ माहिती अद्याप अप्राप्त, मुद्दा क्रमांक १० चुकीची माहिती दिली/कारण माझ्याच एका अपीलावर जनमाहिती अधिकाऱ्याला दंड झाला आहे/ते म्हणतात दंड वगैरे झाला नाही. मुद्दा क्रमांक ३ ते १० याबाबत मला हवी असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अभिप्रेत नाही, अशी अफलातून माहिती मला देण्यात आली आहे. या कायद्यात कोणती माहिती द्यावी आणि कोणती माहिती दिली जाऊ शकत नाही (कलम ८ पोटकलम १) याविषयी स्पष्ट तरतुदी आहेत. यापैकी या कायद्याबाहेर ठेवण्यात आलेल्या माहिती मध्ये मी मागितलेली माहिती येत नाही. कारण मी मागितलेल्या व माहिती अधिकाऱ्यांने नाकारलेल्या मुद्दा क्रमांक ३ ते १० मधील माहितीमुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका पोहचण्याची शक्यता नाही किंवा आंतरराष्ट्रीय संबंध बिघडण्याची शक्यता नाही. याशिवाय संसद वा विधिमंडळाला नाकारली जाईल अशी कोणतीही बाब मला नाकारलेल्या माहितीत नाही. त्यामुळेच कायद्यातील कोणत्या तरतुदीनुसार माहिती अभिप्रेत नाही याचा स्पष्ट उल्लेख जनमाहिती अधिकाऱ्याने केलेला नाही. कोणत्याही प्रकारची माहिती नाकारवयाची झाल्यास त्याविषयीची सविस्तर पार्श्वभूमी व कायद्यातील

कोणत्या कलमाद्वारे माहिती नाकारली त्याचा स्पष्ट उल्लेख होणे आवश्यक आहे. तसे न करण्यामागे केवळ माहितीचा अधिकार नाकारणे हाच जनमाहिती अधिकाऱ्याचा हेतू दिसतो. त्यामुळे मुद्या क्रमांक ३ ते १० ची माहिती नाकारल्याबद्यल जनमाहिती अधिकाऱ्याविरुध्द उचित कारवाई करण्यात यावी आणि मला हवी असलेली मुद्या क्रमांक १ ते १० पर्यंतची संपूर्ण माहिती विशिष्ट कालमर्यादेत निःशुल्क देण्याचे आदेश देण्यात यावे अशी विनंती आहे.

३. सर्वात प्रथम अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीपैकी काही माहिती मोघम व व्यापक स्वरुपाची आहे व त्यामुळे सदरची माहिती संकलित करण्याच्या दृष्टिने जनमाहिती अधिकारी यांना निश्चित विलंब लागणे हा साहजिक आहे. अर्जदाराने सुध्दा माहिती मागतांना निश्चित अशी माहिती मागणे अपेक्षित असते व त्यामुळेच त्यांना दिनांक १४.११.२००६ च्या पत्राप्रमाणे उत्तर देण्यात आलेले दिसून येते. मात्र माहिती संकलन करण्यासाठी रुपये ५,७००/- खर्च येईल व त्याकरिता जे कारण दिलेले आहे ते कारण मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अपेक्षित नाही व जी माहिती कागदपत्रांचे स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाची आहे ती प्रतिपृष्ठ रुपये २/- प्रमाणे उपलब्ध करुन द्यावयाची असते व त्यामुळे रुपये ५,७००/- हे अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नाही. अपीलकर्ता यांना दिनांक १४.११.२००६, दिनांक २३.११.२००६ व दिनांक २०.७.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे मुद्या क्रमांक १ ते ९ पर्यंत त्यांना माहिती अप्राप्त आहे व मुद्या क्रमांक १० मधील माहिती ही चुकीची आहे असे म्हणणे आहे. त्याऐवजी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयातून सन १९९६ पासून उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण करणे शक्य असल्यामुळे दस्तऐवजांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत मुद्या क्रमांक १ ते २ मधील माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक ३ ते ९ मधील माहिती ही मोघम व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याचे दृष्टिने सन १९९६ पासूनची नस्ती स्वतः पाहणी करुन शक्य असतील त्या दस्तऐवजांच्या छायांकिंत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी. दिनांक १३.१०.२००६ च्या अर्जामध्ये मागितलेली माहितीचे प्रमाणे मुद्दे निहाय माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलकर्ता यांनी सदरच्या दस्तऐवजांचे निरिक्षणाकरिता जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासन ३० दिवसाचे आंत तारीख व वेळ कळविण्यात यावी व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदरची नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.५.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/११३-१२०/२१.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५३/२००७ व अपील क्रमांक १५५८/२००७.

श्री.प्रभाकर रामचंद्र गणविर,
रा. ९६, नालंदा नगर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा व सत्र न्यायालय,
नागपूर.

श्री. अनिल पंढोरिया,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी व दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. दिनांक २३.४.२००७ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक १५५८/२००७ हे दिनांक ३१.५.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती ही बाब उत्तरवादी यांनी आयोगाचे निदर्शनास आणल्यामुळे सदरच्या अपीलात हे दोनही पक्षकार एकच असल्यामुळे व त्याबाबत अपीलकर्ता यांनी संमती दिलेली असल्यामुळे द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १४५३/२००७ मध्ये दिनांक २२.२.२००७ रोजी १) खाते निहाय चौकशी कोणत्या व्यक्तींची केली जाते. २) परवाना धारक टंकलेखकाची खात निहाय चौकशी कोणत्या नियमा अंतर्गत केल्या जाऊ शकते. ३) "Deliquent" हा शब्द कुणाकरिता वापरण्यात येतो. अशी माहिती शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायाधिश कार्यालय, न्याय मंदीर, नागपूर यांचेकडे मागितली असून टपालाद्वारे

... २

घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना तीनही मुद्यांवर शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचे कार्यालयात दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.३.२००७ रोजी जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी अपील खारीज केले आहे असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे मागितलेली माहितीचा व प्रथम अपीलाचे निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य अशी आहे. द्वितीय अपीलाचा निर्णय योग्य आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १५५८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांचेकडे १) जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथे केंद्र शासनाचा २००५ चा माहितीच्या अधिकाराचा कायदा कधी लागू झाला. २) त्याची अंमलबजावणी कोणत्या तारखेपासून सुरु झाली. ३) आज दिनांक १७.३.२००७ पर्यंत माहितीच्या अधिकारासंबंधी शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी हयांच्या नावांचे फलक इमारतीच्या "दर्शनी" भागी कां लावण्यात आले नाही. ते फलक तळमजल्यापासून तर सातव्या मजल्यापर्यंत कोठेही नाहीत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे दिनांक २२.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही नियमाप्रमाणे नाही म्हणून अर्ज फेटाळला जात आहे अशी माहिती माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी कळविलेले दिसते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी अपीलीय अधिकारी म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून

येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.४.२००७ रोजी प्रबंधक तथा शासकीय माहिती अधिकारी, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना खालील प्रमाणे कळविण्यात आलेले दिसते. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथे केंद्र शासनाचा २००५ चा माहितीच्या अधिकाराचा कायदा मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे नियम लागू झाल्यापासून लागू झाला. त्याची अंमलबजावणी दिनांक ९ डिसेंबर, २००६ पासून सुरु झाली. दिनांक १७.३.२००७ पर्यंत माहितीच्या अधिकारासंबंधी शासकीय माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नावाचे फलक दर्शनी भागी का लावण्यात आले नाहीत कारण शासनाचा अनुदान फंड उपलब्ध नसल्यामुळे फलक दर्शनीभागी लावण्यात आले नाहीत असे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.३.२००७ रोजी जो निर्णय दिलेला आहे. तो माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारच्या कायद्याच्या तरतुदींचा विचार न करता दिलेला दिसून येतो. तसेच प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा प्रथम अपील हे अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे दाखल केले असते व त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाने त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे अपेक्षित आहे व सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा त्या प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला असला पाहिजे व तसा निर्णय कळवितांना सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय हा कोणत्या अधिकाऱ्यांनी केला आहे हे नमुद करणे आवश्यक असते. परंतु तसे दिनांक ४.४.२००७ रोजीच्या शासकीय माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविल्याचे दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात जी माहिती मुद्या क्रमांक ३ मध्ये दिलेली आहे ती उडवाउडवीचे उत्तर दिलेले दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या हा न्यायालयांना सुध्दा लागू आहे व त्यामुळे न्यायालयाने अधिनियमाचे तरतुदीचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे हे आवश्यक आहे. हे सदरच्या दिनांक ४.४.२००७ च्या पत्राचे अनुषंगाने निदर्शनास आणणे आवश्यक वाटते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा भारताच्या संसदेने भारताच्या संविधानाप्रमाणे पारित केला व सर्व भारत क्षेत्रात लागू केला आहे व त्या तरतुदीच्या अंमलबजावणी बाबत न्यायालयाचे प्रशासकीय विभागाने अशा प्रकारे उडवाउडवीचे उत्तर देणे अपेक्षित नाही. याबाबत जे नियमाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी असतील

... ४

किंवा विभाग प्रमुख असतील त्यांनी संबंधित अधिकारी यांना समज देणे आवश्यक आहे. यापुढे न्यायालयाचे प्रशासकीय विभाग अशा प्रकारची काळजी घेईल अशी अपेक्षा आहे. अपीलकर्ता यांनी आता पर्यंत माहिती अधिकारामध्ये जे अर्ज व अपील दाखल केलेले आहे ते त्यांच्या विरुध्द केलेल्या चौकशीच्या निर्णयामुळे त्यांनी दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता हे शासकीय सेवेत नव्हते व वकील संघाच्या कार्यालयामध्ये त्यांना प्रमाणित टायपिस्ट म्हणून सिव्हील मॅन्युअल प्रमाणे परवानगी दिलेली होती असे दिसून येते. परंतु त्यांचे वर्तणुकीमुळे त्यांची चौकशी होवून त्यांना परवानगी नाकारली होती व त्याकरिता त्यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये व सर्वोच्च न्यायालयामध्ये सुध्दा रिट पिटीशन दाखल करुन न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु दोन्ही रिट पिटीशन हे फेटाळण्यात आले आहे असे उत्तरवादी यांनी निदर्शनास आणले व अपीलकर्ता यांनी त्यास दुजोरा दिलेला आहे यावरुन अपीलकर्ता सदरची माहिती ही व्यापक जनहिताच्या दृष्टिने मागत नसून स्वहिताचे दृष्टिने मागत आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व हा एक प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गैरवापर आहे असे म्हणता येईल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २१.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१२१-१२४/२१.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१६/२००७, अपील क्रमांक १५१७/२००७, अपील क्रमांक १५१८/२००७, अपील क्रमांक १५१९/२००७, अपील क्रमांक १५२०/२००७, अपील क्रमांक १५२१/२००७, अपील क्रमांक १५२२/२००७, अपील क्रमांक १५२३/२००७.**

श्री.विजय राजाभाऊ चिंचोळकर,
रा. १७, विद्याविहार, प्रतापनगर,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. भ. पिंगट,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, (आस्था)
जलसंपदा विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२.

श्री. बी. बी. गावळे,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव, (दक्षता)
जलसंपदा विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२.

श्री. प्र. प्र. गोसावी,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
जलसंपदा विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२. **..... उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६, दिनांक १३.१२.२००६, दिनांक ७.१२.२००६, दिनांक ९.१२.२००६, दिनांक १४.१२.२००६, दिनांक १६.१२.२००६, दिनांक ६.१२.२००६ व दिनांक ५.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये आठ द्वितीय

... २

अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या आठही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २२.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १५१६/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००६ (कार्यालयास प्राप्त दिनांक ४.९.२००६ रोजी) खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अ) विषयांकित प्रकरणी श्री. वि. रा. चिंचोळकर तत्कालीन का.अ., "कामावर रुजू न होता दिर्घ मुदतीच्या अनधिकृत रजेवर गेल्याचे प्रकरणी" शासनाने त्यांची एक वेतनवाढ एका वर्षाकरिता रोखल्याची शिक्षा देताना जारी केलेल्या आदेशातील ३ ऱ्या परिच्छेदात वरील वाक्याचा, अंतर्भाव आहे. हया शिक्षे प्रकरणी श्री.चिंचोळकर हयांनी शासनास तीन प्रतिवेदने सादर करुन चौकशीच्या वैधतेबाबत, निर्णयासाठी घेतलेले आधार चुकीचे असल्याबाबत, शासन नियमांचे प्रकाशात घटनाचा अर्थ चुकीने व्यक्त केल्याबाबत, पत्र व्यवहार केला होता. परंतु शासनाने एकही पत्रास उत्तर दिलेले नाही. त्यामुळे वरील प्रकरणाशी संबंधित शासकीय फाईल्स मधील नोंदी, व त्या नोंदविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचे नावासह, माहिती पुरविण्यात यावी. परिच्छेदात, "उपरोल्लेखीत दिनांक १६.६.१९९९ च्या आदेशासह", "त्यांनी आदेश पालनार्थ केलेल्या गैर कृत्याबाबत", "सदर मुळ अर्ज ३११/९९ खारीज केला" अशा तीन वाक्यांचा ही उल्लेख आहे. वरील उल्लेख करतांना, मॅट निर्णयाच्या प्रतीचा आधार शासनाने घेतला असावा. त्यामुळे वरील वाक्यांचा उल्लेख स्पष्टपणे दर्शविणाऱ्या मॅट निर्णयाची प्रत वरील वाक्ये अधोरेखित करुन मला पुरविण्यात यावी. वरील वाक्य जशीची तशी, निर्णयात नसल्यास, शासनाने मॅट, नागपूर हयांचे आदेशातील वाक्यांमध्ये केलेला बदल कोणत्या अधिकारात, कोणत्या कागदपत्रांच्या आधारावर केला, त्याच्या प्रती पुरवून कारणासह कळवावे. अशी आधार भूत कागदपत्र उपलब्ध नसल्यास, मॅट निर्णयाचा विपर्यास करीत, शासनाची दिशाभूल करुन मुळ वाक्यांचा अर्थ बदलून, श्री.चिंचोळकर हयांचे प्रकरणात, शासनास चूकीचे निर्णय घेण्यास बाध्य करणाऱ्या अधिकाऱ्याची नावे, संबंधित नोंदींचा प्रत्यक्ष उल्लेख दर्शवित झालेल्या कार्यवाहीची फाईल्स नोटींग्ज इत्यादीसह सर्व कागदपत्रांच्या प्रती पूरविण्यात याव्यात. ब) वरील आदेशातील हया परिच्छेदातील, "श्री. वि. रा. चिंचोळकर, का.अ. याच्या प्रथम २ वेळा झालेल्या बदल्या संदर्भात ..... त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करता येईल असा अंतिम निर्णय देवून" हे वाक्य आहे. त्यामुळे वरील

शब्दांचा अंर्तभाव असलेली विभागीय चौकशी शासनाने, ७ वर्षे पूर्ण होऊनही कां सुरु केली नाही हयाबाबत प्रकाश टाकणारा खुलासा, विभागीय चौकशी सुरु केली असल्यास त्या चौकशीचे संपूर्ण संदर्भ, कागदपत्रे हयांचा पुरवठा करण्यात यावा. क) वरील परिच्छेदातील, "श्री.वि.रा.चिंचोळकर, का.अ. त्यांच्या प्रथम २ वेळा झालेल्या बदल्या संदर्भात" हया वाक्यातील, "प्रथम २ वेळा झालेल्या बदल्या" म्हणजे "नेमके कोणते दोन बदली आदेश" हयाबाबत मॅट निर्णयाचे प्रकाशात शासन स्तरावर झालेले प्रतिपादन, त्याबाबत आधार दर्शविणाऱ्या फाईल्स वरील नोंदी, व त्या संदर्भात प्रतिपादन करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नांव, ही सर्व माहिती देण्यात यावी. हया प्रकरणी मंत्रालयात कामकाज झालेले फाईल क्रमांक जेटीओ ११००/(४४५/२०००) आवर्ग-१, मधील नोटींग्जच्या नोंदी, इत्यादी सर्व कागदपत्रे पुरविण्यात यावीत. ड) श्री.वि.रा.चिंचोळकर तत्कालीन का.अ. हयांच्या १९९८-९९ साली झालेल्या बदली प्रकरणात अ) पहिला बदली आदेश शासनाने दिलेला दिनांक १२.५.१९९८ चा, ब) हया मुळ बदली आदेशात बदल दर्शविणारा मु.अ.पा.वि. नागपूर हयांनी दिलेला दिनांक ५.६.१९९८ चा दुसरा आदेश, क) दिनांक ३०.७.१९९८ चा शासन आदेश, असे तीन आदेश तारखांचा क्रम पाहता निर्गमित झालेले आहेत. त्यामुळे "प्रथम दोन आदेश हया मॅट, नागपूर हयांच्या दिनांक ७.३.२००० च्या निर्णयाचा अर्थ दिनांक १२.५.१९९८ चा शासन आदेश व दिनांक ५.६.१९९८ चा मु.अ.पा.वि. हयांचा आदेश," हा होतो. मॅट, नागपूर हयांच्या निर्णयात "हया दोनच परस्पर विरोधी, आदेशामुळे संभ्रम निर्माण झाला" असा उल्लेख देखील आहे. त्यामुळे "प्रथम दोन बदली आदेश" हया वाक्यांचा, "शासन स्तरावर प्रतिपादीत झालेला नेमका अर्थ" प्रतिपादनचा आधार, यासह सखोल माहिती दर्शविणारी कागदपत्रे पुरविण्यात यावीत. इ) दिनांक ५.६.२००२ च्या आदेशाचया परिच्छेद ५ मधील उल्लेखानुसार श्री.वि.रा. चिंचोळकर हयांना देण्यात आलेल्या शिक्षेचे, i) प्रशासकीय हितास्तव, दिलेले दिनांक ५.६.१९९८ चे आदेश त्यांनी स्विकारले नाहीत, व बदलीचे ठिकाणी रुजू झाले नाहीत, ii) अनधिकृतपणे रजेवर राहिले, शासकीय कामात खोळंबा केला, हेच दोन आरोप शासनाने ठेवले आहेत. शासन आदेश दिनांक १२.५.१९९८ अस्तित्वात असतांना, शिक्षा ठोठावतांना दिनांक ५.६.१९९८ चेच आदेशाचे पालन करणे आवश्यक असल्याचा काढलेल्या निष्कर्षास, आधार दर्शविणारे नियम, मु.अ.पा.वि. नागपूर हयांचे शासन मंजूरी शिवाय दिलेले आदेशच अंतीम होते, हे दर्शविणाऱ्या नियमाच्या प्रती देण्यात याव्यात. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे

घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये रुपये ३१/- एवढा खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपीलात मात्र दिनांक ३०.९.२००६ रोजी कळविलेल्या खर्चाच्या संदर्भातील उल्लेख दिसून येत नाही. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १२.१०.२००६ रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३०.९.२००६ माहितीच्या खर्चाचे करिता रुपये ३१/- भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १६.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना नोंदणीकृत पोच देय डाकेने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २२.११.२००६ ला पोस्टाने प्राप्त झालेली आहे असा शेरा त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी विश्लेषण करुन निर्णय प्रक्रियेतील कारणमिमांसा विचारलेली दिसून येते व त्यातून पुन्हा खुलासा विचारलेला दिसून येतो.

३. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावा असे कळविले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता विलंब झाला नाही हा निष्कर्ष काढता येतो. मात्र खर्चाचा भरणा करावा हे पत्र प्राप्त होण्यापूर्वीच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये पुन्हा खर्चाचा भरणा केलेला नाही त्याबद्यलचे स्मरण केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्या नंतरच त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीचे संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे द्वितीय अपीलामध्ये त्यांनी खुलासे मागितलेले दिसून येतात. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात माहिती उपलब्ध असते उदा.:- अभिलेख, दस्तऐवज इत्यादी ती त्याच स्वरुपात आहे ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. उपलब्ध झालेल्या माहितीचे आधारे कोणत्याही प्रकारचा खुलासा किंवा जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारची माहिती मागणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी

त्यांच्या दिनांक २४.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १५१७/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००६ रोजी (दिनांक ११.८.२००६ स्पीड पोस्टाने पाठविले) खालील प्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. अ) केस क्रमांक ३११/९९ प्रकरणी मॅट, नागपूर यांनी निकाल पत्राच्या पृष्ठ क्रमांक १४ वर निर्देशित केल्याप्रमाणे "श्री.वि.रा.चिंचोळकर, तत्कालीन का.अ. यांच्या दिनांक १७.६.१९९८ ते ३१.३.१९९९ पर्यंतचा कार्यकाळ नियमित करण्यापूर्वी आवश्यक वाटल्यास दिनांक १२.५.१९९८ चे शासनादेश किंवा ५.६.१९९८ चे मु.अ.पा.वि., नागपूर यांचे स्थानिक व्यवस्थेबाबतचे आदेश या दोन पैकी कोणता आदेश वैध होता हे ठरविण्यासाठी चौकशी करण्याची मुभा" शासनास दिल्याने हया प्रकरणी निर्णय घेण्यासाठी शासनाने चौकशी समिती स्थापित करुन चौकशी केंव्हा सुरु केली. चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव काय, चौकशीबाबत श्री.चिंचोळकरांना बाजु मांडण्यासाठी दिलेल्या संधी दर्शविणारा झालेला पत्र व्यवहार, चौकशीचे कार्यवृत्त व काढलेला निष्कर्ष इत्यादी सर्व बाबींच्या कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्यात. ब) वरील प्रमाणे चौकशी झाली नसल्यास, मॅट, नागपूर हयांनी आदेशित केलेली निर्देशित चौकशी करण्याची गरज नसल्याची खात्री, शासनाने ज्या आधारावर केली ते दर्शविणारी कागदपत्रे, नियमांच्या आधारसह पुरविण्यात यावीत. क) "मु.अ. पा.वि.नागपूर हयांनी श्री.वि.रा.चिंचोळकर यांचेवर बजावलेल्या दोषारोप पत्राची, नियम १० खालील चौकशी हीच मॅट, नागपूर यांच्या निर्देशाप्रमाणे असल्याचा" निष्कर्ष शासन स्तरावर काढतांना घेतल्या गेलेल्या कागदपत्रांचा आधार दर्शविणारी कागदपत्रे, तसेच हया प्रकरणी अधिकाऱ्यांनी शासन फाईल्स मध्ये नोंदविलेल्या शेऱ्यांचा अंतर्भाव असलेल्या नोंदींची, कागदपत्रे पुरविण्यात यावीत. वरील ब व क हयातील चौकशी बाबत वस्तुस्थिती शासनाचे निदर्शनात आणल्यास शासनाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कार्यवाही करेल काय याबाबत माहिती पुरवावी. ड) मॅट, नागपूर हयांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे चौकशी केल्यास, होणाऱ्या निर्णयाच्या परिणामास घाबरुन, चौकशी न करता, न्यायाधिकरणाने उल्लेख न केलेल्या प्रकरणी, चौकशी केल्याचे भासवून, श्री.चिंचोळकर यांच्या बदली प्रकरणात, शासन व मु.अ.पा.वि.नागपूर

यांच्या चुका लपविण्यासाठी श्री.चिंचोळकर यांना जबाबदार ठरवित शिक्षा करण्याच्या उद्देशाने बदली प्रकरणी मॅट मध्ये गेल्याने अद्दल घडविण्यासाठी शासनादेश दिनांक १२.५.१९९८ व मु.अ. आदेश दिनांक५.६.१९९८ हयांची मॅट निर्देशित चौकशी करण्याचे धैर्य शासन दाखऊ शकलेले नाही. हीच चौकशी टाळण्यामागील शासन उद्देश असल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे चौकशी टाळण्या प्रकरणी शासन स्तरावर झालेल्या निर्णय प्रक्रियेच्या सर्व कागदपत्रांची सविस्तर माहिती देण्यात यावी व हया प्रकरणी नव्याने चौकशी करण्याची शासनाची तयारी असल्यास तसे कळविण्यात यावे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दिनांक १६.९.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९.८.२००६, दिनांक १०.८.२००६ व दिनांक १२.८.२००६ चे अर्जाचे अनुषंगाने व दिनांक ९.८.२००६ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती सारखीच असल्याचे कळवून माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २४.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे माहितीचे विश्लेषण करुन मागितलेली असल्यामुळे तसे त्यांना दिनांक १९.१०.२००६ रोजी कळविण्यात आलेले आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलात पुन्हा उपलब्ध झालेल्या माहितीचे संदर्भात त्यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपातील खुलाश्यासह स्पष्ट करण्याचे निर्देश द्यावेत अशी विनंती केली आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १५१८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००६ रोजी माहिती अधिकारी यांना खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्री.एल.पी.इंगळे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा धरण विभाग, अमरावती हयांचे विरुध्द १९९९-२००१ हया काळात उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या कौडीण्यपूर वितरीकेचा गाळ काढणे/मुरुम टॉपींग करणे सुरु न झाल्याने हया कामाचे भुगतानाचे वेळी, कार्यकारी अभियंताने मोजमापाची तपासणी (देयक भुगताना पूर्वी) करण्याच्या प्रकरणी बजावण्यात आलेल्या दोषारोप

... ७

पत्रांच्या व त्याप्रकरणी चौकशी होवून झालेल्या शिक्षेच्या आदेशाच्या कागदपत्रच्या प्रती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दिनांक ९.८.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी श्री.एल.पी.इंगळे, कार्यकारी अभियंता यांच्या विरुध्द दोषारोपपत्र बजावून प्रकरणाची छाननी चालू आहे. सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली नसल्याने केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१)(ज) मधील तरतुदीनुसार आपण मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती आपणास देता येत नाहीत असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक २५.८.२००६ रोजी दाखल केलेले आहे. प्रथम अपीलामध्ये त्यांनी जे मुद्ये उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांच्या संदर्भामध्ये अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी "अपील अर्जास नमूद केलेले श्री.एल.पी.इंगळे, कार्यकारी अभियंता, यांच्याबाबत दोषारोपपत्र व शिक्षादेश दिलेले प्रकरण व माहितीच्या अधिकारान्वये आपण माहिती मागितलेले प्रकरणे हे सर्वस्वी वेगवेगळे आहे. दिनांक ९.८.२००६ च्या पत्रान्वये आपणांस दिलेली माहिती योग्य आहे. त्यामुळे आपले अपील फेटाळला आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलातील हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना शिस्तभंगाचे कार्यवाहीचे संदर्भामध्ये गुणवत्तेच्या संदर्भामध्ये विश्लेषण करुन अभिप्राय मागितल्याचे दिसून येते व त्यातही श्री.एल.पी.इंगळे यांचे विरुध्द सुरु असलेल्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये दिलेली माहिती चुकीची आहे अशा प्रकारचे निवेदन केलेले दिसून येते. परंतु त्याकरिता अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारे आयोगाकडे खुलासा किंवा पुरावा दाखल केलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते २००६ मध्ये दिलेले आहे. आज २००८ मध्ये सदरची विभागीय चौकशीची श्री.एल.पी.इंगळे यांची कार्यवाही पूर्ण झालेली आहे असे माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही असे सांगितले त्यामुळे अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १५१८/२००७ हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

... ८

६. अपील क्रमांक १५१९/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००६ रोजी माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) अरुणावती प्रकल्पाच्या डाव्या मुख्य कालव्याच्या कोळी मानयर क्रमांक ६ च्या बांधकामाच्या प्रथम देयक भुगतानासंबंधी खालील माहिती पुरविण्यात यावी. अ) बांधकामाच्या करारनाम्याप्रमाणे कंत्राटदारास दर महिन्याला एक देयक देणे आवश्यक असते. सदर बांधकामाचे कार्यादेश दिनांक ६.६.२००० ला दिल्याने कंत्राटदाराने साधारणतः ८.६.२००० ला काम सुरु केल्याचे गृहीत धरल्यास दिनांक ७.७.२००० पर्यंत झालेल्या कामाचे देयक देण्याची जबाबदारी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांची होती काय. ब) त्यामुळे दिनांक ७.७.२००० पर्यंत पूर्ण झालेले बांधकामाच्या नोंद दिलेल्या मोजमापाची मो.मा.पुस्तकात नोंद केली असतांना एल.ओ.सी.मागण्यापूर्वी देयक मंजूर झाल्यावर मागणी नोंदविण्याचा नियम असतांना दिनांक ४.७.२००० पर्यंतची मापे बांधकामाच्या प्रथम देयकात अंतर्भुत करण्यास तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना कोणत्या नियमाने मज्जाव केला होता. हयाबाबत तसेच कार्यकारी अभियंताची भूमिका नियमबाहय नसल्याची खात्री करणाऱ्या नियमांच्या प्रती पुरविण्यात याव्यात. तसेच द.प.अमरावती हयांच्या हया प्रकरणाच्या चौकशी अहवालाची प्रत पुरविण्यात यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी दिनांक ९.१०.२००६ रोजी अरुणावती प्रकल्पाच्या डाव्या मुख्य कालव्याच्या कोळी मानयर क्रमांक ६ च्या बांधकामाच्या प्रथम देयक भुगतानासंदर्भात श्री. र.ना.पिसे, कार्यकारी अभियंता यांच्या विरुध्द दोषारोपपत्र बजावले असून सदर प्रकरणाची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याने केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१)(ज) मधील तरतुदीनुसार आपण मागितलेली माहिती व कागदपत्रांच्या प्रती आपणास देता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरचा निर्णय अपीलकर्ता यांना दिनांक १८.१०.२००६ रोजी प्राप्त झाला आहे अशी त्यांनी नोंद केलेली दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.११.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु दिनांक २४.११.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे असे दिसून येते. सदरच्या प्रकरणी अजूनपर्यंत चौकशी सुरु असल्यामुळे व कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नसल्यामुळे आजही त्या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

७. अपील क्रमांक १५२०/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२००६ रोजी माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्री.वि.रा.चिंचोळकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता हयांचे दिनांक १७.६.१९९८ ते ३१.३.१९९९ पर्यंतच्या काळात शासकीय आदेशाचे पालन न केल्याचे दर्शवून अनधिकृतपणे कामावरुन गैरहजर राहिल्या प्रकरणी शिस्तभंग कार्यवाही करीत शासनाने एक वेतन वाढ एका वर्षाकरिता रोखल्याची विषयांकित आदेशाप्रमाणे शिक्षा घोषित केली होती. वरील शिक्षेवर श्री. चिंचोळकर हयांनी दिनांक ४.७.२००२, दिनांक २०.१२.२००२ व दिनांक ५.५.२००३ ला प्रतिवेदन सादर केले होते. परंतु शासनाने त्यावर उत्तर न दिल्याने खालील मुद्यांवर माहिती पुरविण्यात यावी. अ) शासनाने दिनांक १२.५.१९९८ रोजी जारी केलेल्या बदली आदेश स.मु.अ-१ हया पदावर पदस्थापना केल्याबद्यल होता. त्याप्रमाणे श्री.चिंचोळकर दिनांक १७.६.१९९८ ला कामावर रुजू होण्यासाठी उपस्थित झाले असतांना त्यांनी शासकीय आदेशाचे पालन न केल्याचा निष्कर्ष शासनाने कोणत्या आधारावर काढला. त्याच्या प्रती पुरविण्यात याव्यात. ब) शासन सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.२०/९७/बारा, दिनांक २७.११.१९९७ च्या परिच्छेद ५ प्रमाणे कार्यकारी अभियंता पदाचे वेतन रुपये ३०००/- चे वर असल्याने, श्री.चिंचोळकर हयांची बदली करण्याचे अधिकार मा.मंत्री महोदय हयांना म्हणजे शासन स्तरावर होते. त्यामुळे शासन बदली आदेश वैध असल्याचे समजण्यात व पालनात त्यांची कोणती चुक झाली ? हया उलट मु.अ.पा.वि., नागपूर हयांनी दिनांक ५.६.१९९८ ला स्थानिक व्यवस्थेचे काढलेले आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.११.१९९७ च्या परिपत्रकाचे उल्लंघन करुन काढलेले असल्याने व त्यामुळे शासनाने दिलेली मुळ पद स्थापना बदलत असल्याने, मुख्य अभियंतांचे आदेशाचे पालन करणे शक्य नव्हते ही

वस्तुस्थिती शासनाने नजरे आड का केली हयाबाबत माहिती देण्यात यावी. तसेच अशी वस्तुस्थिती असतांना श्री.चिंचोळकर कामावरुन गैरहजर राहिल्याचा निष्कर्ष शासनाने कोणत्या कागदपत्रांच्या आधारे काढला हया सर्वांच्या प्रती पुरविण्यात याव्यात. क) वरील दोन आदेशामुळे निर्माण झालेला संभ्रम वेळीच निवारण करण्याची जबाबदारी शासनाची असतांना, वारंवार पत्रव्यवहार करुनही शासनाने त्याबाबत स्पष्ट भूमिका न घेण्याची कारणे कृपया कळवावीत. तसेच मॅट, नागपूर हयांनी दिनांक ७.३.२००० च्या निर्णयाच्या पृष्ठ क्रमांक १४ वरील निर्देशाप्रमाणे शासन आदेश दिनांक १२.५.१९९८ व मुख्य अभियंता आदेश दिनांक ५.६.१९९८ बाबत निर्णय घेण्यासाठी करावयाची चौकशी आजपर्यंत शासनाने का केली नाही. हयावरुन शासन स्वतःच्या व मुख्य अभियंताच्या चुका लपविण्यासाठी वरील कार्यवाही करीत असल्याचे स्पष्ट आहे. मात्र श्री.चिंचोळकर असहाय्य कर्मचारी असल्याने त्यांचेवरच उलट वार करीत दुसऱ्याच प्रकरणी चौकशीचे नाटक करुन, शिक्षा घोषित करण्यात आली. त्यामुळे मॅट, नागपूर हयांचे निर्णयानुसार दिनांक १२.५.१९९८ व दिनांक ५.६.१९९८ च्या आदेशावर चौकशी टाळण्याची कारणे स्पष्ट करणारी माहिती द्यावी. ड) दिनांक ५.६.१९९८ चे आदेश स्विकारुन ते मॅट, नागपूर येथे केस क्रमांक ३११/९९ हया प्रकरणात जोडले असतांना दिनांक ५.६.१९९८ चे आदेश श्री.चिंचोळकर हयांनी स्विकारले नसल्याचा निष्कर्ष शासनाने कोणत्या आधारावर काढला हे दर्शविणारी कागदपत्रे पुरविण्यात यावीत. ई) दिनांक ३०.७.१९९८ चे शासन आदेश श्री.चिंचोळकरांना हस्तांतरीत झाले नसल्याची तक्रार वारंवार करण्यात आली असतांना, त्याबाबत चौकशी करण्याची किंवा मुख्य अभियंता हयांचा खुलासा विचारण्यांची गरज शासनास का वाटली नाही. त्यामुळे हया प्रकरणी मुख्य अभियंता तर्फे झालेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, तसेच श्री.चिंचोळकर हयांनी आदेश स्विकारण्यास नकार दिल्याच्या कागदपत्रांच्या प्रती इत्यादी सर्व पुरविण्यात याव्यात. फ) वरील सर्व वस्तुस्थिती असतांना श्री.चिंचोळकर हयांचेवर अनधिकृतपणे गैरहजर राहिल्याचा दोषारोप कोणत्या घटनेमुळे सिध्द झाला हे दर्शविणारी कागदपत्रे, शासन स्तरावरील फाईलींच्या नोंदी, चौकशीचे कार्यवृत्त दर्शविणारी कागदपत्रे पुरविण्यात यावीत. ग) दिनांक १७.६.१९९८ ते दिनांक ३१.३.१९९९ हा कालावधी श्री.चिंचोळकर हयांना अर्ज न मागता, रजा मंजूर करुन शासनानेच नियमित केला. त्याचप्रमाणे शासन आदेश दिनांक ५.६.२००२ नुसार श्री.चिंचोळकर अनधिकृतपणे गैरहजर असल्याचा निष्कर्ष करीत शिक्षा घोषित केली. वरील दोंन्ही परस्पर विसंगत भूमिका शासनाने

कोणत्या आधारावर घेतली ते दर्शविणारी कागदपत्रे पुरविण्यात यावी व त्या प्रकरणाची माहिती पुरवावी. घ) वरील संपूर्ण घटनाक्रमावरुन श्री.चिंचोळकर शासन आदेशाचे पालन करण्यास स्वतः प्रयत्न करीत असतांना, तसा निष्कर्ष मॅट, नागपूर हयांनी दिनांक ७.३.२००० च्या निर्णयाचे पृष्ठ क्रमांक १४ वर नोंदविला असतांना मुख्य अभियंता, पा.वि., नागपूर हयांच्या चुका लपविण्यासाठीच श्री.चिंचोळकर मॅट, नागपूर मध्ये गेल्याबद्यल त्यांना अद्यल घडविण्यासाठी दिनांक १२.५.१९९८ च्या शासन आदेशाचे पालन करण्यासंबंधी मुद्याम संभ्रम निर्माण करुन वरील कृती झाल्याचे दिसते. तरी हयावर शासन भूमिका स्पष्ट करणारी माहिती द्यावी. च) शासनाने कार्यकारी संचालक, ता.पा.वि.मं. जळगांव हयांना लिहलेल्या पत्र क्र. जेटीओ-११००/(४४५/२०००) आ. वर्ग-१, दिनांक २०.१.२००३ ची प्रत व हया पत्राचे प्रकरणी झालेल्या शासन नस्तीतील क्रमवार नोंदीच्या प्रती पुरविण्यांत याव्यात. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना दिनांक १२.८.२००६ रोजीच्या अर्जातील मुद्या क्रमांक "फ" बाबत दक्षता-३ कार्यासनाकडून कार्यवाही अपेक्षित आहे. त्यासंदर्भात त्यांना या पत्रान्वये कळविण्यात येत आहे. तरी त्या मुद्यातील मागणी संदर्भात आपण परस्पर दक्षता-३ कार्यासनाशी पत्र व्यवहार करावा. आपल्या निवेदनातील या कार्यासनाशी संबंधित असल्याचे दर्शविलेल्या मुद्या क्रमांक "च" संदर्भात प्रती पाठविण्याचा रुपये ३५/- एवढा खर्च आहे. कोषागारात चलनाद्वारे जमा करुन चलनाची प्रत या विभागास पाठवावी. तदनंतर सदर माहिती आपणास पाठविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याच अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.९.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी श्री.भ.बु.गावडे यांनी दिनांक १९.८.२००६, दिनांक १०.८.२००६ व दिनांक १२.८.२००६ चे अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जापैकी दिनांक १०.८.२००६ व दिनांक १२.८.२००६ च्या अर्जातील मुद्ये सारखेच आहेत. सबब सदर दोन्ही अर्जान्वये मागितलेली माहिती एकच आहे. सदर माहिती व दिनांक ९.८.२००६ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती सोबत जोडली आहे. सदरचे पत्र दिनांक २३.९.२००६ ला रजिस्टर पोस्टाने प्राप्त झाल्याची नोंद अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २४.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर सुध्दा दिनांक ७.१०.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी आपल्या दिनांक १८.८.२००६ च्या अर्जास अनुलक्षून संदर्भीय शासन पत्रांकडे आपले लक्ष

... १२

वेधण्यात येत आहे. उक्त अर्जातील फ संदर्भात आपणांस आस्थापना कार्यासनाकडील निर्णय अपेक्षित होता किंवा कसे याबाबत संभ्रम असल्यामुळे आता संदर्भ क्रमांक २ वरील पत्रास अनुलक्षून ज्या कागदपत्रांच्या आधारे विभागीय चौकशी सुरु करण्यात आली. तसेच विभागीय चौकशी संदर्भात निर्णय घेण्यात आला. याबाबतच्या शासन स्तरावरील नोंदीची कागदपत्रे (झेरॉक्स प्रत) सोबत पाठवित आहे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना सदरची प्रत दिनांक १७.१०.२००६ रोजी प्राप्त झालेली आहे असे त्यांनी नोंद केलेली आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १९.१०.२००६ रोजी प्रथम अपीलात उपस्थित केलेले मुद्दे हे माहितीचे विश्लेषण असल्याचे कळवून अपीलकर्त्यांचे मागणीनुसार उपलब्ध माहितीचे संस्करण किंवा मागणीप्रमाणे विशिष्ट स्वरुपात देणे अपेक्षित नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाची प्रत सुध्दा अपीलकर्ता यांना दिनांक २७.१०.२००६ रोजी पोस्टाने पाठविली. अपीलकर्ता यांना माहिती मिळाली आहे अशी त्यांनी नोंद केलेली आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक १०.११.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांना दुसरे अपील दाखल केलेले आहे. सदरच्या दुसऱ्या अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २७.११.२००६ रोजी त्यांनी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

८. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यातील अनेक मुद्ये असल्यामुळे दोन कार्यासनाची सदरची माहिती असल्यामुळे व त्यामुळेच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला असे माहिती अधिकारी यांनी सांगितले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता हे वेळोवेळी थोडी थोडी माहिती मागत असतात व त्यातून पुन्हा विश्लेषणात्मक मुद्ये उपस्थित करीत असतात व त्यांना याकरिता असे कळविण्यात आले होते की, या प्रकरणातील संपूर्ण नस्ती त्यांना उपलब्ध करुन देता येईल व याकरिता त्यांनी रुपये ५१०/- चा खर्चाचा भरणा करावा व ही बाब दिनांक २७.११.२००६ च्या अपीलकर्ता यांच्या पत्रावरुन स्पष्ट होते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले होते व रुपये ५१०/- चा भरणा

केलेला नाही असे सांगितले आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी शास्ती लादण्याची जी विनंती केलेली आहे ती त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्याच संदर्भातील कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली दिसून येत नसल्यामुळे त्यांची विनंती मान्य करता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

९. अपील क्रमांक १५२१/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००६ रोजी श्री.वि.रा.चिंचोळकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता हयांच्या सन १९९५-९६, १९९६-९७, १९९७-९८ व २०००-०१ हया काळातील गोपनीय अहवाल सोबत जोडलेल्या "कच्च्या टिप्पणांच्या प्रती" (इफीमोरल रोल) पुरविण्यात याव्यात. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते.

१०. अपीलकर्ता यांच्या सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांनी त्यांच्या गोपनीय अहवालाचे संदर्भामध्ये व मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खालील प्रमाणे कळविलेले दिसून येते. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएफआर-१२९५/प्र.क्र.३६/९५/तेरा, दिनांक १.२.१९९६ च्या परिशिष्ट-अ मध्ये गोपनीय अहवालासंबंधी एकत्रित सूचना दर्शविल्या आहेत. त्यातील सूचना क्रमांक १० नुसार गोपनीय अहवालासोबत कच्चे टिपण ठेवण्यात येते. या कच्च्या टिपणाचा नमुना परिशिष्ट-क मध्ये विहित केलेल्या नमुन्यात ठेवण्यात येतो. कच्चा टिपणाच्या नमुन्यातील तळटिपनुसार "जर गोपनीय अहवाल प्रतिकूल शेरे नसतील तर हे कच्चे टिपण गोपनीय अहवाल पाठविल्यानंतर १ वर्षानंतर नष्ट करावे व जर या कच्चा टिपणाच्या आधारे गोपनीय अहवालामध्ये प्रतिकूल शेरे असतील तर त्या प्रतिकूल शेऱ्या विरुध्दच्या अभिवेदनावर निर्णय झाल्यानंतर हे कच्चे टिपण नष्ट करावे" अशी तरतूद आहे. आपण सन १९९५-९६ च्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेऱ्या विरुध्दच्या शासन निर्णया विरुध्द महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ६१६/०४ च्या परिच्छेद निहाय अभिप्रायांमध्ये देखील उपरोक्त नियमातील तरतूद न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात आली होती. निकाल पत्रात मा. न्यायाधिकरणाने या बाबींचा सर्वकष विचार करुन आपली याचिका खारिज केली आहे, हे आपणांस विदीत

आहेच. सबब, शासन नियमातील तरतूद विचारात घेता आपली कच्चे टिपण (EPHEMERAL ROLL) पुरविण्याची विनंती हया टप्प्यावर आता, मान्य करता येणार नाही. परंतु सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१०.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम करण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००६ रोजी दुसरे प्रथम अपील दाखल केले व त्याप्रमाणे अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ८.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अनुक्रमे दिनांक १८.९.२००६ व दिनांक ३०.१०.२००६ रोजी दिलेला निर्णय कायम केलेला आहे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे पुन्हा समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी गोपनीय अहवालाचे संबंधी सुरु असलेल्या न्यायालयीन कार्यवाहीत या माहितीचा महत्वाचा भाग पाहता "कच्चे टिपण असल्यास ते पुरविणे किंवा नसल्यास गोपनीय अहवालासोबत ते नसल्याचा दाखला देणे" ही माहिती देण्याचे जलसंपदा विभाग वारंवार टाळीत आहेत. त्यामुळे ही अपील दाखल करुन आपणांस विनंती करण्यात येते की, वरील सर्व गोपनीय अहवाल आयोगा समक्ष बोलावून तपासणी करुन त्याबाबत योग्य माहिती देण्याचे निर्देश जलसंपदा विभागास द्यावेत अशी विनंती केलेली आहे. त्यासंदर्भामध्ये सोबतची कागदपत्रे घेवून आयोगास सुचना देण्यात यावी अशा प्रकारचे आदेश हे निर्देश काढण्यापूर्वीच देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे श्री.वि.रा.चिंचोळकर यांचे गोपनीय अहवालाच्या नस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सोबत कच्चे टिपणीची नोंद आढळून येत नाही व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.९.२००६ रोजी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. तसेच अपीलकर्ता यांचे गोपनीय अहवाल हा सन १९९५ ते २००१ या सालातील असल्यामुळे कच्चे टिपणाचे संदर्भामध्ये जर गोपनीय अहवालात प्रतिकुल शेरे दिले नसतील तर हे कच्चे टिपण गोपनीय अहवाल पाठविल्यानंतर एक वर्षानंतर नष्ट करावे व जर या कच्च्या टिपणाच्या आधारे गोपनीय अहवालामध्ये प्रतिकुल शेरे असतील तर त्या प्रतिकुल शेऱ्याविरुध्दच्या अभिवेदनावर निर्णय झाल्यानंतर हे कच्चे टिपण नष्ट करावे अशा स्पष्ट सुचना कच्चे टिपण याकरिता परिशिष्ट-क हा जो नमुना दिलेला आहे त्या नमुन्यात वर दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे गोपनीय अहवालाचे नस्तीमध्ये कच्चे टिपण हे आढळून

येत नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची किंवा खोटी उपलब्ध करुन दिलेली नाही हा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे ते शास्तीस पात्र नाहीत. तसेच कच्चे टिपण किंवा (EPHEMERAL ROLL) हे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावे याबद्यलचे आदेश देण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

११. अपील क्रमांक १५२२/२००७ व अपील क्रमांक १५२३/२००७ च्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, सदरची दोन्ही अपीलामध्ये त्यांनी जे माहिती अर्ज दिनांक २८.७.२००६ व दिनांक २९.७.२००६ रोजी जी माहिती मागितलेली आहे हीच माहिती अपीलकर्ता यांनी पूर्वी दिनांक ११.२.२००६ च्या अर्जामध्ये मागितली होती व दिनांक ११.२.२००६ व दिनांक ११.९.२००६ रोजी तीच माहिती मागितली होती व त्या अर्जाचे संदर्भामध्ये अपील क्रमांक २६०/२००७ व अपील क्रमांक ३५१/२००७ यामध्ये आयोगापुढे सुनावणी घेवून दिनांक १६.८.२००७ रोजी निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांचे दोनही अपीले ही त्यांना दिनांक २८.७.२००६ पासून ते दिनांक २.२.२००७ पर्यंत त्याच त्याच मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे दोनही अपीले हे खारीज करण्यात येत आहेत असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयाचे पुन्हा अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी वारंवार तीच माहिती मागितली असून त्याकरिता राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा त्यांनी अनेक अपीले दाखल केलेली दिसून येतात व त्यापैकीच अपील क्रमांक १५२२/२००७ व अपील क्रमांक १५२३/२००७ असल्यामुळे सदरची दोनही अपील हे खारीज करण्यास पात्र आहेत.

१२. अपीलकर्ता यांचे वरील सर्व अपीलाचे संदर्भामध्ये व पूर्वीच्या त्यांच्या अपील क्रमांक २६०/२००७ व अपील क्रमांक ३५१/२००७ च्या संदर्भामध्ये विचार केला असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांची विभागीय चौकशी सुरु होती व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी वारंवार स्वतःचे हिताकरिता माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ जे आदेश आहे व्यापक लोकहिताचे दृष्टिने माहिती

मागण्यासाठी आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी वेळोवेळी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आढळून येते व वारंवार माहिती मागण्यापेक्षा त्यांच्या बद्यलची संपूर्ण नस्ती उपलब्ध करुन देण्याचा खर्च रुपये ५१०/- चा भरणा करावा असे कळविले होते. परंतु अपीलकर्ता यांच्या प्रथम अपील व द्वितीय अपील यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे ते विश्लेषणात्मक मुद्ये उपस्थित करुन जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारे मुद्ये उपस्थित करण्यासाठी ते अनेक अर्ज करीत आहेत असे दिसून येते. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती ज्या ज्या स्तरावर उपलब्ध आहे त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त केलेले असल्याने ते त्या माहितीचे परिरक्षक आहेत व ते मागितलेल्या माहितीचे संदर्भात निर्णय प्रक्रियेतील अधिकारी असेल असे नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यास मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे अभिप्राय हे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे वरील अपील क्रमांक १५१८/२००७ वगळून हे सर्व अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १५१६/२००७, अपील क्रमांक १५१७/२००७, अपील क्रमांक १५१९/२००७, अपील क्रमांक १५२०/२००७, अपील क्रमांक १५२१/२००७, अपील क्रमांक १५२२/२००७ व अपील क्रमांक १५२३/२००७ हे त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपील क्रमांक १५१८/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २५.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३)अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१२५-१४०/२२.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५३६/२००७, अपील क्रमांक १५३७/२००७, अपील क्रमांक १५३८/२००७, अपील क्रमांक १५३९/२००७ व अपील क्रमांक १५४०/२००७.**

श्री.मनोहर मारोतराव धकाते,
रा. अंचलेश्वर वार्ड,
बालाजी मंदीराजवळ,
चंद्रपूर - ४४२ ४०२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. शरद चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (संशोधन) सदस्य सचिव,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ, नागपूर.

श्री. आर. आर. गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी (सदस्य)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ, नागपूर. **..... उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकूण पाच द्वितीय अपीले माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १५३६/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी श्री.मनोहर बारकू सिडाम यांना अनुसूचित जमाती जातीची प्रमाणपत्रे तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर यांनी ज्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे वैधता प्रमाणपत्रे दिले त्या सर्व कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रती

... २

तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत अर्ज केलेला असून सन २००० ते २००७ असा कालावधी दिलेला आहे व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांनी अपीलाचे सुनावणीकरिता खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपिलार्थीने दिनांक १३.६.२००७ ला माहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे श्री.मनोहर बारकू सिडाम यांना अनुसूचित जमाती पमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी ज्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे वैधता प्रमाणपत्र दिले त्या सर्व कागदपत्रांच्या/प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअधि/अजप्रतस/नाग/सेवा/का-३ अ/४४१८(A)/२००७, दिनांक ७.७.२००७ अन्वये कळविले. "मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कारवाई सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविता येणार नाही व वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजावे." मी दिनांक २१.८.२००७ ला माहितीच्या अधिकाराखाली त्रयस्थ पक्षाला पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. परंतु त्यांनी अजून पर्यंत पाठविलेल्या पत्राची प्रत दिलेली नाही किंवा मागितलेली माहिती सुध्दा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती देणे बंधनकारक आहे. संदर्भ कलम ८(१)(ज) मधील परिच्छेद "जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येणार नाही" याचाच अर्थ असा की, माहिती अधिकारी सर्व सामान्य अर्जदारालाही माहिती देण्यास बांधील आहे.

असे असतांना माहिती देणे नाकारणे हा माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन असून संसदेचा अवमान आहे. माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे अपीलीय अधिकारी श्रीमती वसुधा प्र.नाईक, वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे दिनांक १३.७.२००७ ला अपील सादर केले. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. सआ/अजप्रतस/नाग/का-१ अ/७४०३/०७, दिनांक २३.१०.२००७ अन्वये जी कलमे माहितीच्या अधिकार कायदा, २००५ मध्ये नाहीत अशी कलम ८ (त्र) लावून अपील फेटाळण्यात आली. तसेच कलम ७(९) हे माहिती देणे नाकारण्याचे नसून माहिती पुरविण्याचे आहे. माहिती अधिकारी आणि अपीलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती नाकारली असल्याने दिनांक ११.९.२००७ ला अपील सादर केले. कारण संसद सदस्याला अथवा विधानसभा सदस्याला जी माहिती नाकारली जाऊ शकत नाही, ती सर्व सामान्य अर्जदारालाही देण्यास माहिती अधिकारी बांधील असतो. अशी माहितीच्या अधिकार कायद्यात तरतुद असतांना माहिती देणे नाकारले. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे कलम २०(१) व (२) नुसार शास्ती लादण्यात यावी.

३. अपील क्रमांक १५३७/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००७ रोजी छाया गोमाजी आत्राम अनुसूचित जमाती जातीची प्रमाणपत्रे तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर यांनी ज्या कागदपत्राच्या/प्रमाण पत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्रे दिले त्या सर्व कागदपत्राच्या/प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळणे बाबत अर्ज. माहितीचा कालावधी सन २००० ते २००७ असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुध्दा निर्णय झाला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या अपीलाची सुनावणी करिता खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपिलार्थीने दिनांक २२.६.२००७ ला माहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे

छाया गोमाजी आत्राम यांना अनुसूचित जमाती पमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी ज्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे वैधता प्रमाणपत्र दिले त्या सर्व कागदपत्रांच्या/प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअधि/अजप्रतस/नाग/सेवा/का-३ अ/४४१८(A)/२००७, दिनांक ७.७.२००७ अन्वये कळविले. "मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कारवाई सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविता येणार नाही व वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजावे." मी दिनांक २१.८.२००७ ला माहितीच्या अधिकाराखाली त्रयस्थ पक्षाला पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. परंतु त्यांनी अजून पर्यंत पाठविलेल्या पत्राची प्रत दिलेली नाही किंवा मागितलेली माहिती सुध्दा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती देणे बंधनकारक आहे. संदर्भ कलम ८(१)(ञ) मधील परिच्छेद "जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येणार नाही" याचाच अर्थ असा की, माहिती अधिकारी सर्व सामान्य अर्जदारालाही माहिती देण्यास बांधील आहे. असे असतांना माहिती देणे नाकारणे हा माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन असून संसदेचा अवमान आहे. माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे अपीलीय अधिकारी श्रीमती वसुधा प्र.नाईक, वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे दिनांक १७.७.२००७ ला अपील सादर केले. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. सआ/अजप्रतस/नाग/का-१ अ/७४०३/०७, दिनांक २३.१०.२००७ अन्वये जी कलमे माहितीच्या अधिकार कायदा, २००५ मध्ये नाहीत अशी कलम ८ (त्र) लावून अपील फेटाळण्यात आली. तसेच कलम ७(९) हे माहिती देणे नाकारण्याचे नसून माहिती पुरविण्याचे आहे. माहिती अधिकारी आणि अपीलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती नाकारली असल्याने दिनांक ११.९.२००७ ला अपील सादर केले. कारण संसद सदस्याला अथवा विधानसभा सदस्याला जी माहिती नाकारली जाऊ शकत नाही, ती सर्व सामान्य अर्जदारालाही देण्यास माहिती अधिकारी बांधील असतो. अशी

माहितीच्या अधिकार कायद्यात तरतुद असतांना माहिती देणे नाकारले. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे कलम २०(१) व (२) नुसार शास्ती लादण्यात यावी.

४. अपील क्रमांक १५३८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी श्री.महादेव बारकू सिडाम यांना अनुसूचित जमाती जातीची प्रमाणपत्रे तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर यांनी ज्या कागदपत्राच्या/ प्रमाणपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्रे दिले त्या सर्व कागदपत्राच्या/प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत अर्ज. माहितीचा कालावधी सन २००० ते २००७ असा दिसून येतो व माहिती व्यक्तिशः घेणार असे दिसून येते. सदर अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलाचे सुनावणीकरिता खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपिलार्थीने दिनांक १३.६.२००७ ला माहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे श्री.महादेव बारकू सिडाम यांना अनुसूचित जमाती पमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी ज्या कागदपत्रांच्या/ प्रमाणपत्रांच्या आधारे वैधता प्रमाणपत्र दिले त्या सर्व कागदपत्रांच्या/प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअधि/अजप्रतस/नाग/सेवा/का-३ अ/४४१८(A)/२००७, दिनांक ७.७.२००७ अन्वये कळविले. "मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कारवाई सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती

पुरविण्यात येईल. तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविता येणार नाही व वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजावे." मी दिनांक २१.८.२००७ ला माहितीच्या अधिकाराखाली त्रयस्थ पक्षाला पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. परंतु त्यांनी अजून पर्यंत पाठविलेल्या पत्राची प्रत दिलेली नाही किंवा मागितलेली माहिती सुध्दा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती देणे बंधनकारक आहे. संदर्भ कलम ८(१)(ञ) मधील परिच्छेद "जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येणार नाही" याचाच अर्थ असा की, माहिती अधिकारी सर्व सामान्य अर्जदारालाही माहिती देण्यास बांधील आहे. असे असतांना माहिती देणे नाकारणे हा माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन असून संसदेचा अवमान आहे. माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे अपीलीय अधिकारी श्रीमती वसुधा प्र.नाईक, वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे दिनांक १३.७.२००७ ला अपील सादर केले. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. सआ/अजप्रतस/नाग/का-१ अ/७४०३/०७, दिनांक २३.१०.२००७ अन्वये जी कलमे माहितीच्या अधिकार कायदा, २००५ मध्ये नाहीत अशी कलम ८ (त्र) लावून अपील फेटाळण्यात आली. तसेच कलम ७(९) हे माहिती देणे नाकारण्याचे नसून माहिती पुरविण्याचे आहे. माहिती अधिकारी आणि अपीलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती नाकारली असल्याने दिनांक ११.९.२००७ ला अपील सादर केले. कारण संसद सदस्याला अथवा विधानसभा सदस्याला जी माहिती नाकारली जाऊ शकत नाही, ती सर्व सामान्य अर्जदारालाही देण्यास माहिती अधिकारी बांधील असतो. अशी माहितीच्या अधिकार कायद्यात तरतुद असतांना माहिती देणे नाकारले. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे कलम २०(१) व (२) नुसार शास्ती लादण्यात यावी.

५. अपील क्रमांक १५३९/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००७ रोजी माहिती अधिकारी यांना श्री.तुळशीदास नारायण सिडाम यांना अनुसूचित जमाती जातीची प्रमाणपत्रे तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर यांनी ज्या कागदपत्राच्या/प्रमाणपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्रे दिले त्या सर्व कागदपत्राच्या/प्रमाण

पत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत अर्ज. माहितीचा कालावधी सन २००० ते २००७ असा दिलेला असून माहिती व्यक्तिशः घेणार असे दिसून येते. सदर अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाचे सुनावणीचे संदर्भात अपीलकर्ता यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपिलार्थीने दिनांक २२.६.२००७ ला माहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे श्री.तुळशीदास नारायण सिडाम यांना अनुसूचित जमाती पमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी ज्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे वैधता प्रमाणपत्र दिले त्या सर्व कागदपत्रांच्या/ प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअधि/अजप्रतस/नाग/सेवा/का-३ अ/४४१८(A)/२००७, दिनांक ७.७.२००७ अन्वये कळविले. "मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कारवाई सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविता येणार नाही व वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजावे." मी दिनांक २१.८.२००७ ला माहितीच्या अधिकाराखाली त्रयस्थ पक्षाला पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. परंतु त्यांनी अजून पर्यंत पाठविलेल्या पत्राची प्रत दिलेली नाही किंवा मागितलेली माहिती सुध्दा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती देणे बंधनकारक आहे. संदर्भ कलम ८(१)(ञ) मधील परिच्छेद "जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येणार नाही" याचाच अर्थ असा की, माहिती अधिकारी सर्व

सामान्य अर्जदारालाही माहिती देण्यास बांधील आहे. असे असतांना माहिती देणे नाकारणे हा माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन असून संसदेचा अवमान आहे. माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे अपीलीय अधिकारी श्रीमती वसुधा प्र.नाईक, वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे दिनांक १७.७.२००७ ला अपील सादर केले. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. सआ/अजप्रतस/नाग/का-१ अ/७४०३/०७, दिनांक २३.१०.२००७ अन्वये जी कलमे माहितीच्या अधिकार कायदा, २००५ मध्ये नाहीत अशी कलम ८(त्र) लावून अपील फेटाळण्यात आली. तसेच कलम ७(९) हे माहिती देणे नाकारण्याचे नसून माहिती पुरविण्याचे आहे. माहिती अधिकारी आणि अपीलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती नाकारली असल्याने दिनांक ११.९.२००७ ला अपील सादर केले. कारण संसद सदस्याला अथवा विधानसभा सदस्याला जी माहिती नाकारली जाऊ शकत नाही, ती सर्व सामान्य अर्जदारालाही देण्यास माहिती अधिकारी बांधील असतो. अशी माहितीच्या अधिकार कायद्यात तरतुद असतांना माहिती देणे नाकारले. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे कलम २०(१) व (२) नुसार शास्ती लादण्यात यावी.

६. अपील क्रमांक १५४०/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी माहिती अधिकारी यांना सौ.मायाताई रामचंद्र सिडाम यांना अनुसूचित जमाती जातीची प्रमाणपत्रे तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर यांनी ज्या कागदपत्राच्या/प्रमाणपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्रे दिले त्या सर्व कागदपत्राच्या/ प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत अर्ज. माहितीचा कालावधी सन २००० ते २००७ असा दिलेला असून माहिती व्यक्तिशः घेणार असे दिसून येते. सदर अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाचे सुनावणीचे संदर्भात अपीलकर्ता यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपिलार्थीने दिनांक १३.६.२००७ ला माहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे सौ.मायाताई रामदास सिडाम यांना अनुसूचित जमाती पमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी ज्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे वैधता प्रमाणपत्र दिले त्या सर्व कागदपत्रांच्या/ प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती तसेच दक्षता पथकाचा अहवाल, समितीने पारीत केलेले आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअधि/अजप्रतस/नाग/सेवा/का-३ अ/४४१८(A)/२००७, दिनांक ७.७.२००७ अन्वये कळविले. "मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कारवाई सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविता येणार नाही व वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजावे." मी दिनांक २१.८.२००७ ला माहितीच्या अधिकाराखाली त्रयस्थ पक्षाला पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. परंतु त्यांनी अजून पर्यंत पाठविलेल्या पत्राची प्रत दिलेली नाही किंवा मागितलेली माहिती सुध्दा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती देणे बंधनकारक आहे. संदर्भ कलम ८(१)(ञ) मधील परिच्छेद "जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येणार नाही" याचाच अर्थ असा की, माहिती अधिकारी सर्व सामान्य अर्जदारालाही माहिती देण्यास बांधील आहे. असे असतांना माहिती देणे नाकारणे हा माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन असून संसदेचा अवमान आहे. माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे अपीलीय अधिकारी श्रीमती वसुधा प्र.नाईक, वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे दिनांक १३.७.२००७ ला अपील सादर केले. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. सआ/अजप्रतस/नाग/का-१ अ/७४०३/०७, दिनांक २३.१०.२००७ अन्वये जी कलमे माहितीच्या अधिकार कायदा, २००५ मध्ये नाहीत अशी कलम ८(त्र) लावून अपील फेटाळण्यात आली. तसेच कलम ७(९) हे माहिती देणे नाकारण्याचे नसून माहिती पुरविण्याचे आहे. माहिती अधिकारी आणि अपीलीय

... १०

अधिकारी यांनी मागितलेली माहिती नाकारली असल्याने दिनांक ११.९.२००७ ला अपील सादर केले. कारण संसद सदस्याला अथवा विधानसभा सदस्याला जी माहिती नाकारली जाऊ शकत नाही, ती सर्व सामान्य अर्जदारालाही देण्यास माहिती अधिकारी बांधील असतो. अशी माहितीच्या अधिकार कायद्यात तरतुद असतांना माहिती देणे नाकारले. माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे कलम २०(१) व (२) नुसार शास्ती लादण्यात यावी.

७. वरील पाचही अपीलाचे संदर्भामध्ये माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. वरील संदर्भांकित सुनावणी नोटीस दिनांक ६.५.२००८ सोबत श्री. मनोहर मारोतराव धकाते यांचा जनमाहिती अधिकारी यांना उद्येशून लिहिलेले दिनांक १३.६.२००७, दिनांक २२.६.२००७, दिनांक १३.६.२००७, दिनांक १३.६.२००७ व दिनांक १३.६.२००७ चे अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जाचे अनुषंगाने श्री.मनोहर मारोतराव धकाते यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.७.२००७ अन्वये उत्तर पाठविले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता श्री.मनोहर मारोतराव धकाते यांना उक्त नमुद पत्रान्वये कळविल्याप्रमाणे त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना उद्येशून लिहिलेले पत्र दिनांक १३.७.२००७, दिनांक १७.७.२००७, दिनांक १३.७.२००७, दिनांक १७.७.२००७ व दिनांक १३.७.२००७ चे प्रथम अपील त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २३.१०.२००७ अन्वये कळविलेले आहे. १) श्री.मनोहर बारकु सिडाम अर्ज दिनांक १३.६.२००७, २) छाया गोमाजी आत्राम अर्ज दिनांक २२.६.२००७, ३) श्री.महादेव बाकू सिडाम अर्ज दिनांक १३.६.२००७, ४) श्री. तुळशीदास नारायण सिडाम अर्ज दिनांक २२.६.२००७ व ५) सौ.मायाताई रामचंद्र सिडाम अर्ज दिनांक १३.६.२००७ यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ७.७.२००७ चे पत्रान्वये संदर्भीय अर्जानुसार आपण मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने केंद्र शासनाच्या माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कार्यवाही सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविण्यात येणार नाही व वरील सर्व आपले अर्ज निकाली काढण्यात

आलेले आहे असे समजावे करिता कळविण्यात आले आहे. अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.७.२००७, दिनांक १७.७.२००७, दिनांक १३.७.२००७, दिनांक १७.७.२००७ चे प्रथम अपील अर्जावर श्री.मनोहर मारोतराव धकाते यांना असे कळविले की, आपणास आतापर्यंत सहा प्रकरणामध्ये माहिती दिलेली असून सदर माहिती त्यांनी दिनांक ३०.८.२००७ व दिनांक २९.७.२००७ अन्वये प्राप्त केलेली आहे तरी देखील आपण शासकीय अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडो प्रकरणाची माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ८ (त्र) (जे) नुसार मागितलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हित संबंधाशी नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती कलम ८ (त्र) (जे) तसेच कलम ८(९) अन्वये फेटाळण्यात येत आहे. अपीलकर्ता श्री. मनोहर मारोतराव धकाते यांनी जनमाहिती अधिकारी/अपीलीय अधिकारी यांना पाठविलेले अर्ज पाहता निव्वळ मोघम स्वरुपात शेकडो नावे कळवून त्यांची वैयक्तिक माहिती मागितलेली आहे. तसेच माहिती व्यक्तिशः हवी आहे असे मुळ अर्जामध्ये नमुद केलेले असतांना सदर प्रकरणाची माहिती त्यांनी व्यक्तीशः घेऊन जाणे नियमानुसार आवश्यक होते. तथापी त्यांनी श्री.लिलाधर पी.डफाडे यांचे नांवे अधिकारपत्र देऊन त्यांच्या करवी माहिती प्राप्त केली आहे. श्री. रवि सयाम या अर्जदाराने श्री. प्रशांत मनोहर धकाते, सौ. कलावती धकाते व श्री. मनोहर धकाते (अपिलकर्ते) यांचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांना त्यांची माहिती मागितलेली असता जनमाहिती अधिकारी यांनी धकाते कुटुंबियांना (अपिलकर्त्यांने) त्यांची व्यक्तीगत माहिती संबंधितास द्यावी काय या संदर्भात त्यांना कलम ११(१) अन्वये विचारणा केली असता अपीलकर्त्यांनी आपल्या कार्यालयात असलेली त्यांची वैयक्तिक माहिती तसेच दावा पडताळणीसाठी सादर केलेली माहिती तसेच दस्ताऐवज/ प्रमाणपत्रे देण्यात येऊ नये आणि जर कार्यालयाने त्यांच्या संबंधातील कोणतेही दस्ताऐवज/प्रमाणपत्रे दिले आणि त्यामुळे त्यांच्या जिवितास किंवा शारीरीक सुरक्षिततेस धोका झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील अशी धमकी जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यांनी दिली. तसेच त्यांनी व्यक्तिगत व त्यांचे कुटुंबाचे हितार्थ त्यांची माहिती देण्यात येऊ नये अशी न्यायाची भुमिका स्विकारली परंतु इतरांच्या बाबतीत तसा विचार केलेला नाही. उलट जनमाहिती अधिकारी यांना एक प्रकारची धमकी दिलेली आहे. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. तसेच या समितीचे सदस्य श्री.सुरेंद्र वामनराव सावरकर, संशोधन अधिकारी यांना

सुध्दा वारंवार धमक्या येऊन शेवटी त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ज्यामुळे ते अद्यापही या धक्यातुन सावरलेले नाही. अपीलकर्ता श्री. मनोहर मारोतराव धकाते हे सन २००६ मध्ये नगरपरिषद, चंद्रपूर येथून नगरपरिषद सदस्य या पदावर निवडणूक लढले त्यांचे विरुध्द निवडणुकीमध्ये श्री.दिनेश बाबुराव सेडमाके हे होते. श्री.दिनेश बाबुराव सेडमाके हे अनुसूचित जमातीचे आरक्षित पदावर निवडूण आले. श्री.दिनेश बाबुराव सेडमाके हे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र धारक आहे. श्री. मनोहर मारोतराव धकाते हे निवडणुकीत पराभूत झाल्याने त्यांनी श्री. दिनेश बाबुराव सेडमाके यांचे वैधता प्रमाणपत्रासंदर्भातील हरकतीचा मुद्या न्यायालयात उपस्थित करुन मा. उच्च न्यायालय, खंडपिठ, नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ३५४५/२००७ अन्वये याचिका दाखल केली तत्पुर्वी श्री. मनोहर मारोतराव धकाते यांचे पुत्र श्री. प्रशांत मनोहर धकाते यांनी माहिती अधिकार अंतर्गत श्री. दिनेश बाबुराव सेडमाके यांचे जातीविषयक कागदपत्रे मागितले रिट याचिकाची प्रत प्राप्त होताच श्री. दिनेश बाबुराव सेडमाके हे नागपूर समिती कार्यालयात आले त्यांनी कार्यालयास असे सांगितले की, मी गरीब ॲटोचालक असून माझ्या गरीब परिस्थितीमुळे मला सदर न्यायालयीन प्रकरणी नागपूरला येण्या जाण्याचा खर्च तसेच सदर प्रकरणी स्वतःचा वकील लावण्यास्तव येणारा खर्च माझे परिस्थितीला झेपणारा नाही. न्यायालयानिमित्त चंद्रपूरहून नागपूर येथे येणे-जाणे करतांना मला सदर दिवशी ॲटो बंद ठेवल्यामुळे रोजी सुध्दा मिळणार नाही. सदर प्रकरणावरुन स्पष्ट होते की, अपीलकर्ता यांनी वैयक्तिक स्वार्थापोटी सदर प्रकरण उपस्थित केले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, अपीलकर्त्यांचा मुळ हेतु स्वहितार्थ असून जनहितार्थ नाही हे स्पष्ट होते. अपीलकर्त्याने स्वहितार्थ शेकडो प्रकरणी माहिती मागितल्याने इतर दुर्गम भागात राहणाऱ्या शेकडो आदिवासींच्या बाबतीत अशी गंभीर परिस्थिती येण्याची शक्यता नाकारता येत नाही. उक्त नमुद केलेली पाच अपीले क्रमांक १५३६/२००७ ते १५४०/२००७ तसेच दिनांक २१.५.२००८ रोजी आपणाकडे सुनावणीनंतर निर्णय झालेली चार अपीले क्रमांक १५३२/२००७ ते १५३५/२००७ बाबत अपीलकर्त्यांच्या मागणीमध्ये साम्यता आहे. तेंव्हा सदर प्रकरणी आपण दिलेला निर्णय हा अपील क्रमांक १५३६/२००७ ते १५४०/२००७ मध्ये ही कायम करणे विषयी आपणास नम्र विनंती करण्यात येत आहे. श्री. मनोहर मारोतराव धकाते तसेच श्री. प्रशांत मनोहर धकाते यांचा जातीचा दावा तपासण्यास्तव प्रकरण समितीकडे सादर केलेले आहे. सदर प्रकरणी समितीचा निर्णय अद्याप झालेला नाही. तेंव्हा इतरांनी स्वतःचे

... १३

संदर्भात माहिती मागितली असता ती नाकारली जाते. तेंव्हा वारंवार हेतुपुरस्पर अर्ज पाठवून शासकीय माहिती अधिकारी व अपीलकर्त्यांस माहिती दिली नाही म्हणून वेठीस धरणे ही बाब स्पष्ट होते. मा.उच्च न्यायालय रिट याचिका क्रमांक ३३४३/१९९० कु. नंदा शंखपाले व रिट याचिका क्रमांक १२७९/२००३ मधील दिनांक २९.७.२००३ चे कोर्ट निर्देशानुसार समितीला मासिक ६०० प्रकरणे निकाली काढण्याचा लक्षांक दिलेला आहे. समिती किमान वार्षिक ६ हजार ते ७ हजार दाव्यावरती निर्णय घेत असते. त्यानुसार सदर माहिती ही कलम ७(९) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर लागणार असल्याने त्यांनी मागितलेली माहिती शोधून त्यांना देणे हे कार्यालयाला शक्य होत नाही. शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी वर्ग-२ यांचे पद दिनांक ६.११.२००६ पासून ते दिनांक १५.४.२००७ पर्यंत रिक्त असून तसेच संशोधन अधिकारी यांची पदोन्नती झाल्यामुळे सद्यःस्थितीत अद्यापपर्यंत पद रिक्त आहे. उपसंचालक तथा सदस्य सचिव यांचे पद रिक्त आहे व सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार उपसंचालक तथा सदस्य सचिव, गडचिरोली यांचेकडे देण्यात आलेला आहे. संशोधन अधिकारी (गडचिरोली, नागपूर) वरिष्ठ संशोधन अधिकारी यांचेपद रिक्त असून त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देखील कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. तेंव्हा अशा परिस्थितीत समितीकडे जमातीचा दावा तपासण्यास्तव दररोज प्राप्त होणारी प्रकरणे तपासणी तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सुध्दा विहित कालावधीत प्रकरणे निकाली काढावी लागतात. तसेच समितीच्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या शेकडो प्रकरणात समितीचे पॅनल ॲडव्होकेट व सरकारी वकील यांना रेकॉर्ड पुरविणे तसेच सदर प्रकरणामध्ये उत्तरे सादर करणे व न्यायालयाचे सुनावणीच्या वेळी न्यायालयात उपस्थित राहणे या व्यतिरिक्त अनुसूचित जमाती विषयक संशोधनात्मक माहिती गोळा करणेकरिता गावोगावी जाऊन तेथील आदिवासी घरकुलांना भेटी देणे इत्यादींमुळे इत्यादी कामे पार पाडावी लागतात तेंव्हा अपीलकर्त्यांने पाठविलेल्या अर्जाच्या प्रतीवरुन सदर खुलाश्यास पुष्टी मिळू शकेल.

८. दोन्ही खुलाश्याचे अवलोकन केले असता व मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी प्रत्येक अर्जामध्ये ज्या उमेदवारांची माहिती मागितलेली आहे. त्या उमेदवारांचे

संदर्भात निश्चित वर्ष किंवा कोणत्या तारखेचे प्रमाणपत्र दिले याचा संदर्भ न देता माहितीचा कालावधी हा सन २००० ते २००७ असा दिलेला असून तो ७ वर्षाचा कालावधी दिलेला आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या पत्त्यासहित माहिती उपलब्ध करुन देण्यास ७ वर्षाचे वर्ष निहाय अभिलेख शोधणे आवश्यक आहे व यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी त्यांच्या खुलाश्यामध्ये माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअधि/अजप्रतस/नाग/सेवा/का-३ अ/४४१८(A)/२००७, दिनांक ७.७.२००७ अन्वये कळविले. "मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) अन्वये कारवाई सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. तसेच परवानगी प्राप्त न झाल्यास माहिती पुरविता येणार नाही व वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजावे." मी दिनांक २१.८.२००७ ला माहितीच्या अधिकाराखाली त्रयस्थ पक्षाला पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. परंतु त्यांनी अजून पर्यंत पाठविलेल्या पत्राची प्रत दिलेली नाही किंवा मागितलेली माहिती सुध्दा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती देणे बंधनकारक आहे. संदर्भ कलम ८(१)(ञ) मधील परिच्छेद "जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येणार नाही" याचाच अर्थ असा की, माहिती अधिकारी सर्व सामान्य अर्जदारालाही माहिती देण्यास बांधील आहे. असे असतांना माहिती देणे नाकारणे हा माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन असून संसदेचा अवमान आहे. याबाबत संसदेला किंवा राज्य विधानमंडळास जी माहिती देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही हा उल्लेख केला असला तरी माहितीचा अर्ज आल्यानंतर त्या अर्जाचे संदर्भामध्ये मागितलेली माहिती ही अधिनियमाचे तरतुदीचे निकष बरोबर तपासून पाहणे आवश्यक असते. कलमाच्या निकषावर तपासून पाहिल्यानंतर त्या जनमाहिती अधिकारी यांना प्रक्रिया करावयाची असते व त्यानुसार निर्णय द्यावयाचा असतो व त्यामुळे कायद्याचे उल्लंघन होईल किंवा संसदेच्या कायद्याचे उल्लंघन केले तर संसदेचा अवमान वगैरे होत नसेल तर त्याच कायद्यात त्या उल्लंघनाबद्यल उपाय योजना दिलेल्या असतात. अपीलकर्ता यांच्या खुलाश्या-

प्रमाणे व माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या खुलाश्याप्रमाणे अवलोकन केल्यास जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या सदरच्या पाचही अर्जाचे संदर्भामध्ये दिनांक ७.७.२००७ रोजी अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये त्रयस्थ पक्षाकडून पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे असे कळविण्यात आले आहे. मात्र त्याबाबत अपीलकर्ता यांनी पत्राची प्रत मागितलेली दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांनी ज्या उमेदवारांची माहिती मागितली आहे त्या उमेदवारांचे आम्ही प्रमाणपत्र दिलेले आहे किंवा नाही याबद्यल निश्चित संदर्भ अपीलकर्ता यांनी दिला नसल्याने आम्हाला शोधावे लागते. अपीलकर्ता यांचे शेकडो अर्जातील ७-७ वर्षातील अभिलेखे शोधने आवश्यक ठरते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मला विचारले असते तर मी माहिती दिली असती. परंतु अपीलकर्ता यांनी आतापर्यंत जे अर्ज केले आहेत त्या काही अर्जाचे संदर्भामध्ये दिनांक ८.७.२००६ ला सुध्दा अशा प्रकारे कु. मडावी संदर्भात माहिती मागितली असतांना तपशीलवार माहिती द्यावी असे कळविलेले दिसते. यावरुन तर अपीलकर्ता यांनी तपशीलवार माहिती द्यावयास पाहिजे होती व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यास जनमाहिती अधिकारी यांना दोषी धरता येणार नाही. वास्तविक मोघम संदर्भ न देता माहिती मागितल्यास माहिती द्यावयाची आवश्यकता नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिनांक १३.७.२००७ रोजी दाखल केलेल्या अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २३.१०.२००७ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्याच प्रकारची माहिती न मागता वारंवार शेकडो अर्जाचे माध्यमातून माहिती मागण्याचा ओघ सुरु आहे त्यामुळेही सामाजिक कामकाजाशी व सार्वजनिक हिताशी संबंधित नाही. हे म्हणणे संयुक्तिक वाटते व त्यामुळे आपण मागितलेली माहिती ही फेटाळण्यात येत आहे असे उत्तर दिले आहे व त्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांची माहिती कलम ७ हे माहिती नाकारण्याचे नसून माहिती पुरविणे आहे त्याबाबत कलम ७ तपासून पाहणे आवश्यक आहे. अधिनियमाचे कलम ७(९) खालील प्रमाणे "सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टिने ते हानिकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्याच स्वरुपात ती सर्वसाधारणपणे पुरविण्यात येईल." या पोट कलमाचे विश्लेषण माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या यशदा या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक ५४ वर दिलेले आहे. जर शासकीय साधनसामुग्रीचा फार मोठा अपव्यय अशी माहिती गोळा करण्यात आणि अशा प्रकारची माहिती देण्यात होणार असेल, तर अशी माहिती देण्याचे माहिती अधिकाऱ्यांवर बंधन नाही. त्यामुळे अशा प्रकारची "ठोक" किंवा (Voluminous) माहिती पुरवण्यास तुम्ही नकार देऊ शकता असे दिलेले दिसून येते. ज्यावेळेस अर्जदार हा मोघम माहिती मागतो त्यावरुन व त्या कालावधीत माहिती अनेक वर्षाची असते. त्यावरुन सदरची माहिती शोधण्याकरिता शासकीय साधनसामुग्रीचा फार मोठा अपव्यय होतो व त्याप्रमाणे आज उमेदवारास प्रमाणपत्र दिलेले आहे किंवा नाही हेही माहिती नाही त्या उमेदवाराची माहिती उपलब्ध करुन देणे केवळ अशक्य आहे व त्याच वर्षाचे कालावधीचे अभिलेख तपासणे व अश्या शेकडो उमेदवारांची माहिती मागितली असली तरी फक्त प्रत्येक वेळेस प्रत्येक उमेदवारांचे संदर्भात माहिती देणे, वेगवेगळया अंतराने सर्व अभिलेख तपासणे हे सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामुग्रीचा अपव्ययच आहे. तसेच मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कलम ८ (ज) चा आधार घेतला आहे. त्या निकषातून सुध्दा तपासली असता सदरची माहिती सार्वजनिक लोकहिताच्या दृष्टीने दिसून येत नाही, सार्वजनिक कामकाजाच्या संदर्भामध्ये नाही, तर वैयक्तिक हितसंबंधाशी संबंधित दिसून येते. तसेच ती व्यक्तींच्या खाजगी बाबतीत विनाकारण हस्तक्षेप करते व त्यामुळेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरचे कारण दिलेले दिसून येते ते योग्य आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाश्यामध्ये त्यांनी अपीलकर्ता यांना माहिती ही आता पर्यंत मागितली आहे त्याबद्यल नमुद केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती घेणार असे मुळ अर्जामध्ये नमुद केले असतांना सदर प्रकरणाची माहिती त्यांनी व्यक्तिशः घेवून जाणे नियमानुसार आवश्यक होते. तथापि त्यांनी श्री.लिलाधर पी.डफाडे यांचे नांवे अधिकारपत्र देऊन त्यांच्या करवी माहिती प्राप्त केली आहे. श्री. रवि सयाम या अर्जदाराने श्री. प्रशांत मनोहर धकाते, सौ. कलावती धकाते व श्री. मनोहर धकाते (अपिलकर्ते) यांचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांना त्यांची माहिती मागितलेली असता जनमाहिती अधिकारी यांनी धकाते कुटुंबियांना (अपिलकर्त्यांने) त्यांची व्यक्तीगत माहिती संबंधितास द्यावी काय या संदर्भात त्यांना कलम ११(१) अन्वये विचारणा केली असता अपीलकर्त्यांनी आपल्या कार्यालयात असलेली त्यांची वैयक्तिक माहिती तसेच

दावा पडताळणीसाठी सादर केलेली माहिती तसेच दस्ताऐवज/प्रमाणपत्रे देण्यात येऊ नये आणि जर कार्यालयाने त्यांच्या संबंधातील कोणतेही दस्ताऐवज/प्रमाणपत्रे दिले आणि त्यामुळे त्यांच्या जिवितास किंवा शारीरीक सुरक्षिततेस धोका झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील अशी धमकी जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यांनी दिली. तसेच त्यांनी व्यक्तिगत व त्यांचे कुटुंबाचे हितार्थ त्यांची माहिती देण्यात येऊ नये अशी न्यायाची भुमिका स्विकारली परंतु इतरांच्या बाबतीत तसा विचार केलेला नाही. उलट जनमाहिती अधिकारी यांना एक प्रकारची धमकी दिलेली आहे. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. तसेच या समितीचे सदस्य श्री.सुरेंद्र वामनराव सावरकर, संशोधन अधिकारी यांना सुध्दा वारंवार धमक्या येऊन शेवटी त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ज्यामुळे ते अद्यापही या धक्यातुन सावरलेले नाही. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांची माहिती मागितली तर त्यांच्या जिवीतास किंवा शारीरीक सुरक्षिततेस धोका उत्पन्न होतो व अपीलकर्ता यांनी इतरांची माहिती मागितली तर त्यांचे जिवीतास व शारीरीक सुरक्षितेस धोका उत्पन्न होत नाही अशी अपीलकर्ता यांची कल्पना दिसते. म्हणजे ते स्वतःला एक न्याय लागू करतात व इतरांना दुसरा न्याय लावावा म्हणतात. अपीलकर्ता श्री. मनोहर मारोतराव धकाते हे सन २००६ मध्ये नगरपरिषद, चंद्रपूर येथून नगरपरिषद सदस्य या पदावर निवडणूक लढले त्यांचे विरुध्द निवडणुकीमध्ये श्री.दिनेश बाबुराव सेडमाके हे होते. श्री.दिनेश बाबुराव सेडमाके हे अनुसूचित जमातीचे आरक्षित पदावर निवडून आले. श्री.दिनेश बाबुराव सेडमाके हे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र धारक आहे. श्री. मनोहर मारोतराव धकाते हे निवडणुकीत पराभूत झाल्याने त्यांनी श्री. दिनेश बाबुराव सेडमाके यांचे वैधता प्रमाणपत्रासंदर्भातील हरकतीचा मुद्या न्यायालयात उपस्थित करुन मा. उच्च न्यायालय, खंडपिठ, नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ३५४५/२००७ अन्वये याचिका दाखल केली तत्पुर्वी श्री. मनोहर मारोतराव धकाते यांचे पुत्र श्री. प्रशांत मनोहर धकाते यांनी माहिती अधिकार अंतर्गत श्री. दिनेश बाबुराव सेडमाके यांचे जातीविषयक कागदपत्रे मागितले रिट याचिकाची प्रत प्राप्त होताच श्री. दिनेश बाबुराव सेडमाके हे नागपूर समिती कार्यालयात आले त्यांनी कार्यालयास असे सांगितले की, मी गरीब ॲटोचालक असून माझ्या गरीब परिस्थितीमुळे मला सदर न्यायालयीन प्रकरणी नागपूरला येण्या जाण्याचा खर्च तसेच सदर प्रकरणी स्वतःचा वकील लावण्यास्तव येणारा खर्च माझे परिस्थितीला झेपणारा नाही. न्यायालयानिमित्त चंद्रपूरहून नागपूर येथे येणे-जाणे करतांना मला सदर

... १८

दिवशी ॲटो बंद ठेवल्यामुळे रोजी सुध्दा मिळणार नाही. सदर प्रकरणावरुन स्पष्ट होते की, अपीलकर्ता यांनी वैयक्तिक स्वार्थापोटी सदर प्रकरण उपस्थित केले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, अपीलकर्त्यांचा मुळ हेतु स्वहितार्थ असून जनहितार्थ नाही हे स्पष्ट होते. अपीलकर्त्याने स्वहितार्थ शेकडो प्रकरणी माहिती मागितल्याने इतर दुर्गम भागात राहणाऱ्या शेकडो आदिवासींच्या बाबतीत अशी गंभीर परिस्थिती येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरुन असे दिसून येते की जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे अर्जाचे संदर्भामध्ये तपासणी करतांना त्यांना जो हेतु दिसून आले किंवा त्यांचे समोर आले त्यावरुनच त्यांनी कलम ८(१) प्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते व त्यात व्यापक लोकहित दिसून येत नाही असे म्हटले आहे. तसेच श्री. मनोहर मारोतराव धकाते यांचे पुत्र श्री. प्रशांत मनोहर धकाते यांच्या जातीचे प्रमाणपत्राकरिता प्रकरण दाखल केले आहे. सदर समितीचा निर्णय झालेला नाही तरी इतरां संबंधित माहिती मागितली असता ती देण्यास नकार दिला जातो. मात्र वारंवार हेतुपुरस्पर अर्ज पाठविले जाऊन शासकीय माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती देण्यात येत नाही म्हणून वेठीस धरणे ही बाब स्पष्ट होते यावरुन अपीलकर्ता हे त्यांच्या मुलांच्या, सुनेच्या जातीचा दावा तपासणीमध्ये समितीने त्यांच्या बाजूने निर्णय देण्यास भाग पाडावे म्हणूनच अनेक संदर्भरहित अर्ज देवून आपला हेतु साध्य होईल असे त्यांना वाटते असे दिसते. पण अशा रितीने वेठीस धरले तरी न्यायिकत्व निर्णय हे दबावाने होत नसतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे वरील ५ ही अपीले ही सकृतदर्शनी खारीज करण्यास पात्र आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केला व जी वस्तुस्थिती आयोगा समोर आलेली आहे त्यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गैरवापर करीत आहेत असा निष्कर्ष काढावयास वाव आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा पारित करतांना अधिनियमाचे प्रस्तावनेमध्ये त्यांचे उद्येश दिलेले आहे. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांस मिळविता यावी म्हणून नागरीकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य पध्दत आखून देण्याकरिता केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग गठीत करण्याकरिता तत्संबंधी व तत्संबंधी तरतुद करण्याचे अधिनियम. यातील व्यवहार्य पध्दत याचा अर्थ हा अधिनियम किंवा इतर कलमाचे प्रमाणे अर्जाची तपासणी करणे असा आहे. अन्यथा संसदेने

नागरिकांना माहितीचा अधिकार मिळाला आहे असा एका ओळीचा नियम केला असता व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे ज्या माहितीस संसदेला किंवा राज्य विधान मंडळास नकार देता येणार नाही त्या माहितीस कोणत्याही व्यक्तीला नकार देता येणार नाही त्यामुळे अधिनियम लागु आहे व संसदेचा अवमान आहे हे म्हणणे योग्य नसून अर्जाचे निकषानुसार तपासल्यानंतर हे प्रश्न निर्माण होत नाहीत व ही बाब माहिती अधिकारी यांच्या खुलाश्याप्रमाणे पुन्हा स्पष्ट होते. त्यामुळे अपीलकर्ता यांची अपीले निकाली काढण्यात येतात उक्त ५ ही अपीले व दिनांक ३१.५.२००८ रोजी निर्णय झालेली सुनावणी झालेली ४ अपीले क्रमांक १५३२/२००७ ते अपील क्रमांक १५३७/२००७ बाबत अपीलकर्ता यांची मागणीमध्ये साम्य आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या खुलाश्यामध्ये त्यांनी त्यांच्या कार्यालयातील कामकाजाच्या संदर्भामध्ये तसेच कार्यालयात प्रशासकीय संदर्भामध्ये खुलासा केलेला आहे. खुलाश्याचे स्वरुप त्यांनी दिलेले आहे व त्यावरुन त्यांनी अपीलकर्ता यांच्या माहिती मागण्याच्या संदर्भामध्येच त्यांनी कलम ७(९) च्या आधार घेतलेला दिसून येतो. यावरुन तसेच अपीलकर्ता यांनी सदरची माहिती मागतांना तपशीलात नक्की संदर्भ दिले नसल्याने ही बाब अपीले खारीज करण्यास पुरेशा आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांची वर नमुद केलेली सर्व अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १५३६/२००७, अपील क्रमांक १५३७/२००७, अपील क्रमांक १५३८/२००७, अपील क्रमांक १५३९/२००७, अपील क्रमांक १५४०/२००७, हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१४१-१५९/२३.५.२००८

## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५४५/२००७.

श्री.ले.कर्नल श्रीकांत यशवंत काणे,
११२-ब, शिवाजीनगर,
नागपूर - ४४० ०१०. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती एस. एस. कादरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ३२.

श्री. अ. द. जोशी,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ३२.

श्री. के. खं. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
सैनिक कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य, रायगड इमारत,
राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर,
घोरपडी, पुणे - ४११ ००१. **..... उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २६.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. Details of Second World war Grant paid to the Ex-Serviceman who were recruited in Indian Armed Forces after the end of Second world war in August-१९४५. July १९४७ to Feb. २००४ (i) DETAILS OF Second world war Grant paid by Zilla Sainik Welfare Officer, Chandrapur to the following ex-Serviceman/widows of Ex-Serviceman who were recruited in the Armed Forces of India after the end of Second Warld war as per their Service Records mentinoned against their names below :

| **Sr. No.** | **Name of Receipiant of the Grant** | **Period of Service in Indian Armed Forces of the soldier** |
|---|---|---|
| १. | Ex-Sepoy SAMBHA SOMA JAMBHULKAR | २१.७.१९४७ to १८.४.१९५२ |
| २. | Smt.(Widow) BANU ABDUL JABBAR | २४.७.१९४७ to २१.१.१९५१ |
| ३. | Smt.(Widow) SARASWATI GANPAT CHOUDHARY | ३०.८.१९४८ to २८.५.१९५८ |

(ii) DETAILS OF the action(s) taken by the Principal Secretary, General Administration Department, Mantralaya, Mumbai on the letter dated १३.६.२००६ from LT COL S.Y.Kane (RETD.) on the subject of Mishandling/Mismanagement of Government Grant (Monthly Grant for Second World War Veterens) by the Director, Sainik Kalyan Department and Zilla Sainik welfare Officer, Chandrapur. As per the Information (Details) requested for in Para ३(c)(i) above. (iii) COPY OF the Central Government or Maharashtra Government Authority Letter on the basis of which the above mentioned (Para ३(c)(i)) grant has been paid to the soldiers recruited in Service after September १९३९ i.e. end of Second World War. सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.८.२००७ रोजी "ही माहिती जनमाहिती

अधिकारी सैनिक कल्याण विभाग, पुणे आणि जनमाहिती अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, चंद्रपूर यांच्याशी संबंधित असून त्यांना ती आपणास पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे. या संदर्भात अपात्र व्यक्तींना देण्यात आलेली रक्कम वसूल करणे शक्य आहे किंवा कसे तसेच, ही रक्कम अपात्र व्यक्तींना मंजूर करण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणे शक्य आहे काय याबाबींची पडताळणी करण्यात येत आहे. मुद्या क्रमांक ४ ही माहिती जनमाहिती अधिकारी, सैनिक कल्याण विभाग, पुणे आणि जनमाहिती अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, चंद्रपूर यांच्याशी संबंधित असून त्यांना ती आपणास पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे. असे राज्य जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसत असून सदरच्या पत्राची प्रत ही पुणे व चंद्रपूर येथे हस्तांतरण केलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.८.२००७ रोजी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, चंद्रपूर यांनी श्री.संभा सोमा जांभूळकर, श्रीमती बानो अब्दुल जब्बार व श्रीमती सरस्वती गणपत चौधरी यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याचप्रमाणे दिनांक ५.९.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी परिच्छेद क्रमांक ३ (c) (ii) बद्यल माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी प्रथम अपील ही उपसचिव तथा अपीलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ११.१०.२००७ रोजी एकूण ७ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलात उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये खालील प्रमाणे अपील करण्याची कारणे दिलेली आहेत. Point No.१ (of my Appeal dt. १७.९.२००७) Vide the Gazette of India Extraordinary Part II page No. ६, Para ६(३), the transfer of my application to Zilla Sainik Welfare Officer, Chandrapur should have been done within a maximum period of ५ days i.e. by १५.७.२००७ which has not been done by the State Public Information Officer, Gen.Adm.Dept. (Maharashtra State).... In this connection please peruse para १ and para ३ of GAD, Mantralaya, Mumbai letter No. संकीर्ण-२००७/मा.अ.६/२८

... ४

dated ०८ August २००७, Zilla Sainik Welfare Office, Chandrapur letter No. २१०७/दु.म.यु./ जिसैकका/३०२/०७, dated २२.८.२००७ and Department of Sainik Kalyan, Maharashtra State, Pune letter No.२००२३/सै.क.वि.-४, dated ५ September,२००७. Point No. ३ (of my Appeal dt.१७.९.२००७) It is surprising to note that the Appellant Authority is asking me to contact the Department of Sainik Welfare, Pune when the Appeal itself has been made to the appellant because of the UNSATISFACTORY reply on this point by the Public Information Officer of Sainik Kalyan Department, Maharashtra State, Pune in his letter No. २००२३/सै.क.वि.-४, dated ५ September, २००७. Points No. ४ & ५ (of my Appeal dated १७.९.२००७) When it has been accepted and ascertained that all the three receipients of the grant were NOT QUALIFIED vide Maharashtra Govt. GR dated २९.१२.१९८९ (Copy Attached) WHY the Appellant Authority is refraining from giving his directions/Judgements on the Appeal submitted to him. Point No. ६ (of my Appeal dated १७.९.२००७) The statement that the grant was discontinued when the fact that the receipients of the grant were NOT AUTHORISED came to the notice of the Government is a WRONG Statement. In this connection please peruse Zilla Sainik Welfare office, Yavatmal Letter No. १६०१/जि.सै.क.का.-४, dated ३ July, २००३ and Zilla Sainik Welfare Officer, Chandrapur letter No. २०१६/दुमयु/जांभूळकर/८९०, dated १९th July, २००३ (Copy each enclosed herewith). This case of (Sepoy S. S. Jambhulkar only) was brought to the notice of the Director, Department of Sainik Kalyan (i.e. Government) by the Zilla Sainik Welfare Office, Yavatmal vide his letter dated ३ July २००३ whereas the grant was finally discontinued from June २००४ (for other two cases from July, २००४) as stated in Public Information Officer, Department of Sainik Kalyan letter No. २००२३/सै.क.वि.-४, dated ५ September, २००७. Also since the information about this unwarranted distribution of Government grant was brought to the notice of the Director, Department of Sainik Kalyan and Zilla Sainik Welfare Officer, Chandrapur by Zilla Sainik Welfare Officer, Yavatmal vide his letter dated ३ July, २००३ necessary action(s) for recovery of this mismanaged Govt. Grant are required to be taken as per the rules in vogue. Also Disciplinary action against the concerned who disbursed this grant even after coming to know about this case are required to be taken. IT MAY KINDLY

BE NOTED THAT SINCE THE TIME THE CASE OF MISMANAGEMENT OF THE GOVT. IN WRITING VIDE ZILLA SAINIK WELFARE OFFICER, YAVATMAL LETTER NO. १६०१/जिसैकका-४, dated ३ July २००३ THERE HAS BEEN OBVIOUS CALLOUS, DELIBERATE OR DELAYING/DILLY-DALLYING OR BUCK PASSING ACTION(S) AT ALL THE QUARTERS BY THE CONCERNED DEALING OR RESPONSIBLE FOR DEALING WITH THE CASE. ..... AND FOR SUCH UNAVOIDABLE ACTION(S), AMOUNTING TO THE LOSS OF PUBLIC MONEY, NO EXCUSE BE SOUGHT AS A LOOPHOLE IN ANY LAW AND ACTIONS MUST BE TAKEN. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे माहिती मागण्यासाठी जरी अर्ज केला होता तरी सदरचा अर्ज हा माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असेल त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे किंवा त्या सार्वजनिक प्राधिकरणातील जनमाहिती अधिकारी यांचेकडे सुरुवातीच्या पाच दिवसामध्ये हस्तांतरण करावयास पाहिजे होता. परंतु दिनांक ८.८.२००७ च्या उत्तरावरुन असे दिसून येते की, सदरचा अर्ज हा विलंबाने हस्तांतरण करण्यात आलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी सुध्दा जी माहिती मागितली आहे ती एकाच अर्जामध्ये वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती अधिकारी यांचेकडे अर्जामध्ये उपलब्ध असेल अश्या पध्दतीची असल्यामुळे तसेच जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना सदरच्या अर्ज हाताळतांना नव्याने बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी हाताळले आहे व त्यामुळे विलंब झाला आहे असा खुलासा केलेला आहे. मात्र अर्जदाराने सुध्दा माहिती ही ज्या स्तरावर उपलब्ध असेल त्या स्तरावर अर्ज करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे अपेक्षित आहे व त्यामुळेच त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्याची तरतुद ही कलम ५ मध्ये केलेली आहे. जेणे करुन माहिती ३० दिवसात उपलब्ध होऊ शकेल. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती चंद्रपूर व पुणे या दोन स्तरावर माहिती उपलब्ध होती व त्यामुळे सदर माहिती उपलब्ध होण्यास विलंब लागणे हे साहजिकच आहे. त्यामुळे विलंबाचा मुद्या हा विचारात घेता येत नाही. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १३.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २३.८.२००७ रोजी उत्तर दिलेले असल्यामुळे त्यासंदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती असे जनमाहिती अधिकारी यांनी

आयोगाचे निदर्शनास आणले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये मुद्या क्रमांक ६ मध्ये सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाही बद्यल माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक ४ व मुद्या क्रमांक ६ मध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तरी द्वितीय अपीलामध्ये मात्र त्यांनी त्यांच्या दिनांक १३.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे तातडीने कार्यवाही केली नाही या निर्णय प्रक्रिये संदर्भात मुद्या उपस्थित केलेला आहे व त्याबद्यलच त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा. :- अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके इत्यादी स्वरुपाची जी माहिती उपलब्ध असते त्या माहितीची छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे हे अपेक्षित आहे किंवा झालेल्या कार्यवाहीमध्ये ज्याप्रमाणे ती उपलब्ध असेल त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकारे कार्यवाही कां, केंव्हा व कसे केली ही विचारणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या माहितीच्या आधारे निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या बाबत स्वतंत्रपणे सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल. कोणत्याही निर्णय प्रक्रियेमध्ये अंतिम कारवाई संदर्भामध्ये आदेश देणे हे राज्य माहिती आयोगाचे अधिकार कक्षे बाहेरील आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे तसेच दिनांक १७.९.२००७ च्या प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २६.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६०-१६५/२६.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५४६/२००७.

श्री.शामराव दुर्गाजी भांगे,
रा. जयताळा, वार्ड नं. ११५,
जुना बसस्टॉप जवळ,
नागपूर - ४४० ०१६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सह दुय्यम निबंधक,
नागपूर शहर क्रमांक -१. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २६.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी प्रकृतीच्या कारणास्तव सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही. परंतु निर्णय अतितात्काळ द्यावा अशी विनंती केलेली आहे. उत्तरवादीस मात्र आयोगाची लेखी नोटीस दिनांक ६.५.२००८ रोजी काढून सुध्दा गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००७ रोजी सह दुय्यम निबंधक तथा माहिती अधिकारी यांचेकडे मौजा परसोडी, प.ह.नं. ४४, खसरा नं. ७३, येथील जमीनीची झालेली खरेदी विक्री सन १०.२.१९८८ हयावर्षी श्रीमती जसवंताबाई पारेख रा.इतवारी, नागपूर आणि सर्वोदय गृह निर्माण सोसायटी, सचिव श्री.के.डी.राऊत यांचे मध्ये वरील तारखेला आपले कार्यालयामध्ये रजिस्ट्री झालेली आहे. हया बद्यलचा इंडेक्स क्रमांक अर्जदारास आवश्यकता आहे. तरी वरील खरेदी विक्री बाबतचा इंडेक्स क्रमांक अर्जदारास तात्काळ पुरविण्यात यावे. सदरची माहिती वैयक्तिक अथवा टपालाद्वारे जे योग्य वाटेल त्याप्रमाणे असे नमुद केलेले

... २

आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही किंवा माहिती दिली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिनांक ७.८.२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, नागपूर शहर क्रमांक - १ हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे त्यांना सुध्दा ताकीद देणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांना हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करावा.

३) प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व निर्णय न दिल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत असून त्यांच्या गोपनीय अहवालात याबाबतची नोंद घेण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत नोंदणी महानिरिक्षक, पुणे यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २६.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६६-१६८/२६.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४०/२००८.

श्री.महेंद्र नामदेवराव तोटावार,
रा. पो. ता. चिमूर (गुरुदेव वार्ड),
जिल्हा चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी.एस. पायाळ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

श्री. अे. आर. झलके,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००६ रोजी श्री.देवेंद्र पाटील (अर्धघाऊक) केरोसीनबाबत. कालावधी मे, जून व जुलै. माहितीचे वर्णन केरोसीन किरकोळ मिळण्याकरिता किती पुरवठा व किती शिल्लक आहे त्याचा लेखी अहवाल अशी माहिती मागितलेली होती ती कशी घेणार याबद्यल कोणत्याही प्रकारची नोंद दिलेली नाही. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.७.२००६ रोजी तहसीलदार, चिमूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील पुन्हा खालील प्रमाणे मागितलेला दिसून येतो.

... २

१) श्री.देवेंद्र पाटील, राह.चिमूर परवान क्र. ५/९१ यांचेकडून किरकोळ केरोसीन विक्रेत्याला जे बिल देण्यात येते त्याच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्या. २) मे, जून, जुलै महिन्यात किरकोळ केरोसीन विक्रेत्याला जो पुरवठा करण्यात आला त्यांचे स्टॉक बुक व कोणत्या ग्राहकाला किती केरोसीन देण्यात आले आहे, त्यांचे किती युनिट आहे असे दर्शविणारे त्यांचे रजिस्टरचे झेरॉक्स प्रती देण्यात याव्या. कारण श्री.देवेंद्र पाटील यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत योग्य पुरावा मिळू शकतो. ३) श्री.देवेंद्र पाटील यांनी किरकोळ केरोसीन विक्रेता, त्यांचे ग्राहक (१) श्री.रघुनाथ प्यारेलाल बडगरे, राह. खडसंगी, (२) श्री.अ.बारी अ.शेख, राह.चिचघाट, (३) श्रीमती विद्यावती सुंदरलाल त्रिवेदी, राह.खडसंगी, (४) श्री.बबन नामदेवराव बडगरे, राह.खडसंगी, (५) श्री.गोविंदा विठू मेश्राम, राह. बंदर, (६) श्री.श्यामसुंदर अंबरलाल जयस्वाल, राह.खडसंगी, (७) श्री.गिरीधर रामभाऊ मारकवार, राह. शेडेगांव, (८) श्री.गोपाळ कृष्णा वाटे, राह.कोलारा, (९) सौ. शांताबाई अजाबराव डाहुले, राह. कोलारा, (१०) श्री. शेख इब्राहीम शेख हुसेन, राह. मासळ (बु.), (११) श्री.पी.जी.माळवे, राह. सातारा यांचे स्टॉक बुक व ग्राहकांना पुरवठा करण्यात आलेली केरोसीन व युनिट दर्शविलेले रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्या. कारण त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची योग्य माहिती शासनाला होवू शकते. अ) आवश्यक माहितीचे स्वरुप व विषय श्री.देवेंद्र पाटील, राह. चिमूर यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत व किरकोळ विक्रेत्यांना देण्यात येणारा किरकोळ केरोसीन पुरवठा योग्य होण्यासाठी केरोसीन विक्रेत्यांचे स्टॉक बुक, ग्राहकांना देण्यात येणारे केरोसीन याबाबतचा तपशील देण्यात यावा. जेणे करुन भ्रष्टाचारास आळा बसेल. ब) शासनाच्या ज्या विभागाशी माहिती निगडीत आहे त्या विभागाचे किंवा कार्यालयाचे नांव व पत्ता. १) तहसील कार्यालय चिमूर, २) उपजिल्हा पुरवठा अधिकारी, वरोरा, ३) जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर. सदरच्या अपीलाचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला नाही. मात्र अपीलकर्ता यांना तहसीलदार यांचेकडून मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली व तहसीलदार यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये तफावत आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... ३

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कारणमिमांसा दिलेला निर्णय दिला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली असते ती माहिती विहित मुदतीत नसेल, अपूर्ण असेल, खोटी असेल किंवा दिशाभूल करणारी असेल तर त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोनही पक्षकारांच्या उपस्थित सुनावणी घेऊन त्याबद्यलचा कारणमिमांसा देणारा निर्णय घ्यावा लागतो. माहिती अधिकारी यांनी तीच माहिती उपलब्ध करुन देणे व त्याबद्यलचे कोणतेही प्रकारचे पत्र न देणे हे अपीलाचे संकल्पनेत येत नाही व ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहित नाही असे दिसून येते व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक २५.८.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, श्री.देवेंद्र पाटील यांच्या विरुध्द तक्रार आल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्याबाबत अधिकार असल्यामुळे चौकशी ही त्यांनी करावयाची असते. परवाना रद्य करण्याचे अधिकार जिल्हा पुरवठा अधिकारी यांची आहे ते तहसीलदार यांची नाही. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या तफावतीमध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत नाही. श्री.देवेंद्र पाटील, अर्धघाऊक केरोसीन विक्रेता यांना उपलब्ध करुन दिलेल्या केरोसीनच्या संदर्भामध्ये जो भ्रष्टाचार केला होता त्या संदर्भामध्ये प्रत्येक महिन्याच्या संदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तफावत दाखवून अहवाल सादर केला होता. त्या अहवालाची माहिती अपीलकर्ता यांना प्रथम अपीलात माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे गैरसमज झाला असे तहसीलदार यांचे म्हणणे आहे. त्यानंतर श्री. देवेंद्र पाटील यांची जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी चौकशी करुन परवाना निलंबित केला. रुपये ६०००/- दंड भरल्यानंतर त्यांना परवाना दिलेला आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती खरीच आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांना कोणत्या प्रकारची माहिती अपूर्ण व खोटी आहे असे दाखवून द्यावी व त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र प्रथम अपीलामध्ये जी माहिती नव्याने मागितली आहे ती त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही. प्रथम अपीलामध्ये किंवा द्वितीय अपीलामध्ये कोणतेही नव्याने मुद्ये उपस्थित करता येत नाही किंवा नवीन माहिती मागता येत नाही. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तहसीलदार व अर्जदार यांची पुन्हा सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना दिनांक २५.८.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही खोटी, अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे याबाबत चौकशी करुन त्यांना पूर्ण व खरी माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरच्या अपीलाची सुनावणीची तारीख व वेळ अपीलकर्ता अर्जदार यांना व माहिती अधिकारी यांना कळवून सुनावणी घेवून कारणमिमांसा देणारा निर्णय द्यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २६.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४३/२००८.

श्री.रिजवान अहेमद खान मीरनवाज खान,
पशु वैद्यकीय दवाखाना, कुरणखेड,
ता. जि. अकोला - ४४४ १०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी.डी.खंदारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, पुसद
जिल्हा यवतमाळ.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
ऊर्दु हायस्कूल, पुसद
ता. पुसद, जिल्हा यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे विना अनुमतीने गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे श्री. फुरकान अहेमद खान मीरनवाज खान यांची जन्मतारीखेची टी.सी. व बोर्ड प्रमाणपत्र तफावत बाबत व बदलून देणेबाबत सन १९९१ मार्च मध्ये प्रथम श्रेणीमध्ये एस.एस.सी. उत्तीर्ण झाले त्यांचे शाळा सोडण्याचे दाखल्यावर जन्म दिनांक २२.३.१९७५ अशी व शाळा बोर्ड प्रमाणपत्र एस.एस.सी. चा दिनांक १५ ऑक्टोंबर १९९१ रोजी दिलेला त्यांचेवर जन्म दिनांक २३.३.१९७५ अशी आहे. ही चुक कशी झाली व आपण जन्म तारीख दुरुस्त

... २

करुन सुधारित जन्मतारखेचे बोर्ड प्रमाणपत्र कधी देणार फुरकान खान यांची खरी जन्मतारीख २२.३.१९७५ अशी आहे. सदरची माहिती रजिस्टर टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दिनांक २७.१.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २०.३.२००७ रोजी सदरची शाळा ही खाजगी शाळा असल्यामुळे माहिती अधिकारी हे त्याच शाळेचे मुख्याध्यापक असून प्रथम अपीलीय अधिकारी खाजगी शाळेचे म्हणजेच त्याच संस्थेचे सचिव हे आहेत असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जन्म तारखेची दुरुस्ती करुन माहितीच्या अधिकारात माहिती मागितली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जी माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असते त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये अंतिम कार्यवाहीचे आदेश देण्याची तरतुद ही अधिनियमामध्ये नसल्यामुळे व तसा अधिनियमाचा उद्येश नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अर्जातील विनंती ही मान्य करता येण्या सारखी नाही. तरी सुध्दा माहितीचा अर्ज आल्यानंतर माहिती अधिकारी यांनी त्या अर्जाचे संदर्भामध्ये त्यांना योग्य वाटेल तसे विहित मुदतीत उत्तर देणे आवश्यक असते व या अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील याचे निष्कारण भुर्दुंड करावा लागला आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. वास्तविक जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ऊर्दु हायस्कूल, पुसद यांनी सदरच्या प्रकरणात हजर राहण्यासाठी आयोगाचे कार्यालयातील दिनांक ४.४.२००८ रोजी नोटीस काढण्ययात आले होते. परंतु माहिती अधिकारी हे आयोगाचे कार्यालयात कोणत्याही तारखेस हजर झालेले दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००७ रोजी प्रथम अपील केले होते त्यावेळेस प्रथम अपीलीय अधिकारी

... ३

संस्थेचे सचिव होते. परंतु पुन्हा शासनाने आदेश काढून प्रथम अपीलीय अधिकारी हे गटशिक्षणाधिकारी आहेत व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आता सुध्दा त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कडून माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने आदेश देण्यास हरकत नाही व तसे आदेश जनमाहिती अधिकारी यांनी देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ऊर्दु हायस्कूल, पुसद यांना अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश हा निर्णय मिळाल्यानंतर देण्यात यावा.

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ऊर्दु हायस्कूल, पुसद यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १८.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे त्यांच्या कार्यालयामध्ये असलेल्या जन्म तारखेच्या नोंदींच्या संदर्भामध्ये छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २७.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६९-१७२/२७.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६६/२००८.**

श्री. श्रीहरी बोंडकु पिपरे,
रा. कच्चेपार, पो. आलेवाही,
ता. सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जिल्हा चंद्रपूर.

कु. आय. डी. मून,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेविका,
ग्राम पंचायत कच्चेपार,
ता. सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, कच्चेपार यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मौजा ग्राम पंचायत, कच्चेपार येथील ग्राम पंचायत घर क्रमांक १८१ बाबत. माहितीचा कालावधी सन १९९९ ते सन २००६ पर्यंत. १) ग्राम पंचायत घर क्रमांक १८१ चा घर टॅक्स कोणत्या वर्षीपासून आकारण्यात आला. २) अतिक्रमण शासनाचे जागेवर असलेल्या घराचा टॅक्स ग्रामपंचायतला लावून वसूल करण्याचा अधिकार आहे काय ? असल्यास मु.ग्रा.पं.अधिनियमाचे कोणत्या कलमान्वये, ३) शासनाचे आबादी जागेत अतिक्रमण असतांना अतिक्रमण दूर

... २

करण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ? असल्यास कोणत्या नियमाप्रमाणे. ४) २००६-२००७ चा घर टॅक्स वसूल केल्यानंतर तो रद्द करण्याचा ग्रामपंचायत कमेटीला आहे काय ? असल्यास अधिनियमाचे कोणत्या कलमान्वये. ५) घर टॅक्स रद्द करण्याचा कमेटीचा ठरावाची सत्यप्रत. ६) ग्रामपंचायतने अतिक्रमण हटविण्याबाबत तहसीलदार, सिंदेवाही यांना केलेला अर्ज व आदेशाची सत्यप्रत. ७) ग्राम पंचायतचे अधिकार क्षेत्रात सदर जागा येते का ? ग्रामपंचायतने गट नं. ८ वरील अतिक्रमण असलेली घरे कां पाडली नाहीत ? याचे सविस्तर वर्णन द्यावे. अर्जदार व गट नं. ८ यांचे घरांना सर्व नियम सारखे नाही कां ? ८) गट नं. ८ वरील घराचा टॅक्स कां रद्द केला नाही ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ (प्राप्त दिनांक २७.११.२००६) हजर असलेले तत्कालीन ग्रामसेविका यांनी असे सांगितले की, दिनांक २७.१२.२००६ रोजी जावक क्रमांक ९४ प्रमाणे अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार बाबत फी भरुन माहिती नेण्याबाबत रुपये ५००/- फी ग्राम पंचायत दप्तरी भरुन माहिती घेवून जावी असे कळविण्यात आले होते. परंतु सदरचे पत्र घेण्यास अपीलकर्ता यांनी नकार दिला होता असे श्री. सुर्यभान दादाजी गायकवाड, ग्राम पंचायत चपराशी, कच्चेपार यांनी बयान पत्र लिहून दिले की, दिनांक २७.१२.२००६ ला श्री.श्रीहरी बोंडकुजी पिपरे, रा.कच्चेपार यांना माहितीचा अधिकार संबंधाने ग्रामपंचायत कार्यालय पत्र क्रमांक ९४/०६, दिनांक २७.१२.२००६ ला नेवून दिले असता श्री. श्रीहरी बोंडकूजी पिपरे सदर पत्र घेण्यास नकार दिला. तसे मी उपसरपंच श्री.विलास केशव पिपरे यांचे समक्ष श्री.पी.पी.भडके, सचिव यांना येवून सांगितले असे बयाण लिहून दिलेले आहे. सदरच्या बयाणाची प्रत जोडण्यात आलेली आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ८ मुद्यांवर मुद्ये निहाय उत्तर तयार करुन ठेवण्यात आले होते असे ही ग्राम सचिव यांनी सांगितले व त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले असे सांगितले. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तदतुदीचे

उल्लंघन केलेले आहे व त्यांना त्याबाबत ताकीद देणे आवश्यक आहे. तत्कालीन माहिती अधिकारी यांनी रुपये ५००/- मागितलेली फी कोणत्या आधारे मागितली असे त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की माहितीचा खर्च व अतिक्रमण काढण्याकरिता जे मजूर लावण्यात आले त्यांचा खर्च असे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये पृष्ठ रुपये २/- प्रमाणे ऐवढाच खर्च आकारता येतो कोणत्याही प्रकारचा अन्य खर्च माहितीच्या अधिकाराचे माध्यमातून वसूल करता येत नाही व त्यामुळेच सदरची माहिती अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणास नकार दिलेला असावा असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जामध्ये मागितलेली ८ मुद्यांमधील माहिती मुद्दे निहाय उपलब्ध करुन द्यावी व त्या सोबत त्या त्या मुद्यांच्या संदर्भात ग्रामपंचायतीचे ठरावाची प्रत किंवा नियमान्वये छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी सुध्दा सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जनमाहिती अधिकारी यांचेकडे जाऊन सदरची माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २७.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१७६-१७८/२७.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये पुर्नविलोकन अर्ज क्रमांक ३/२००८.

श्री. चंद्रभान शंकरराव जिरापूरे,
२७, चंद्रशिल, मधुबन कॉलनी,
धामणगांव रोड,
ता. जिल्हा यवतमाळ. **..... अर्जदार**

श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे,
ग्रामसेवक,
द्वारा- गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अमरावती **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
अमरावती (ग्रामीण), अमरावती.

श्री.एच.एल.उंबरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी पोलीस उपअधिक्षक, (मुख्यालय),
अमरावती (ग्रामीण), अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.५.२००८)**

## नि र्ण य

अर्जदार यांनी दिनांक २१.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपील क्रमांक ४९९/२००७ मध्ये दिनांक २८.११.२००७ रोजी दिलेल्या निर्णयातील आदेशाच्या संदर्भात पुर्नविलोकन अर्ज सादर केला आहे. सदरच्या पुर्नविलोकन अर्जाची चौकशी दिनांक २८.५.२००८ रोजी करण्यात आली. पुर्नविलोकन अर्जदार हे हजर आहेत. अपील क्रमांक ४९९/२००७ मध्ये अपीलकर्ता श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण), अमरावती जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय)

... २

अमरावती (ग्रामीण) अमरावती यांना दिनांक २४.४.२००८ रोजी पुर्नविलोकन अर्जाचे संदर्भामध्ये सुनावणी करिता उपस्थित राहण्याकरिता नोटीस काढण्यात आले होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी हे दोनही अधिकारी विनाअनुमती गैरहजर आहेत.

२. पुर्नविलोकन अर्जदार श्री. चंद्रकांत शंकरराव जिरापुरे हे अपील क्रमांक ४९९/२००७ मध्ये जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), अमरावती (ग्रामीण) अमरावती कार्यालय म्हणून पक्षकार होते. सदरच्या अपील क्रमांक ४९९/२००७ मध्ये खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. १) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती माहिती देण्याच्या संदर्भात राज्य जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक यांनी जाणीवपूर्वक माहिती नाकारली असल्यामुळे व त्यानंतर प्रथम अपीलात सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी असून त्यांचेवर अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ही शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची वसुली ही पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण) यांनी चौकशी करुन व जबाबदारी निश्चित करुन हा निर्णय मिळाल्यापासून तीन महिन्याचे आंत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनातून वसूल करुन तसा अनुपालन अहवाल आयोगाकडे दाखल करावा. २) अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांनी माहितीकरिता भरलेल्या खर्चाचे रुपये ३२/- हे त्यांना निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत परत करण्यात यावे. ३) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण), अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी. ४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी. अशा प्रकारे आदेश दिलेले आहेत. सदरच्या निर्णयामध्ये पुन्हा विवेचन करतांना सदरच्या प्रकरणात प्रथम अपीलाचे माध्यमातून जरी माहिती मिळवून दिलेली असेल तरी ती माहिती उपलब्ध असून सुध्दा ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरिता माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात हे वर नमुद केलेले आहे व त्या संदर्भात माहिती अधिकारी किंवा संबंधित माहिती अधिकारी ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल ते सर्व कर्मचारी व अधिकारी दोषी आढळून येतात. त्यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून ते सुध्दा दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र दिसून येतात. यावरुन

पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण), अमरावती यांनी आयोगाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे चौकशी करुन संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता सहाय्य घेतले असेल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांची सुध्दा चौकशी करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन लादलेली रुपये २५,०००/- शास्तीची वसुली करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास दाखल करावयास पाहिजे होता. परंतु तो दाखल केलेला नाही व त्यामुळे पुर्नविलोकन अर्जदार हे जरी संबंधित माहिती अधिकारी असले तरी सुध्दा त्यांनी ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असतील असे व त्यांनी उपलब्ध करुन दिलेली माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल त्या सर्वाची या संबंधामध्ये चौकशी करुन शास्ती करिता जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते व त्याकरिता पुर्नविलोकन अर्जाचा विचार करता येत नाही. आयोगाच्या अपील क्रमांक ४९९/२००७ मधील आदेशाप्रमाणे चौकशी केल्या नंतरच व जबाबदारी निश्चित केल्या नंतरच शास्ती बद्दलची कार्यवाही करणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) पुर्नविलोकन अर्जदार श्री. चंद्रकांत शंकरराव जिरापुरे यांचा पुर्नविलोकन अर्ज हा निकाली काढण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक ४९९/२००७ मध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण), अमरावती यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन आदेशात दिलेली शास्ती त्याप्रमाणे वसूल करण्यात येऊन आयोगाकडे अहवाल सादर करावा.

३) पुर्नविलोकन अर्जदार व पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण), अमरावती यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २८.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१७९-१८१/२८.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११०९ /२००७.

श्री.सचिन प्रकाश परळकर,
रा. शुक्रवारपेठ, मन्नासिंह चौक,
ता. जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, वाशिम.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, वाशिम. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.५.२००८ रोजी घेण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २७.२.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे सदरची सुनावणी घेण्यात आली नव्हती. मात्र जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे उपस्थित होते व त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे व त्यामुळे आज ते हजर दिसून येत नाहीत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००६ रोजी श्री.काशिरामजी पाटील विद्यालय, सुपखेला येथील शिक्षकांचे आपल्या कार्यालयात सादर केलेल्या त्यांच्या वैयक्तिक मान्यता मिळण्याबाबतच्या प्रस्तावानुसार सचिन प्रकाश परळकर सहाय्यक शिक्षक यांच्याबाबत आपल्या कार्यालयाकडून (Issue) इश्यू झालेले दिनांक २८.३.२००६ रोजीच्या मान्यता आदेशानुसार एस.टी. अनुशेषाबाबतच्या पत्राची (सत्यप्रत) नक्कल. माहिती

रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा कोणताही निर्णय झालेला नसल्यामुळे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी सांगितले व ते खरे ही दिसून येते. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाश्यामध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.१२.२००६ च्या अर्जावर दिनांक २२.३.२००७ रोजी कळविण्यात आलेले आहे असे नमुद केलेले आहे. तसेच माहिती दिल्याचा दिनांक ५.४.२००७ असा ही नमुद केलेला आहे. या कार्यालयाचे पत्र क्रमांक २१८७, दिनांक १७.३.२००७ अन्वये माहिती या कार्यालयाचे लिपिकामार्फत माहिती प्राप्त करुन घेण्याबाबतचे पत्र पाठविले होते. परंतु सदर पत्र घेण्यास नकार दिला त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला व त्याबाबतची पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेली आहे. दिनांक १७.३.२००७ च्या पत्रावर दिनांक २०.३.२००७ ला प्रत्यक्ष पत्र घेवून गेलो असता पत्र घेण्यास नकार दिला असा शेरा आहे व खाली सही आहे. पुन्हा उपशिक्षणाधिकारी यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी पुन्हा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. मात्र त्यासोबत आयोगाचे कार्यालयात मान्यता प्रपत्र अ आदेश मुख्याध्यापक, श्री.काशीरामजी पाटील विद्यालय, सुपखेला, वाशिम यांना शिक्षणाधिकारी यांनी १) श्री. आर.ए.सवाई, २) श्री. एस.बी. महल्ले, ३) श्री. ए.बी. कांबळे व ४) श्री. एस.पी. परळकर यांच्या संदर्भातील आदेशाची छायांकित प्रत जोडलेली दिसून येते. पुन्हा प्रथम अपीलाचा निर्णय न देता दिनांक ५.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा खुलासा केलेला आहे. दिनांक २७.२.२००८ रोजी वाशिम येथे सुनावणी ठेवून सदर सुनावणीस अहवाल सादर करण्यासाठी तत्पुर्वी अपीलकर्त्यास माहिती मिळाली नाही किंवा कसे जाणून घेण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष/सचिव, मुख्याध्यापक व अपीलकर्ता यांना बोलावून सुनावणी घेण्यात येत आहे. या सुनावणीस खालील व्यक्ती उपस्थित होते. १) अपीलकर्ता श्री.सचिन प्रकाश परळकर हजर, २) प्रभारी मुख्याध्यापक श्री.एस.बी.महल्ले हजर, ३) संस्थेचे अध्यक्ष श्री. एस.के.पाटील अनुपस्थित, ४)

संस्थेचे सचिव श्री.पाठक अनुपस्थित. अपीलकर्ता श्री.सचिन प्रकाश परळकर यांना विचारले असता त्यांनी खालील प्रमाणे उत्तर दिले. १) मी श्री.परळकर यांनी दिनांक ६.२.२००६ ला माहिती मिळविण्यासाठी अर्ज केले असून त्यामध्ये संस्थेच्या शाळेच्या रोस्टरची प्रत व श्री.सचिन परळकर यांचे प्रस्तावाची मागणी केली होती. परंतु माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दिनांक २१.१२.२००६ ला शिक्षणाधिकारी यांचेकडे केले व त्यानंतर द्वितीय अपील केले. परंतु सदरची माहिती विहित मुदतीत न मिळता ती दिनांक २.४.२००७ नंतर प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. सदर जी माहिती मागितली ती मिळाली. याबाबत माझी काहीही तक्रार राहिलेली नाही. असे दिनांक २५.२.२००८ रोजी श्री.सचिन परळकर यांनी लिहून दिलेली दिसते. प्रभारी मुख्याध्यापक श्री.एस.बी.महल्ले यांना विचारले असता या संदर्भातील श्री.सचिन परळकर व आपल्या कार्यालयाकडून कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही असे सांगितले. सदरची माहिती प्राप्त झाल्याची सही अपीलकर्ता यांची आहे असे त्यांनी सांगितले. परंतु आदेशाची प्रत्यक्ष प्रत दिलेली नाही व सेवेत घेण्याचे आदेश देण्यात आलेले आहे परंतु त्याबाबत प्रत्यक्ष कार्यवाही करीत नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरिता जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी हे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात. जनमाहिती अधिकारी दोषी आढळल्यावर त्यांचे विरुध्द शास्ती लादावयाची असल्यास त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावयाचे असते परंतु आज त्यांना सुनावणीचे पत्र दिलेले असतांना सुध्दा सुनावणीस हजर झाले नाही व त्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेले नाही. तसेच आयोगापुढे सुध्दा सुनावणीस हजर झालेले नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.१२.२००६ च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.१२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां  लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा राज्य माहिती आयोगाकडे १० दिवसाचे आंत करण्यात यावा.

३)  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २८.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१७९-१८२/२८.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४६/२००७.

श्री.राजेंद्र गयादीन गंगोत्री,
रा. रामनगर, मरारटोली,
पो. शंकरनगर, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री.अरविंद डोंगरे,
जनमाहिती अधिकारी तथा
शास्त्र सल्लागार,
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.५.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक यांचेकडे रविंद्र कनिष्ठ अध्यापक विद्यालय, रेशीमबाग, नागपूर येथील शिक्षकांबाबत. माहितीचा कालावधी २००० ते २००६ खालील ८ मुद्यांच्या माध्यमातून माहिती मागितलेली दिसून येते. १) वरील अध्यापक विद्यालयाची व्यवस्थापन संस्था, श्री.गुरुदेव एज्युकेशन सोसायटी, नागपूर द्वारे संचालित नागपूर महिला विद्यालय, रेशीमबाग येथे सन १९९९-२००० मध्ये अतिरिक्त ठरलेले ३ वरिष्ठ श्रेणी शिक्षकांचे संस्थे अंतर्गत

... २

समायोजन करण्यासाठी सेवा जेष्ठतेनुसार शाळेतील २ शिक्षकांना वरील अध्यापक विद्यालय मध्ये रिक्त पदी बदली आणि शाळेतील मुख्याध्यापकाच्या रिक्त पदी पदोन्नती करण्याचे शिक्षण उपसंचालक यांनी दिनांक २ डिसेंबर २००० मध्ये आदेश दिले होते कां ? व त्यापूर्वी दिनांक २४.१.२००० रोजी अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन करण्याबाबत कळविण्यात आले होते कां ? २) संस्थेअंतर्गत अतिरिक्त शिक्षक असल्याने त्या सर्वांचे समावेशन झाल्याशिवाय कोणतीही नवीन नियुक्ती अनुदान मान्यतेकरिता पात्र ठरत नाही असेही कळविण्यात आले होते कां ? ३) शाळेतील सेवाजेष्ठ शिक्षक आणि अध्यापक विद्यालय येथील शिक्षकांची शैक्षणिक पात्रता सारखी असल्याने त्याची सेवाजेष्ठता यादी कॉमन होती व परस्पर बदली होण्यास ते पात्र होते म्हणून २ डिसेंबर २००० मध्ये वरील निर्णय देण्यात आला होता कां ? ४) परंतु व्यवस्थापनाने श्रीमती रजनी निंबाळकर केवळ या एकच शिक्षकाची बदली केली व विज्ञान शिक्षकाचे दुसऱ्या रिक्त पदी श्रीमती भाग्यश्री पूंजे, बी.एस.सी., बी.एड्. (बायो) याची नवीन नियुक्ती केली कां ? ५) संस्थे अंतर्गत विज्ञान शिक्षक अतिरिक्त असतांना नवीन विज्ञान शिक्षकाची नियुक्ती नियमबाहय होती म्हणून नोव्हेंबर २००१ मध्ये शिक्षण उपसंचालक यांनी कु. पुंजे यांची नियुक्तीस मान्यता नाकारली होती कां ? ६) व्यवस्थापन सचिव श्री.अहिरराव ची भाची आणि अध्यक्ष श्रीमती पुंजे यांची मुलगी असल्याने शिक्षण उपसंचालक यांचे दिनांक २.१२.२००० आणि दिनांक १.११.२००१ चे आदेशाची व्यवस्थापन ने अवमानना केली आणि कु. भाग्यश्री पुंजे ला कमी करुन शाळेतील सेवाजेष्ठ विज्ञान शिक्षक श्री.बी.जी.वानखेडे यांना अध्यापक विद्यालय येथे समायोजित करण्यात टाळाटाळ केली कां ? ७) दिनांक २.१२.२००० च्या शिक्षण उपसंचालक यांचे आदेशाची अवमानना कां केली याबाबत व्यवस्थापनाचा जाब विचारुन अध्यापक विद्यालयाचा वेतन अनुदान स्थगित कां करण्यात येऊ नये असा कारणे दाखवा नोटिस दिनांक १४.८.२००३ रोजी व्यवस्थापनाला देण्यात आला होता कां ? ८) दिनांक २.१२.२००० च्या आदेशाप्रमाणे वरिष्ठ विज्ञान शिक्षक श्री. बी. जी. वानखेडे यांची बदली द्वारे अध्यापक विद्यालय येथे नियुक्ती करावी पुन्हा असा आदेश दिनांक १५.१०.२००३ रोजी दिला गेला होता कां ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.२.२००७ रोजी माहिती अधिकारी कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी आपण माहितीच्या अधिकारामध्ये प्रश्नांद्वारे माहिती मागितलेली असून प्रश्नोत्तरे स्वरुपात माहिती देण्याची नियमात तरतुद नाही.

... ३

संबंधित प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. सदर अर्जात नेमके कोणते कागदपत्रे पाहिजेत हे नमुद नसल्याने आपला संदर्भीय अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविले होते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी शिक्षण उपसंचालक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये दिनांक २३.३.२००७ रोजी शिक्षण उपसंचालक यांनी दिनांक १४.२.२००७ रोजीचे उत्तर दिलेले आहे ते कायम केले आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविले आहे. सदरच्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.२.२००७ च्या अर्जामध्ये विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराचे अनुषंगाने विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी एकूण ८ मुद्यांवर माहिती विचारलेली आहे. सदरची माहिती ही प्रश्नोत्तराचे स्वरुपात मागितलेली असून त्या प्रश्नांमधून कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचाच अर्थ निघतो व त्यामुळे त्यांनी ज्या ज्या आदेशाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे त्या आदेशाचया संदर्भामध्ये कागदपत्रांचे स्वरुपात छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. ज्या प्रश्नाचे संदर्भामध्ये आदेश उपलब्ध नाही त्याबाबत आदेश उपलब्ध नाही असेही उत्तर देता आले असते. प्रश्न दोन प्रकारचे असतात ज्या प्रश्नाचे उत्तरातून अभिलेख किंवा कागदपत्रे उपलब्ध करुन देता येतात अशा प्रकारचे प्रश्न किंवा ज्या प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कां, कसे व केंव्हा असे अभिप्राय येत असेल तर अशा प्रकारच्या प्रश्नांचे उत्तरे ही माहितीच्या अधिकारा खाली येत नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) मध्ये "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात माहिती उपलब्ध असेल उदा. :- अभिलेख, दस्तऐवज इत्यादी त्या स्वरुपात त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेणे असा होतो, हा अर्थ "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये अंतर्गत आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या ८ मुद्यांपैकी ६ वा मुद्या वगळल्यास त्यांना माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे जरी माहिती ही प्रश्नाच्या स्वरुपात आहे म्हणून नाकारली

होती तरी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कारणमिमांसा निर्णय देणे आवश्यक असते. एखादे प्रशासकीय पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी अपेक्षा नाही. माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी बाब जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षित असते. तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोनही पक्षकारांच्या उपस्थित माहिती कशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन देता येईल अशा प्रकारे कारणमिमांसा निर्णय आवश्यक असते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले आहे व यापुढे दोनही पक्षकारांच्या उपस्थित कारणमिमांसा निर्णय घेणे आवश्यक राहिल. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक यांना प्रश्नाचे स्वरुपात माहिती विचारली आहे म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही हे पत्र सद्‌भावनेने दिलेले दिसून येते. कारण माहिती उपलब्ध करुन देण्याची त्यांची कोणतीही अडचण नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक ६ वगळून ७ मुद्यांच्या संदर्भात कागदपत्रे किंवा अभिलेखाच्या स्वरुपात माहिती असल्यास त्यांची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.२.२००७ च्या ६ वा मुद्या वगळून माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात प्रमाणित करुन विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत सदरची माहिती व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे जाऊन उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २९.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१८३-१८९/२९.५.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३/२००८.

श्री.ओमप्रकाश यशवंत सुरवाडे,
मु. पो. बटवाडी, ता. बाळापूर,
जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
बाळापूर, जिल्हा अकोला.

श्री.डी. जी. भटकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, सेवा सहकारी संस्था,
बाळापूर, जिल्हा अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.५.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.५.२००८ रोजी घेण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असे त्यांनी दिनांक २१.४.२००८ रोजी आयोगाचे समोर लिहून दिलेले होते. परंतु सदरचे पत्र हे माहिती अधिकारी यांनी आयोगास आज सुनावणीच्या वेळेस सादर केले व पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व तशा प्रकारचे लेखी सुध्दा लिहून दिलेले आहे असा आयोगाकडे खुलासा केलेला असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २९.५.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१९०/२९.५.२००८

## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५४/२००७.

श्री.दिनेश सखाराम पारधी,
मु. बोथली, पो. खजरी,
ता. सडक अर्जुनी,
जिल्हा गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.डी. व्ही. बन्सोड,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग,
गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.५.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. जिल्हा परिषद पाटबंधारे विभागा अंतर्गत कनिष्ठ अभियंता तालुक्यात केलेल्या कामाची माहिती मिळण्याबाबत. माहितीचा तपशील १) सन २००५ ते आज दिनांक ८.२.२००६ पर्यंत सडक अर्जुनी तालुक्यात रोजगार हमी योजना/रा.गो.यो./राका धाका/जिल्हा परिषद शेष फंड/प.श. सडकअर्जुनी शेष फंड/नहर दुरुस्ती, तलाव खोलीकरण, सिमेंट प्लग बंधारे, जवाहर रोजगार योजनेच्या विहिरी अशी किती कामे सडक अर्जुनी तालुक्यात करण्यात आली. २) सदर कामावरील मजूर संख्या, मजुरांचे दिवस किती ? ३) किती कामांना मंजूरी मिळाली व मंजूर झालेला निधी तसेच खर्च झालेला निधी किती ? ४) सदर कामे करतांना मजूरी म्हणून मजूरांना

... २

देण्यात आलेली रोख रक्कम व गहु व तांदुळाची कुपन किती. ५) सदर कामांची माहिती मस्टर सहीत देण्यात यावी. ६) सदर काम करणाऱ्या मजुरांची मजुरी म्हणून प्रतिदिवस रोजंदारी किती ठरविण्यात आली ? परंतु त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सदरचा अर्ज हा त्यांच्या कार्यालयात प्राप्त

झाला नव्हता म्हणून त्यांना दिनांक १८.४.२००७ रोजी त्याप्रमाणे कळविण्यात आले होते. परंतु विलंबाबाबत जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांचा स्मरण पत्राचे अर्ज सुध्दा पोस्टाने प्राप्त झाल्या नंतर दिनांक १०.४.२००७ रोजी नोंद झालेली आहे त्यामुळे त्यांनी पुन्हा अर्ज सादर करावा असे कळविण्यात आले होते. वास्तविक अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी दाखल केलेला अर्ज हा त्यांना पोस्टाने पाठविलेला दिसून येतो व त्यावर यु.पी.सी.चे प्रमाणपत्र आहे. कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया व तसेच कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, गोंदिया अशा प्रकारे त्यांना अर्ज पाठविलेले दिसते. परंतु सदरचे अर्ज उपलब्ध झाले नाही असेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी त्या दरम्यानचे आवक नोंदवही सुध्दा दाखविली आहे व त्या अर्जाची नोंद झालेली दिसून येत नाही असे पुन्हा सांगितले. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे त्यांना हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसाचे आंत मागितलेली माहिती मुद्दे निहाय छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २९.५.२००८**

HIREKHAN/BHUJI/१९१-१९२/२९.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५७/२००७.**

श्री.मुकेश श्रीनारायण शर्मा,
रा. जी.एस.कॉलेज समोर,
अमरावती रोड, गिरीपेठ,
नागपूर - १०. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

जनमाहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
ग्राहक तक्रार निवारण समिती,
प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.५.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११(१) अन्वये अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.५.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांच्या तर्फे श्री.एन.बी.रामटेके, वकील यांनी सदरचे अपील हे मागे घेत आहे. अशा प्रकारचा अर्ज दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ३०.५.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१९३/३०.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५९/२००७.**

श्री.विजय ज्ञानदेव भगत,
रा. फुलमाळी यांचे घरी,
सिध्दार्थनगर, कामठी रोड,
टेका, नागपूर - १७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.ए.एम.भरकाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अप्पर जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

श्री.शिरीष पांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.५.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक ७.२.२००७) शासकीय माहिती अधिकारी तथा अन्न पुरवठा, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडे चंद्रपूर शहरातील रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्या अधिकाऱ्यांची सी.आय.डी.पोलीस खात्यामार्फत गोपनीय चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत. दिनांक १९.१०.२००६ रोजी दिलेला अर्ज माहिती मागण्याचे कारण वरिष्ठांकडून योग्य कारवाई करुन घेण्याकरिता. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

... २

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.३.२००७ रोजी उपरोक्त विषयांकित आपला अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून आपण संदर्भांकित अर्जान्वये मागीतलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नसल्याने व उपरोक्त माहिती या कार्यालयास नसल्यामुळे या कार्यालयास प्राप्त झालेला अर्जावर माहिती देता येत नाही. सबब अर्ज याद्वारे नस्तीबध्द करण्यात येत आहे असे जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर करिता यांनी कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र दिनांक १७.३.२००७ रोजी प्राप्त झाले असे त्यावर अपीलकर्ता यांचा शेरा दिसत आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी शासकीय अपीलीय माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडे अपील केले. पुन्हा तशाच प्रकारे माहितीचे विवरण करुन प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील जोडपत्र ब अन्वये दाखल केलेला अपील अर्ज या कार्यालयांस प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अर्जामधील अनुक्रमांक ४ माहितीचा विषय या स्तंभाखाली आपण कारवाई करण्यासंबंधात कळविले आहे. याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायदयामध्ये आपणांस पाहिजे असलेली माहिती पुरविण्याबाबतच्या तरतुदी आहेत. कार्यवाही करण्याबाबतच्या तरतुदी नाहीत. सबब आपण दाखल केलेला अर्ज नस्ती करण्यांत येत आहे असे कळविलेले दिसते. त्यानंतर पुन्हा दिनांक ३०.३.२००७ रोजी अपीलीय माहिती अधिकारी म्हणून अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे चौकशी करुन कार्यवाही न केल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन कार्यवाही करुन घेण्याकरिता असे कारण देऊन प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ९.४.२००७ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी याबाबत आपणांस या कार्यालयाचे पत्र क्रमांक कावि/प्रस्तुत/अतिजि/२००७/११८, दिनांक १४.३.२००७ अन्वये कळविण्यांत आलेले आहे. तरी पुनश्च याद्वारे कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायदयामध्ये आपणांस पाहिजे असलेली माहिती पुरविणे अथवा पाहणे बाबतच्या तरतुदी आहेत. कोणत्याही अधिकाऱ्यावर अथवा कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्याबाबतच्या तरतुदी नाहीत. सबब आपण दाखल केलेला अपील अर्ज नस्ती करण्यांत येत आहे व त्यातही अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००७ मधील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक १९.१०.२००६ रोजी प्राप्त झालेला अर्ज हा राष्ट्रवादी भीमशक्ती संघटन या नावाने आवक नोंद झालेली आहे. परंतु श्री.विजय भगत या नावाने नोंद न झाल्यामुळे सदरच्या अर्जात संदर्भ लिहिलेला नाही व माहितीच्या अर्जामध्ये सुध्दा चंद्रपूर शहरातील रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्या अधिकाऱ्यांची सी.आय.डी. पोलीस खात्यामार्फत गोपनीय चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे. वरिष्ठांकडून योग्य कारवाई करुन घेण्याकरिता असे नमुद केलेले असल्यामुळे त्या प्रकारचे उत्तर त्यांना दिनांक १५.३.२००७ रोजी देण्यात आले. तसेच प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे उत्तर दिले आहे त्या उत्तराचे अनुषंगाने प्रथम अपील मेमोचे सुध्दा अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन कार्यवाही करुन घेण्याकरिता असे कारण दिलेले दिसून येते व त्यामुळेच दिनांक १५.३.२००७ व दिनांक ९.४.२००७ चे उत्तर देण्यात आले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती मागतांना माहितीचे वर्णन हे अतिशय काटेकोरपणे दिलेले पाहिजे ते त्यांनी दिलेले नाही त्यांनी ज्या लेटर हेडवर दिनांक १९.१०.२००६ दिलेले आहे त्या लेटर हेडवरचा संदर्भ दिला असता तर सदरच्या अर्जाचा संदर्भ लिहिला असता. त्याकरिता वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी आवक नोंदवहीची झेरॉक्स प्रती दाखल केलेल्या आहे व त्यामध्ये दिनांक १९.१०.२००६ रोजी कार्यालयीन अनुक्रमांक ९६३६ च्या समोर राष्ट्रवादी भीमशक्ती संघटन अशा प्रकारची नोंद दिसून येते व माहितीच्या अर्जात मात्र त्याबाबतचा उल्लेख नसल्यामुळे सदरच्या अर्जाचे संदर्भात लिहिलेले दिसून येत नाही हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी आता दिनांक १९.१०.२००६ च्या अर्जाबाबत स्पष्टता झालेली असल्यामुळे सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाही बद्यल छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.२.२००७ च्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या दिनांक १९.१०.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात झालेली कार्यवाही बद्यलची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६३/२००७.**

श्री.सुखदेव संपतराव रायबोले,
रा. नवथळ (बु.), ता. भातकुली,
जिल्हा अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.अजय लहाने,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी,
अमरावती.

श्री.व्ही.डी.काळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी तहसीलदार,
ता. भातकुली,
जिल्हा अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.५.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून तहसील कार्यालय, भातकुली यांच्याकडे गावठाण्यातील प्लॉट उपलब्ध असूनही दिनांक ८.९.२००३ पासून न दिल्याने अतिक्रमण करण्यात आले. त्याबाबत ५००/- रुपये दंड भरुन अतिक्रमण मान्य असल्याचे सिध्द झाले. राहवयास घर (निवारा) म्हणून आवश्यक असतांनाही न मिळणे त्या कायद्याचा हक्क नष्ट करणे होय. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. दिनांक ८.९.२००३ पासून निवारासाठी जागा न मिळाल्याने नाईलाजास्तव

... २

अतिक्रमण करणे भाग होते. त्याबाबत तलाठी यांच्या मिळालेल्या नोटीसवरुन हजर झाल्याने केलेले अतिक्रमण मान्य म्हणून सुचनेचे पालन म्हणून ५००/- रुपये दंड सुध्दा भरला. पुढील निवारा बाबत काय ? अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.९.२००६ रोजी आपल्या अर्जाचे अवलोकन केले असता आपण कुठलीही माहिती मागितली नसल्याचे दिसून येते. तरी आपण व्यक्तिशः येऊन अडचण सांगावी. तसेच निवाऱ्याबाबत पुढे काय असा प्रश्न विचारला आहे. गावात प्लॉट उपलब्ध असल्यास आपण या कार्यालयास रितसर अर्ज करावा असे कळविल्याचे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल करुन त्यामध्ये १) घर बांधण्यासाठी दिनांक ८.९.२००३ ला तहसील कार्यालय, भातकुली यांना रितसर अर्ज दिला. २) त्याचा विचार न झाल्याने दिनांक ६.१०.२००३ ला लोकशाही दिनी विनंती करुन टोकन क्रमांक ३९ त्याचा सुध्दा अहवाल मिळाला नाही. ३) मे २००५ ला ॲड.एस.टी.खंडारे यांचे जागेवर कुडामातीचे घर बांधले. ४) पटवारी यांचे मतानुसार नोटीसवरुन अतिक्रमण बाबत ५००/- रुपये दंड भरला. ५) येथे राहत असलेल्या ७-८ लोकांनी सरकारी जागेवर घर बांधले आहेत. पैकी किंती लोकांनी दंड भरला याचा खुलासा व्हावा. ६) ८-१० लोकांनी घर जवळील खुल्या जागेत वापर करुन ताब्यात घेतले आहेत. त्यांचे विरुध्द कोणीच कार्यवाही केली नाही. म्हणून महोदय मी बांधलेल्या कुडामातीच्या घराचे कायम मालकी हक्क होण्यासाठी लागणारी किंमत भरावयास तयार आहे असे लिहिलेले दिसते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १७.१.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे निर्णय दिलेला दिसून येतो. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने तहसीलदार, भातकुली यांचे समक्ष दिनांक २१.११.२००६ रोजी आपले लेखी म्हणणे मांडण्याकरिता बोलाविण्यात आले होते. परंतु आपण उशिरा हजर होऊन प्रकरणात आपले तोंडी म्हणणे मांडून दिनांक २८.११.२००६ रोजी लेखी जबाब सादर करणार असे सांगितले. दिनांक २१.११.२००६ रोजी तहसीलदार, भातकुली यांनी आपला अहवाल सादर केला. त्यानंतर आपण दिनांक २८.११.२००६ रोजी आपला लेखी जबाब सादर केला. प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी दिनांक ८.१२.२००६ रोजी तलाठी, म्हैसपूर यांना आमचे कार्यालयात बोलावून आपले रेकॉर्डची पाहणी करण्यात आली. नंतर दिनांक १२.१२.२००६ रोजी तहसीलदार, भातकुली यांचेकडून आपल्या अपीलार्थ मुद्येनिहाय माहितीचा जबाब मागण्यात आला व तो त्यांनी

... ३

दिनांक २७.१२.२००६ रोजी या कार्यालयास सादर केला. नंतरच प्रकरण निकाली काढण्याकरिता बंद करण्यात आले. आपण सादर केलेल्या अपीलाचे अवलोकन केले असता, आपण तहसीलदार, भातकुली यांचेकडून दिनांक ४.९.२००६ रोजी मागितलेल्या माहितीचा अपीलाशी काहीच बोध होत नाही. दिनांक ९.११.२००६ रोजी आपण केलेल्या अपीलार्थ नेमकी कोणती माहिती आपणांस आवश्यक आहे हे स्पष्ट नसल्याने अपीलात बरीच तफावत आढळून येते. आपले अपीलार्थ तहसीलदार, भातकुली यांनी दिनांक २७.१२.२००६ रोजी मुद्येनिहाय माहिती सादर केली त्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. तलाठी, म्हैसपूर व तहसीलदार, भातकुली यांच्या रेकॉर्डची पाहणी केली असता, आपण कोणतीच एकही कागदोपत्री माहिती तहसीलदार, भातकुली यांचेकडून मागितले असल्याचे त्यांचे रेकॉर्डला उपलब्ध नाही. रेकॉर्डचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, आपण तहसीलदार, भातकुली यांचेकडून कोणतीच माहिती मागितली नाही हे सिध्द होते. आपणास तहसील कार्यालय, भातकुली तर्फे निवाऱ्यासाठी गावठाण्यातील सरकारी जागा पाहिजे असल्याचे स्पष्ट होते. आपल्या पहिल्या मुद्यांत आपण तहसीलदार, भातकुली यांना घर बांधण्यासाठी दिलेल्या अर्जाबाबत ग्रामपंचायत कडून अहवाल मागितला आहे तो प्राप्त होताच तहसीलदार, भातकुली यांनी अपीलार्थीना पुरवावा. दुसरा मुद्या असा की, गावठाणातील अतिक्रमणावर आपण रुपये ५००/- दंड भरला हे बरोबर आहे. कारण तो दंड शासकीय नियमानुसार संयुक्तिक आकारण्यात आला. असाच दंड आपल्या गावातील एका गावकऱ्यास आकारण्यात आला असल्याचे आपल्या मुद्यांतील उत्तर देतांना तहसीलदार, भातकुली यांनी सांगितले. आपणास तहसीलदार, भातकुली यांचेकडून नेमक्या कोणत्या माहितीची आवश्यकता आहे याचा अपीलात काहीच बोध होत नसल्याने आपली अपील खारीज करण्यात येत आहे. आपणांस कोणती माहिती कागदोपत्री पाहिजे त्याबाबत रितसर अर्ज करावा. आपण मागितलेली माहिती नियमानुसार आपणांस पुरविण्यात येईल. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या अर्जाचे व प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती दिलेली असली तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.९.२००६ च्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहितीचे अवलोकन

केले असता असे दिसून येते की, त्यांनी कोणत्या प्रकारची माहिती मागितली त्याचा अर्थ बोध होत नाही. हे म्हणणे खरे आहे. परंतु एकूणच त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये त्यांनी वस्तुस्थिती दिलेली आहे त्यावरुन असे दिसून येते की, त्यांना सुध्दा गावठाणातील जमीनीचे अतिक्रमण करुन कुळाचे घर बांधले आहे. त्या संदर्भात त्यांनी रुपये ५००/- दंड सुध्दा दिलेला आहे व त्या संदर्भातच त्यांना सदरचे घर व जागा त्यांना मिळावी अशी त्यांची अपेक्षा दिसते व त्याकरिता त्यांनी पुन्हा इतरांनी जे अतिक्रमण केले आहे त्या संदर्भात सुध्दा कोणती कारवाई केली याची माहिती विचारली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी स्वतः अपीलकर्ता यांचे वादग्रस्त जागेवर भेट देऊन त्याबाबत माहिती घेतली आहे. त्याबाबत तयार नकाशा सुध्दा दाखविला आहे व त्याबाबत अपीलकर्ता यांनी जे अतिक्रमण केले आहे त्याबद्यलच्या जागेचा नकाशा सुध्दा दाखविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार साधारण २५०० चौ.फु. हे अतिक्रमण त्यांनी शासकीय जागेवर केलेले आहे व त्याप्रमाणे रस्त्याच्या जागेवर सुध्दा इतरांनी अतिक्रमण केले आहे व त्याबद्यल तक्रार येत असते. परंतु ग्रामीण भागातील घरकुल योजना करावयाची असल्यास ग्रामपंचायत ठरावाची आवश्यकता असते तो ठराव हा उपविभागीय अधिकारी यांचेकडे येईल त्यानंतर घरकुल योजनेचे ले आऊट टाकण्याची कार्यपध्दती आहे व त्यामध्ये वाटपाबाबत कार्यपध्दती आहे व यापैकी कोणतीही कार्यपध्दती अपीलकर्ता यांनी अवलंबिली नाही व त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन पाहिजे असे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके, कागदपत्रे इत्यादींची छायांकितप्रत उपलब्ध करुन घेणे असा आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही माहिती या व्याख्येत येत नसल्यामुळे व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे बरोबर व योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.९.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे व त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१.२००७ रोजी जो निर्णय दिलेला आहे तोही योग्य आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.५.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६५/२००७.**

श्री.अब्दुल वहीद शेख जम्मू,
तालाबपूरा, वार्ड नं. ६४,
महानगरपालिका ऊर्दु कन्या शाळेजवळ,
जिल्हा अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक १२.४.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकत नाही असे पत्र त्यांनी उपशिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविले आहे. त्यांचे वतीने श्री.एस.जी.वसावे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे गाईड लाईन १८ नुसार वेतन चालू असतांना अचानकपणे कोणतीही पुर्वसुचना न देता वेतन बंद कां केले याची कारणे व माहिती मिळण्याबाबत. कालावधी सप्टेंबर २००६ ते आजपर्यंत. सदरची माहिती

... २

व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलात सुध्दा निर्णय न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.११.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांना दिनांक २८.११.२००६ रोजी जा.क्र./शिअ(माध्य)/माअ/४५९९अ/२००६, कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती अन्वये आपला दिनांक ६.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे आपण मागितलेली माहिती माहिती अधिकारा अंतर्गत तयार असल्याने माहिती या कार्यालयातून घेऊन जावे असे कळविले होते असे त्यांनी सांगितले. परंतु सदरचे पत्र कोणत्या माध्यमातून पाठविले होते असे विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, टपालाचे मार्फत पाठविले होते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्या पत्रावर टपालाचा सुध्दा शेरा दिसून येत नाही. त्याचप्रमाणे जावक क्रमांक हा शिअ(माध्य)/माअ/४५९९अ/२००६ असा आहे व त्यामुळे सदरचे पत्र हे खरोखरच अपीलकर्ता यांना त्यावेळेस पाठविण्यात आले होते याबद्यल संशयास्पद वाटते व यावरुन विहित मुदतीत माहिती मात्र त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरच्या माहितीकरिता उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांचेकडे ते बरेच वेळा गेले होते. परंतु त्याचे म्हणणे कोणीही ऐकून घेतले नाही. दिनांक ३.२.२००७ रोजी मात्र जा.क्र./शिअ(माध्य)/माअ/५०९/२००७ प्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी अधिक्षक वेतन पथक (माध्यमिक) यांना त्यांच्या दिनांक ९.१.२००७ चे अपीलाचे अनुषंगाने पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी झालेली नाही असे दिसून येते. मुळातच शिक्षणाधिकारी यांनी दिनांक २५.२.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अपीलकर्ता हे माहिती उपलब्ध घेवून गेले नाही असेच कळविलेले दिसून येते. मात्र त्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी ते वेळोवेळी माहिती घेण्याकरिता गेले होते व त्या नंतर त्यांनी आयोगाकडे दिनांक १७.३.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत

दाखल केलेली दिसून येते. सदरच्या पत्राचे अनुषंगाने मात्र त्यांना अधिक्षक, वेतन पथक कडील टिपणीचे पत्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहे अशा प्रकारे पत्राची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे कोणत्याही व्यक्तींनी अर्ज केल्या पासून कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही तर ३० दिवसात त्याप्रमाणे प्रथम अपील करावयाचे असते व त्यानंतर ९० दिवसाचे आंत द्वितीय अपील याचा अर्थ कमीत कमी हा संपूर्ण प्रकार ६० दिवसात संपली पाहिजे. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी अर्ज केला मागितलेली माहिती दिनांक १७.३.२००८ रोजी मिळाली आहे यावरुन अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.११.२००६ च्या अर्जास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. माहिती तयार आहे ती घेऊन जावी हे पत्र संशयास्पद आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहे. सदरच्या माहितीकरिता अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे अर्ज केलेला आहे परंतु आज ते हजर नाहीत. परंतु शास्ती लादावयाची झाल्यास कलम २०(१) प्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन शिक्षणाधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत असे उपस्थित असलेले उपशिक्षणाधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधित जनमाहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सदरची माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही याबाबत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/- शास्ती लादण्यात येत असून ती वसूल करण्यात यावी व तश्या प्रकारचा अहवाल आयोगाकडे तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/२०३-२०६/२.६.२००८